म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
नं. क्र. १९५३

# भारताचे लोकमत

REFBK-0012334

संगम - १.

( भारतांतील गेल्या तीन सार्वत्रिक निवडणुकींतील राजकीय विचारप्रवाह आणि आपल्या लोकशाहीपुढील कांहीं समस्यांचें समतोल व वस्तुनिष्ठ भूमिकेवरून विवेचन करणारें पुस्तक )

# भारताचें लोकमत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33509 दि: 13.5.4
क्रमांक ~~9343~~ नों दि: 2.7.94
9653

REFBK-0012334

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
12338

संपादन :
वा. दा. रानडे
स. मा. गर्गे

संगम : १

प्रकाशक :

**सं. स. गर्गे**

संगम प्रकाशन

१२०५/४/३ शिवाजीनगर, पुणें ४.

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

किंमत दोन रुपये

आवृत्ति पहिली, १५ ऑगस्ट १९६२.

मुद्रक :

**वि. नि. पटवर्धन**

साधना प्रेस

४३०-३१ शनिवार, पुणें २.

# निवेदन

'भारताचें लोकमत' या पुस्तकापासून 'संगम' प्रकाशन एका नव्या स्वरूपाच्या पुस्तकमालेचा उपक्रम सुरू करीत आहे. सार्वजनिक जिव्हाळ्याचा विषय निवडून समतोल व वस्तुनिष्ठ भूमिकेवरून त्या विषयाच्या निरनिराळ्या बाजूंचें विवेचन करणारे अधिकारी लेखकांचे लेख किंवा मुलाखती पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणें हा या उपक्रमाचा उद्देश आहे. एकाच विषयाच्या विविध बाजू या पुस्तकांत वाचकास एकत्रित वाचावयास मिळून त्या विषयाच्या समग्र अभ्यासास मदत होईल. कोणत्याहि प्रश्नाचा पूर्वग्रहरहित, वस्तुनिष्ठ व समतोल दृष्टिकोनांतून अभ्यास करण्याची संवय लोकांच्या अंगीं बाणविणें लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीनें फार आवश्यक आहे असें आम्हांला वाटतें. त्या दिशेनेंच हें पाऊल आम्ही टाकीत आहोंत. या योजनेनुसार साधारणपणें दर तीन महिन्यांनीं एक शंभर पानांचें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. आमच्या माहितीप्रमाणें मराठींत अशा स्वरूपाचा हा पहिलाच उपक्रम असून वाचक त्याचें स्वागत करतील अशी आशा आहे.

या पुस्तक-मालेंतील दुसऱ्या पुस्तकाचा 'आपल्या शिक्षणाची दिशा' हा विषय आहे.

'भारताचें लोकमत' हें पुस्तक तयार करण्याचे बाबतींत आमच्याशीं आपुलकीनें सहकार्य करणाऱ्या सर्व राजकीय नेत्यांचे व विचारवंतांचे आम्ही आभारी आहोंत. साधना प्रेसनें छपाईची बाजू तत्परतेनें संभाळल्यामुळेंच हें पुस्तक लौकर प्रसिद्ध होऊं शकलें. त्यांचे, तसेंच पुस्तकासाठीं आकर्षक वेष्टन तयार करून दिल्याबद्दल चित्रकार श्री. गंगाधर ताटके यांचेहि आम्ही आभारी आहोंत.

'संग्राम प्रकाशन' नें या पूर्वीं 'नवे वाद, नवे विचार,' या नांवाची एक पुस्तक-माला प्रकाशित करण्याची योजना जाहीर केली होती, त्यासाठीं आमचे मित्र आणि महाराष्ट्रांतील एक विचारवंत लेखक प्रा. दे. अ. दाभोलकर यांनीं 'लोकशाही समाजवाद' हें पुस्तक अत्यंत साक्षेपानें व तत्परतेनें लिहून दिलें. त्याचें मराठी वाचकांकडून चांगलें स्वागतही झालें. पण त्यानंतर त्या मालेचें दुसरें पुस्तक अद्याप प्रकाशित होऊं शकलें नाहीं. लेखकांकडून पुस्तकें मिळविण्याचें आमचे प्रयत्न चालूच आहेत. त्यांत यश मिळेल तशी ती माला पूर्ण करण्याचा आमचा विचार आहे.

स्वातंत्र्यदिन
१५ ऑगस्ट, १९६२

— प्रकाशक

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| भारतीय लोकशाहीपुढील समस्या : | १ |
| प्रमाणशीर प्रतिनिधित्व हाच खरा मार्ग — डॉ. र. पु. परांजपे यांची मुलाखत | ३ |
| संसदीय लोकशाहीची प्रतिष्ठा राखा — मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण | ६ |
| कांहीं संकेत रूढ होणें जरूर — डॉ. धनंजयराव गाडगीळ | ९ |
| लोकेच्छा हीच सार्वभौम — श्री. एस्. एम्. जोशी | १० |
| प्रमाणशीर प्रतिनिधित्व कां नको ? — प्रा. गं. बा. सरदार यांची मुलाखत | १२ |
| सदोष निवडणूक-पद्धतीनें अन्याय — श्री. श्रीनिवास सरदेसाई | १५ |
| जागा आणि मतें यांत मेळ नाहीं — श्री. मधु लिमये | ८८ |
| परत बोलावण्याचा हक्क हवा — श्री. एस्. के. लिमये यांची मुलाखत | १७ |
| निवडणुका आणि मध्यम वर्गाची उदासीनता — प्रा. के. गो. पंडित | १७ |
| पक्षांचीं आर्थिक धोरणें — एक तौलनिक छाननी | २५ |
| लोकनीति व निवडणुका — श्री. गो. बा. देशपांडे | ३५ |
| तीन निवडणुका आणि आंबेडकर-अनुयायी — ॲ. शंकरराव खरात | ४२ |
| लोकसभा निवडणुकीचा कौल — वा. दा. रानडे | ४७ |
| महाराष्ट्रांतील निवडणूक | ५५ |
| विधानसभा निवडणुकांचा कौल | ६५ |
| तीन निवडणुका : तुलनात्मक आंकडेवारी | ७३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रम ....३३८०९.... दि: ...
क्रमांक ....९६९३.... नों दि: ...

# भारतीय लोकशाहीपुढील समस्या

निवडणूक, राजकीय पक्ष आणि लोकशाही यांचा एकमेकांशीं फार निकटचा संबंध आहे. लोकशाहींत लोकप्रतिनिधींच्या हातीं राज्य असतें. हे प्रतिनिधि निवडणुकीच्या मार्गाने निवडले जातात. आपल्या हितसंबधाचे रक्षणासाठी लोकसमूह संघटित होतात व त्यातून राजकीय पक्ष निर्माण होतात. हे राजकीय पक्षच निवडणुका लढवितात. असा हा लोकशाही, निवडणूक आणि राजकीय पक्ष यांचा अन्योन्य संबंध आहे. निवडणूक-पद्धति आणि राजकीय पक्ष संघटना यांच्यातील सध्याच्या उणीवा दूर होतील त्याप्रमाणात आपल्या लोकशाहीतील उणीवा दूर होऊन लोकशाहीचा निकोप विकास होईल. याच दृष्टीने आपली निवडणूक पद्धति व राजकीय पक्ष संघटना यांच्या संबंधीं एक प्रश्नावलि आम्हीं तयार केली व राजकीय नेते आणि विचारवंत यांच्याकडे ती पाठवून त्यांना आपले विचार व्यक्त करण्याची विनंति केली. काहींनी मुलाखती दिल्या, कांहींनी उत्तरे लिहून पाठविली. ती येथे प्रसिद्ध करीत आहोत. हा एक प्रकारचा परिसंवादच झालेला आहे.

— संपादक

* * *

## प्रश्नावलि

( १ ) तीन सार्वत्रिक निवडणुकांचा अनुभव लक्षांत घेता आपल्या निवडणूक पद्धतींत तुम्हांला कोणत्या मुख्य उणीवा आढळतात?

( २ ) गेल्या निवडणुकींत मतदान कितपत मोकळेपणानें झाले? मतदारांवर प्रत्यक्षाप्रत्यक्ष कोणती दडपणें गेल्या निवडणुकींत आलीं? सत्ता, पैसा आणि जात या तीन प्रमुख दडपणांपैकीं कोणते दडपण अधिक प्रभावी ठरते असा आपला अनुभव आहे? हीं दडपणें कशी दूर करतां येतील?

( ३ ) मतदारांची जागरूकता कितपत वाढली आहे? मत देतांना, नेत्यावर श्रद्धा म्हणून, पक्षाचा कार्यक्रम पटला म्हणून, उमेदवार विशिष्ट जातीचा म्हणून किंवा विशिष्ट उमेदवार वैयक्तिकदृष्ट्या अधिक लायक वाटला म्हणून, यांपैकीं कोणत्या विचाराचा पगडा मतदारावर अधिक दिसला?

( ४ ) निवडणुकींत अधिकारारूढ पक्षाला तो केवळ अधिकारारूढ असल्यामुळें कांहीं फायदे मिळतात व विरोधी पक्षांची कांहीं बाबतींत कुचंबणा होते असें म्हटलें जातें त्यांत कितपत तथ्य आहे असे आपणास वाटते ?

( ५ ) संसदीय लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर देशांत दोन तुल्यबळ पक्ष असावे लागतात. भारतात आज काँग्रेसला तुल्यबळ पक्ष नाहीं. अनेक वर्षे सतत एकच पक्ष अधिकारारूढ असल्यानें एकपक्षीय हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका आहे असे म्हटलें जाते, आपण या मताशीं सहमत आहांत का ?

( ६ ) काँग्रेसला तुल्यबळ पक्ष देशांत कां निर्माण होत नाहीं ? विरोधी पक्षाची वाढ काँग्रेसच होऊं देत नाहीं असे म्हटले जाते, याबद्दल आपणांस काय वाटते ? याबाबतींत काँग्रेसवरही कांहीं जबाबदारी पडते हे आपणास मान्य आहे कां ? ती पार पाडण्यासाठीं काँग्रेस काय करींत आहे ?

( ७ ) अधिकारारूढ पक्ष व विरोधी पक्ष यांच्यांतील सध्याचे संबंध आपणांस योग्य वाटतात काय ? नसल्यास त्यांत कोणत्या सुधारणा हव्यात ? त्या कशा घडवून आणतां येतील ?

( ८ ) सध्याच्या पक्षाधिष्ठित लोकशाहींत कोणते प्रमुख दोष आपणांस वाटतात ? ते कसे दूर करता येतील ? पक्षहीन लोकशाही आणि एकपक्षीय लोकशाही या कल्पना देशाच्या सध्याच्या परिस्थितींत कितपत व्यवहार्य आहेत असे आपणांस वाटते ?

( ९ ) आपले मतभेद बाजूला ठेवून सर्व पक्षांना सहकार्यानें पार पाडता येईल असा कोणता कार्यक्रम देशाच्या व विशेषतः महाराष्ट्राच्या दृष्टीनें आपणांस सुचविता येईल ?

(१०) आपल्या दृष्टीनें आज महाराष्ट्रापुढील सर्वांत निकडीचे प्रश्न कोणते आहेत ?

(११) निरनिराळ्या विरोधी पक्षांचे आपसांतील संबंध काय असावेत ? सरकारला परिणामकारक विरोध करण्यासाठीं समान कार्यक्रमावर संयुक्त आघाडी करणें, विशिष्ट प्रश्नापुरतेंच सहकार्य करणें, आपसांतील मते फुटूं नयेत यासाठीं निवडणुकींत अेकमेकाविरुद्ध उमेदवार उभे करावयाचे नाहींत असा करार करणें यांपैकीं कोणता मार्ग देशाच्या सध्याच्या स्थितींत योग्य ठरेल ?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ......................... दि. ......................
क्रमांक ......................... कॅ. दि. ......................

# प्रमाणशीर प्रतिनिधित्व हाच मार्ग

## डॉ. र. पु. परांजपे यांची मुलाखत

आपल्या निवडणूक पद्धतींतील मुख्य दोष म्हणजे एकंदर मतदानांत अल्प-संख्य मतें मिळालेला उमेदवारहि केवळ इतरांपेक्षां जास्त मतें मिळाल्यानें निवडून येऊं शकतो. खऱ्या अर्थानें त्याला बहुमत मिळालें नसतांहि तो निवडून येतो असे विचार, महाराष्ट्रांतील प्रागतिक आणि उदारमतवादी विचारसरणीचे नेते डॉ. र. पु. ऊर्फ अप्पासाहेब परांजपे यांनीं आपल्या निवडणूक पद्धतींतील उणीवांसंबंधीं बोलतांना व्यक्त केले.

निवडणूक पद्धतींतील हा दोष कसा दूर करता येईल असे विचारता अप्पा-साहेब म्हणाले, "प्रमाणशीर प्रतिनिधित्व हाच यावर उपाय आहे. या पद्धतीनें निरनिराळ्या पक्षांचे उमेदवारांना त्यांच्या मतांचे प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळेल. सध्याच्या पद्धतीनें विरोधी पक्षाच्या उमेदवारांना निवडून येणें फार कठीण झालें आहे. कारण कांही ठराविक प्रमाणांत मतें मिळाली कीं काँग्रेस उमेदवाराची जागा निश्चित होते. अल्पसंख्य मतें पडूनहि बहुसंख्य जागा काँग्रेस पक्ष सहज मिळवूं शकतो. विरोधी पक्षांचा फार मोठा पराभव गेल्या निवडणुकीत झाला. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीचा अवलंब केला असता तर त्यांना त्यांच्या मताच्या प्रमाणांत जागा मिळू शकल्या असत्या."

सध्याची एक जागेच्या मतदारसंघाची पद्धतहि आपणास अमान्य असून त्याऐवजीं चारपांच जागांचा एक मतदारसंघ ठेवून एकाच उमेदवाराला सर्व मतें देण्याची cumulative voting ची पद्धति स्वीकारावी. विरोधी पक्षांना योग्य प्रतिनिधित्व मिळण्यास त्यामुळें मदत होईल असें मत डॉ. परांजपे यांनीं व्यक्त केलें.

72338

### • कार्यक्रमाला मत देणारे थोडे

मतदार राजकीयदृष्ट्या अधिक जागरूक झाला आहे काय असें विचारता अप्पासाहेब म्हणाले, "जागरूकता थोड्या प्रमाणांत वाढली आहे, पक्षाचा कार्यक्रम पाहून मत देणारे इंग्लंडमध्येंहि थोडे; मग ते आपल्याकडे फारच थोडे असतील तर त्यांत नवल नाहीं. पक्षाला किंवा व्यक्तीला मत देणारेच जास्त. उमेदवाराची जातहि पाहिली जातें.

जातीच्या दृष्टीनें विचार करण्याची प्रवृत्ति शिक्षणाच्या प्रसाराबरोबर कमी व्हावयास हवी असे आपणास वाटत नाहीं कां असें विचारतां डॉ. परांजपे म्हणाले,

" शिक्षणानें ही प्रवृत्ति खरोखर कमी व्हावयास हवी, पण शिकलेले लोकहि जातीवर जातात असेच दृश्य दिसते हे मात्र खरे. "

अधिकारारूढ पक्ष निवडणुकीपूर्वी अधिकारावर असल्यामुळें त्याला कांही फायदे मिळतात व विरोधी पक्षाची कुचंबणा होते असे म्हटले जाते त्याबाबत आपणास काय वाटते असे विचारता अप्पासाहेबांनीं सांगितले कीं अधिकारारूढ पक्षास कांहीं विशेष फायदा होतो असे आपणास वाटत नाहीं. कांहीं परिणाम होतच असेल तर तो अपरिहार्य आहे. निवडणुकीपूर्वी तीन महिने अधिकारारूढ पक्षाने राजिनामा द्यावा ही सूचना आपणास व्यवहार्य वाटत नाहीं.

## • पक्षांतर करणारानें राजिनामा द्यावा

विधानसभा किंवा लोकसभेत एखाद्या पक्षाच्या तिकिटावर निवडून यावयाचे व निवडून आल्यानंतर कांहीं दिवसांनीं पक्षांतर करावयाचे ही प्रथा अनिष्ट आहे. पक्षांतर करणाऱ्या आमदार खासदाराने आपल्या जागेचा राजिनामा देऊन पुनः निवडणूक लढविली पाहिजे. या प्रथेला आळा बसण्यासाठीं निवडणूक नियमातच तशी तरतूद केली पाहिजे अशी सूचना त्यांनीं केली.

निवडणुकींत मतदारावर जातीचे दडपण येते तसेच पैशाचे दडपण येते. पैशाच्या दडपणास किंवा गैरवापरास आळा कसा घालता येईल याबाबत आपले गत मांडताना आप्पासाहेब म्हणाले, " राजकीय पक्षांच्या निधीस देणग्या देण्यास औद्योगिक कंपन्यांना बंदी केली पाहिजे. या कंपन्यांचे डायरेक्टरांनीं व्यक्तिशः देणग्या द्यायला हरकत नाहीं. पण कंपनीनें देणग्या देण्याची प्रथा अनिष्ट आहे. "

## • राजकीय पक्षनिधीची तपासणी व्हावी

राजकीय पक्षांचे निधि योग्य मार्गानेच गोळा केले जावेत, तसेच त्यांचा गैरवापर केला जाऊं नये आणि तो तसा केला जात नाहीं, याबद्दल लोकांचीं खात्री पटावी, यासाठीं पक्षांनी आपल्या निधीची माहिती प्रसिद्ध करावी आणि निधीची पुस्तके तपासणीसाठी उपलब्ध व्हावीत अशी सूचना डॉ. परांजपे यांनीं केली.

## • विशिष्ट प्रश्नावर एकजूट शक्य

संसदीय लोकशाही यशस्वी होण्यासाठीं दोन तुल्यबळ पक्षांची आवश्यकता आहे. कॉंग्रेसला तुल्यबळ असा प्रभावी विरोधी पक्ष आज देशांत नाहीं. तो का निर्माण होत नाहीं व कसा निर्माण करता येईल यासंबंधीं आपले विचार मांडतांना ते म्हणाले, " विरोधी पक्ष फार झाले; त्यामुळें त्यांची मतें आपसांत विभागली जातात, विरोधी पक्षांजवळ आज कॉंग्रेस एवढी साधनेहि नाहींत. यावर मार्ग म्हणजे

काँग्रेसविरोधी सर्वच विरोधी पक्षांचा एक पक्ष बनवावा हे मला मान्य नाहीं आणि ते शक्यहि नाहीं. कम्युनिस्ट आणि जनसंघ हे दोन टोकाचे दोन पक्ष एकत्र येणें कसे शक्य आहे ? पण विशिष्ट प्रश्न किंवा कार्यक्रमापुरते एकत्र येऊन काँग्रेसला परिणामकारक विरोध विरोधी पक्षांना करतां येईल." पक्षहीन लोकशाही आणि एकपक्षीय लोकशाही या दोन्ही कल्पना आपणास अव्यवहार्य वाटत असल्याचे मत त्यांनीं व्यक्त केले.

आजच्या विरोधी पक्षांपैकीं कोणत्या पक्षाबद्दल आशा बाळगतां येईल याबद्दल बोलतांना आप्पासाहेब म्हणाले कीं कम्युनिस्ट आणि जनसंघ या दोन्ही पक्षांची विचारप्रणालि मला मान्य नसून प्रजासमाजवादी पक्षच अधिक जवळचा वाटतो.

## • लाचलुचपतविरोध निकडीचा प्रश्न

भारताच्या विशेषतः महाराष्ट्राच्या दृष्टीनें सर्वच राजकीय पक्षांना एकत्र येऊन पार पाडता येईल असा कांहीं कार्यक्रम सुचविता येईल का असे विचारता डॉ. परांजपे यांनीं सांगितले कीं सगळ्याच प्रश्नांत राजकारण आणता कामा नये. उदा० अंधांना मदतीचे कार्यांत कोणते मतभेद येण्यासारखे आहेत ? लाचलुचपत नष्ट करणें हा फार मोठा प्रश्न आपणा सर्वांपुढें आहे. दारूबंदीत लाचलुचपतीला मोठा वाव मिळत आहे तेव्हां लाचलुचपत नाहींशीं होण्यासाठीं दारूबंदीबद्दलचा अट्टाहास सोडण्याची तयारी सरकारनें दर्शविली पाहिजे.

* * *

[ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि प्रजासमाजवादी पक्षाचे नेते श्री. एस्. एम्. जोशी यांच्याकडे आम्ही प्रश्नावलि पाठविली होती. वेळेअभावी ते उत्तर पाठवू शकले नाहीत पण आम्ही उपस्थित केलेल्या कांहीं प्रश्नासंबंधीं आपले विचार मुंबईचे दैनिक ' लोकमित्र च्या महाराष्ट्र राज्य स्थापना विशेषाकांत त्यांनी व्यक्त केल्याचे आढळले. विषयाचे विवेचनास पूर्णता येण्याचे दृष्टीनें हे विचार आजहि उपयुक्त वाटणारे असल्याने त्यांतील उतारे येथें दिले आहेत. ]

# संसदीय लोकशाहीची प्रतिष्ठा राखा

## मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण

प्रश्न : महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यावर महाराष्ट्रीय जनता प्रथमच आपल्या भाग्याची शिल्पकार होणार आहे. त्या दृष्टीनें हें राज्य चालवितांना अधिकारारूढ पक्ष व विरोधी पक्ष यांची काय भूमिका असावी असे आपणास वाटते ?

उत्तर : भावी महाराष्ट्र राज्यांत संसदीय लोकशाहीची प्रतिष्ठा राखणे हे कॉंग्रेस व विरोधी पक्षांच्या धोरणाचे मूळ सूत्र असले पाहिजे. जनतेचा लोकशाहीवर विश्वास कायम राहिला पाहिजे; वाढला पाहिजे हे लक्षांत घेऊन कॉंग्रेस व विरोधी पक्ष यांनीं आपल्या वागण्याची पद्धत ठरविली तर जनतेचा लोकशाहीवरील विश्वास वाढेल व संसदीय लोकशाहीच्या चांगल्या परंपरा निर्माण होतील.

प्रश्न : गेल्या तीन वर्षांच्या अनुभवासंबंधीं आपणास काय म्हणावयाचे आहे ?

उत्तर : गेल्या तीन वर्षांचा एकंदर अनुभव चांगला आहे. पण या तीन वर्षांत विरोधी पक्षांचे कांहीं वेळचे वागणे ठीक नव्हते, लोकशाही परंपरेस धरून नव्हते, असे मला वाटते. पण असे अपवादात्मक प्रकार सोडले तर एकंदरीनें विरोधी पक्ष जबाबदारीनें वागला.

### ● चळवळी विशिष्ट मर्यादेंत चालाव्यात

प्रश्न : आपली ही भूमिका प्रत्यक्षांत येण्यासाठीं महाराष्ट्रांत अवश्य तें वातावरण आहे काय ? नसल्यास तें निर्माण करण्यासाठीं आपण काय करावयाचे ठरविले आहे ?

उत्तर : यासाठीं प्रथम महाराष्ट्रांतील संपाचे व सत्याग्रहाचे वातावरण कमी केले पाहिजे. सध्याच्या परिस्थितींत कोणताही प्रश्न सोडविण्यापेक्षां सरकारला अडचणींत टाकण्याचे धोरण दिसते. आपल्या रास्त आर्थिक मागण्यासाठीं जनतेनें

चळवळच करूं नये असें मी म्हणणार नाहीं. जनतेच्या आर्थिक मागण्यांचा विचार झालाच पाहिजे पण जनतेनें आपल्या आर्थिक मागण्यासाठीं केलेल्या चळवळीला प्रत्यक्ष प्रतिकाराचें स्वरूप येतां कामां नये.

सर्व चळवळी एका विशिष्ट मर्यादेत चालल्या पाहिजेत. ही मर्यादा कोणती असावी हें ठरविण्यासाठीं सर्व पक्षांनीं एकत्र बसून संसदीय लोकशाहींत पाळावयाची पथ्यें निश्चित केलीं पाहिजेत.

**प्रश्न :** पण यासाठीं आपण कोणते प्रयत्न करणार ?

**उत्तर :** महाराष्ट्रांतील औद्योगिक क्षेत्रांत एका विशिष्ट मुदतीचा औद्योगिक तह [ इंडस्ट्रियल ट्रूस ] व्हावा म्हणून मी प्रयत्न करणार आहे. आज जो उठतो तो सत्याग्रह करावयास निघतो. झोपडीवाल्यांचेच पहा ना ! आम्ही त्यांना झोंपड्या बांधण्यासाठीं बोरीवलीला जागा देऊं केली आहे, पण ते म्हणतील कीं, रेसकोर्सवरच आम्हांस जागा हवी. असल्या आततायी वागण्यानें प्रश्न कसे सुटणार. महाराष्ट्रांतील सर्व पक्षांनीं व जनतेनें याचा शांतपणे विचार करण्याची वेळ आली असे मला वाटते. इतर पक्ष कांहीं करोत मी मात्र " सर्व प्रश्नांबाबत सर्वांशी सतत वाटाघाटीची प्रक्रिया [ कन्टिन्युअस प्रोसेस ऑफ कन्सल्टेशन ] अंमलांत आणण्याचे धोरण पुढे चालविणार आहे.

**प्रश्न :** लोकशाही स्थिरपद व्हावी या दृष्टीनें लोकशाहीवर विश्वास असलेल्या विरोधी पक्षाची आवश्यकता आहे असे आपणांस वाटते काय ?

**उत्तर :** होय, निश्चित.

**प्रश्न :** कॉंग्रेसला प्रभावीपणें विरोध करून आवश्यकतेनुसार राज्यकारभार हातीं घेण्यास पात्र होऊं शकेल असा कोणता विरोधी पक्ष महाराष्ट्रांत आपणास दिसतो ?

**उत्तर :** राज्यकारभार हातीं घेण्यास लायक असलेली माणसं मला विरोधी पक्षांत दिसतात पण पक्षाबद्दल बोलणे जरा अवघड आहे.

## ● कॉंग्रेस की कम्युनिस्ट पर्याय धोक्याचा

**प्रश्न :** कॉंग्रेस की कम्युनिस्ट एवढाच पर्याय लोकांपुढें राहणें इष्ट आहे काय ?

**उत्तर :** असा पर्याय जनतेसमोर राहणें धोक्याचे आहे. पण तशी परिस्थिति निर्माण होईलच असें नाही. याचें कारण आजची कॉंग्रेस ही संपूर्णपणें राजकीय पक्ष बनलेली नाहीं. तर स्वातंत्र्य चळवळीच्या वेळचे बरेच प्रवाह अद्यापहि कॉंग्रेसमध्यें आहेत. त्यामुळें कॉंग्रेस कीं कम्युनिस्ट असा अनिष्ट पर्याय जनतेसमोर येणार नाही. असे मला वाटते. आणखी कांहीं वर्षे कॉंग्रेसचें हेंच स्वरूप कायम राहावे असें मला वाटते. मध्यंतरीच्या काळांत कॉंग्रेसला पर्यायी पक्ष होईल असा नवा लोकशाही पक्ष उदयास येईल.

## ● कॉँग्रेसच्या सध्याच्या स्वरूपाचें वैशिष्ट्य

प्रश्न : कॉँग्रेसच्या सध्याच्या या स्वरूपाचें वैशिष्ट्य काय ?

उत्तर : चळवळीच्या वेळचे प्रवाह अद्याप कॉँग्रेसमध्यें असल्यामुळें प्रत्येक प्रश्नाची दुसरी बाजू कॉँग्रेसमध्येंच मांडली जाते. सध्याच्या कॉँग्रेसचा हा गुण पक्ष चालविण्याच्याच मर्यादेंत राहिला पाहिजे. आजच कॉँग्रेसला संपूर्णपणें चळवळीचें स्वरूप देण्यानें कॉँग्रेस कमताकद होईल. सध्या पर्यायी असा लोकशाही पक्ष भारतांत नसल्यानें आजच कॉँग्रेस कमताकद होणें इष्ट नाहीं. यासाठीं सध्याच्या कॉँग्रेसच्या स्वरूपाचें रक्षण केलें पाहिजे.

## ● सारेच समाजवादी

प्रश्न : पर्यायी लोकशाही पक्ष बनण्याची लायकी आजच्या कोणत्या पक्षांत आहे ?

उत्तर : सध्या भारतांत असलेल्या सर्व राजकीय पक्षांचा कार्यक्रम जवळ जवळ सारखा आहे. अगदी जनसंघापासून स्वतंत्र पक्षांपर्यंत आपला कार्यक्रम समाजवादी कार्यक्रमापेक्षां भिन्न नाहीं असें दाखवून देण्याचा सर्वांचा अट्टाहास असतो. स्वतंत्र पक्षाचे श्री. मसानी यांनीं स्वतंत्र पक्षाच्या कार्यक्रमांत व पश्चिम जर्मनीच्या लोकशाही समाजवादी पक्षाच्या कार्यक्रमांत फरक नाहीं हें दाखविण्यासाठीं एक पुस्तिका तयार केली आहे ! सर्व पक्षांत समान कार्यक्रम असतांना अंमलबजावणी करण्याची शक्ति हेंच पक्षाचें सामर्थ्य ठरते. असा विश्वास विरोधी पक्षांपैकीं जो पक्ष जनतेंत निर्माण करूं शकेल तोच कॉँग्रेसला पर्यायी पक्ष होऊं शकेल.

प्रश्न : जातीयवादी पक्षांपुढें कोणतें भवितव्य आहे असे आपणास वाटते ?

उत्तर : जातीयवादी पक्षास कोणत्या तरी पक्षांत विलीन होण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. नाहींतर काळाच्या ओघांत हे पक्ष नामशेष होतील.

प्रश्न : विरोधी पक्षांना त्यांच्या शक्तीनुसार वाव द्यावयास नको काय ?

उत्तर : होय, विरोधी पक्षांना सर्वत्र प्रतिनिधित्व मिळालें पाहिजे हें मान्य. पण प्रश्न आहे प्रमाण ठरविण्याचा. सरकारनियुक्त सर्व लहान संघटना, मोठ्या संघटना म्हणजे लहान प्रमाणांत विधिमंडळे बनवावयास माझा विरोध आहे. भांडणाचा मुद्दा येथेंच येतो. उदाहरणच द्यावयाचे तर मुंबई विधानसभेचे देतां येईल. सर्व सरकारी संघटनांवर समितीतील पांचहि पक्षांस प्रतिनिधित्व हवें असा त्यांचा आग्रह असे. अर्थात् हें शक्य झालें नाहीं.

* * *

# कांहीं संकेत रूढ होणें जरूर

## डॉ. धनंजयराव गाडगीळ

**प्रश्न :** नव्या महाराष्ट्र राज्याचा विकास सुलभ रीतीनें व शीघ्र गतीनें व्हावा म्हणून राज्यकर्ते आणि विरोधी पक्ष यांनीं कोणतीं पथ्यें पाळावीत ?

**उत्तर :** नव्या महाराष्ट्र राज्यांत राजकीय पक्षांनीं एकमेकांशीं सलोख्यानें वागण्याची फार गरज आहे. व प्रयत्न केला तर राज्यकर्ते आणि विरोधी पक्ष यांच्यांत याबाबत कांहीं संकेत निर्माण होणे अशक्य नाही. अर्थात सर्वांत महत्त्वाचा संकेत म्हणजे दोघांनीही परस्परांशी विचार विनिमय करण्याचा आणि एकमेकांचे म्हणणें पटल्यानंतर तें मानण्याचा संकेत प्रथम पाळला पाहिजे. आणि या गोष्टी फारशी वाच्यता न करतां अनौपचारिकपणें झाल्या पाहिजेत. इंग्लंडमध्यें राज्यकर्ते आणि विरोधी पक्ष या दोघांनींही आपणहून कांहीं संकेत पाळावयाचे ठरविले आहे. आपणहून तें त्यांनीं मान्य केले आहेत. तीच गोष्ट आपल्याकडे झाली पाहिजे. सत्ताधारी पक्षांनीं आपल्या हातीं सत्ता आहे म्हणून बेतालपणे वागतां कामा नये. सत्तेचा वापर विवेकानें करावयाचा असतो. व त्यासाठीं कांहीं पथ्यें पाळून कामें करावी लागतात. ती प्रथा अद्यापहि आपल्याकडे रूढ झाली नाहीं. त्याच प्रमाणें विरोधी पक्षांची टीकाहि कित्येकवेळा अमर्यादपणे होते. म्हणून मुख्य गोष्ट म्हणजे राज्यकर्ते आणि विरोधी पक्ष यांना परस्परांबद्दल विश्वास आणि आदर वाटला पाहिजे. आपण जर कांहीं गोष्टी विश्वासानें सांगितल्या तर त्याचा गैर वापर होणार नाहीं अशी दोघांनाहीं खात्री वाटली पाहिजे. पण आपल्याकडे अद्याप तसें वातावरण नाहीं. याला वृत्तपत्रेंहि जबाबदार आहेत. ही परिस्थिति बदलण्याचा प्रयत्न दोन्ही बाजूंनीं झाला पाहिजे. गैर मार्गानें विरोधी पक्षांसंबंधीं प्रचार करणाऱ्या आपल्या मित्रालादेखील आवरण्याची हिं . राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांनीं दाखविली पाहिजे.

## • पक्षोपक्षांत सहकार्य अशक्य नाहीं.

सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यांत विचारविनिमय सुरू झाला पाहिजे. अर्थात् या गोष्टीचे यश या विचारांत भाग घेणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून/राहील. गेल्या दोन-तीन वर्षांत श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं अनौपचारिकरीत्या महाराष्ट्रांतील विरोधी पक्षांतील प्रमुख पुढाऱ्यांशीं कांहीं महत्त्वाच्या वेळेस विचारविनिमय केला असे सांगतात. हेंच धोरण पुढें व्यापक रीतीनें चालू ठेवणें मला इष्ट वाटते. पक्षोपक्षांत सहकार्य घडणें हे महाराष्ट्रांत अशक्य आहे असे मला वाटत नाहीं. या बाबतींत सर्व पक्षांनीं दुष्काळ निवारण कमिटीच्या आणि संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे निवेदन तयार करण्याचे कामांत जो समजूतदारपणा दाखविला तो उल्लेखनीय व अनुकरणीय वाटतो.



* * *

# लोकेच्छा हीच सार्वभौम

श्री. एस्. एम्. जोशी

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत आपण जी कमाई केलेली आहे तिचे जतन करून पुढचा टपा कसा गांठावयाचा ? ज्या लोकशाहीच्या मार्गांनीं जाऊन आपण महाराष्ट्र मिळविला त्या मार्गांनींच प्रगतीचा पुढचा टप्पा गांठण्यांत आपण यश मिळविले तरच ती कमाई टिकून राहील आणि वाढवितां येईल. भौतिक प्रगति झपाट्यानें करण्यासाठीं लोकशाहीचीं तत्त्वें कांहीं काळ बाजूला ठेवलीं तर बिघडले कोठे ? असा विचार चुकूनदेखील आमच्या मनांत येतां कामा नये. केवळ कायद्यापुरते लोकशाही घटनेंत राहावयाचे आणि प्रत्यक्ष व्यवहारांत लोकशाही तत्त्वांना पायदळीं तुडवायचे असा प्रकार प्रगतीच्या नांवावर होता कामा नये. तसें होईल तर मिळविलेल्या संयुक्त महाराष्ट्राला विशेष अर्थ राहणार नाहीं. लोकांची इच्छा म्हणून तो अस्तित्वांत आला आणि नव महाराष्ट्रांत ती लोकेच्छा सार्वभौम राहिली पाहिजे. सामूहिक पुरुषार्थाचा तोच राजमार्ग आहे. राजनीतीनें लोकनीती-वर मात केली अशी प्रतिगामी घटना महाराष्ट्रांत निर्माण होणार नाहीं याबद्दल प्रयत्नांची पराकाष्ठा आवश्यक आहे. तीच नवमहाराष्ट्राची निष्ठा, तोच आधुनिक भारतांतील महाराष्ट्र धर्म.

## • सत्तारूढ पक्षाची जबाबदारी.

याबाबत राज्यकर्त्या पक्षानें अधिक( खबरदार राहिले पाहिजे. इतरांपेक्षां त्यांची जबाबदारी मोठी आहे. त्यांनींच एकवेळ ' हम करे सो ' कायदा सुरू केला म्हणजे विरोधी शक्तीही तशाच प्रकारच्या निर्माण होऊं लागतात. जो कोणी राज्यकर्त्यांना विरोध करील तो आपला मित्र अशी प्रवृत्ति वाढीस लागते. सर्व विरोधकांनीं आपल्या मुलभूत मतभेदांकडे दुर्लक्ष करून एकजूट करावी आणि राज्यकर्त्या पक्षाचा असेल त्या मार्गानें पाडाव करावा, अशी मागणी असंतुष्ट जनतेकडून येऊं लागते. याचाच अर्थ लोकशाही तत्त्वांचा क्षय होऊं लागतो. ही आपत्ति येणार नाहीं याबाबत राज्यकर्त्यांनीं दक्ष राहावयास हवे, नव्हे तें त्यांचें कर्तव्य आहे. विरोधकांनीं देखील आपला विरोध विधायक स्वरूपाचा आहे तत्त्वाधिष्ठित आहे, विद्वेषावर आधारलेला नाहीं याबद्दल लोकांची खात्री पटवून दिली पाहिजे. कोठेही असंतोष दिसला कीं तोउपयोगांत आणून शक्ति वाढवण्याचा प्रयत्न करणें हें लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीनें हानिकारक आहे. आपल्या देशासारख्या औद्योगिक दृष्ट्या मागासलेला, फार मोठ्या लोकसंख्येचा देश दारिद्र्याच्या चिखलांतून चुटकीसरशी वर येऊ शकत नाहीं. थोडा अवधि हा

अनुक्रम 33495 दि. 17.99
क्र. 9772 दि. 2044



लागणारच. आणि त्या संक्रमणावस्थेत थोडे फार दुःखही भोगले पाहिजे म्हणून कोणत्या गोष्टींना अग्रहक्क देणें न्याय्य आहे तें निश्चित करून विरोधकांनीं आपले धोरण आंखले पाहिजे विद्यमान राज्यसंघटनेमध्ये लोकशाही मार्गांनीं प्रगति साधावयाची म्हणजे राज्यकर्त्या पक्षावर आपली तात्त्विक भूमिका न सोडतां लोक हिताच्या दृष्टीनें अंकुश लावील आणि मतदारांनीं कौल दिल्यास राज्यकारभाराची धुरा वाहण्यासही पुढें येईल असा विरोधी पक्ष असणें आवश्यक आहे. असा लोकशाही तत्त्वांवर विश्वास ठेवणारा विरोधी पक्ष महाराष्ट्रात आपली कामगिरी कशी बजावतो यावर महाराष्ट्राची कसोटी होणार आहे. या बाबतींत राज्यकर्त्या पक्षांहून भिन्न विचारसरणीच्या आणि धोरणाच्या पक्षांचीच ही कसोटी होय.

## • राजकारणाला अवास्तव महत्त्व

राज्यकर्ता पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघांनाही आपलं नव महाराष्ट्रासंबंधींच कर्तव्य ज्या प्रमाणांत पूर्ण करतां येईल त्या प्रमाणांत नवमहाराष्ट्राबाबतच्या जनतेच्या उज्ज्वल इच्छा आकांक्षा सफल होणार आहेत. त्या दृष्टीनें पाहतां एक विचार सुचतो. सध्या राजकारणाला आमच्या जीवनात अवास्तव महत्त्व देण्यांत येत आहे सर्व कांहीं राज्य सत्तेच्या द्वाराच येऊं शकते अशी एक समजूत दृढ होत आहे. परिणामतः येन केन प्रकारेण राज्यसत्ता काबीज करावी असा हव्यास निर्माण झालेला दिसतो. त्यामुळें आपलें राजकारणच रोगिष्ट बनण्याचा धोका आहे. ज्याच्या हातीं ससा तो पारधी हा न्याय चालू आहे.

* * *

## प्रमाणशीर प्रतिनिधित्व कां नको ?

### प्रा. गं. बा. सरदार यांची मुलाखत

" भारतांतील गेल्या तीन सार्वत्रिक निवडणुकांचा अनुभव लक्षांत घेतां " लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीनें परिस्थिति निराशाजनक नाही. धोके आहेत, अडचणी आहेत, पण लोकशाही या देशांत रुजूं शकेल. " असे विचार प्रा. गं. बा. सरदार यांनी व्यक्त केले.

### • स्थिर सरकार ही मुख्य गरज

अल्पसंख्य मतें मिळूनही बहुसंख्य जागा मिळाल्यानें कॉंग्रेस पक्ष अधिकारावर येऊं शकतो, विरोधी पक्षांना त्यांच्या मताच्या प्रमाणांत जागा मिळत नाहींत, हा सध्याच्या निवडणूक पद्धतींतील दोष दूर करण्यासाठीं प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीचा अवलंब करावा. अशी सूचना पुष्कळदा करण्यांत येते. पण आपणांस भारतांतील विशिष्ट परिस्थितींत सध्याचीच पद्धति योग्य वाटते असें सांगून प्रा. सरदार म्हणाले, " प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे पद्धतीने अनेक छोटे छोटे पक्ष निवडून येतील. कोणत्याच पक्षाचे हुकमी बहुमत न झाल्यानें स्थिर मंत्रिमंडळ बनविणें कठीण जाईल. ही भीति या पद्धतींत आहे. कॉंग्रेस हाच सध्या जास्तींत-जास्त प्रबळ असा अखिल भारतीय पक्ष असला तरी त्याला सुद्धा गेल्या दोन्ही निवडणुकांत एक दोन प्रदेश राज्यांत हुकमी बहुमत मिळवतां आलेलें नाहीं. मग इतर पक्षांच्या बाबतींत तर विचारच करायला नको. प्रमाणशीर पद्धति स्वीकारल्यानें या बाबतींत अधिकच अडचणी निर्माण होतील. कांही राज्यांत तरी संयुक्त मंत्रिमंडळें स्थापण्याची गरज निर्माण होईल. अशा मंत्रिमंडळाच्या कारभारांत वारंवार कसे पेचप्रसंग निर्माण होतात व कोणतेही धोरण ठामपणें अंमलांत आणणें किती जड जातें हें गेल्या पांच–सात वर्षांच्या अनुभवावरून स्पष्ट झालेंच आहे. म्हणून स्थिर सरकार हीच भारताची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याने प्रमाणशीर पद्धति स्वीकारणें मला इष्ट वाटत नाहीं.

पण प्रचलित पद्धतीप्रमाणे विरोधी पक्षांना योग्य प्रतिनिधित्व मिळत नाही. प्रभावी विरोधी पक्षाच्या अभावीं सरकारला परिणामकारक विरोध होऊं शकत नाही. त्यावर उपाय काय ? असें विचारतां प्रा. सरदार यांनीं सांगितलें कीं, व्यापक कार्यक्रमावर डाव्या पक्षांची संयुक्त आघाडी स्थापन होऊं शकली तर केव्हांहि चांगलेंच पण आज तरी तशी शक्यता नाहीं. प्रजासमाजवादी व कम्युनिस्ट यांच्या सध्याच्या भूमिका पाहता ते एकत्र येण्याचा संभव फार कमी आहे. पण एकमेकांविरुद्ध उमेदवार उभा करून मतें विभागूं द्यावयाची नाहीत यासाठीं निवडणुकी-

पुरता करार करणें त्यांना अशक्य नाहीं. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीं असा करार झाला असता तर डाव्या पक्षांना सध्यांपेक्षा निश्चितच अधिक जागा मिळाल्या असत्या.

## • संख्येची उणीव गुणवत्तेने भरून काढा

दुसरें असें कीं काँग्रेसला तुल्यबळ विरोधी पक्ष प्रतिनिधींच्या संख्येच्या दृष्टीने नजीकच्या काळांत तरी निर्माण होईल असें वाटत नाही. अशा स्थितींत संख्येची उणीव गुणवत्तेने भरून काढण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी केला पाहिजे. मोजकेच उमेदवार निवडून आले तरी हरकत नाहीं, पण ते अशा तोलाचे असले पाहिजेत कीं, त्यांचा सर्वांगीण व्यासंग, अचूक माहिती आणि प्रत्यक्ष कार्यांतील अनुभव यावर आधारलेल्या भाषणांतील टीका खोडून काढणें व विधायक सूचना अमान्य करणे अधिकारारूढ पक्षाला फार कठीण जावें. संख्या कमी असली तरी आपल्या गुणवत्तेनें आणि पायाशुद्ध भूमिकेनें असले प्रतिनिधि अधिकारारूढ पक्षावर निश्चितपणें प्रभाव पाडूं शकतील.

## • सनदशीर सत्तांतरास पुरेसा वाव

निवडणुकींत अधिकारूढ पक्षाला तो केवळ अधिकारारूढ असल्यामुळें कांही फायदे मिळतात व विरोधी पक्षांची कांही बाबतींत कुचंबणा होते असें म्हटलें जातें. आपणास याबाबत काय वाटतें असें विचारतां प्रा. सरदार म्हणाले, 'सरकार आणि सत्ताधारी पक्ष यांतील बारकावे उलगडणें पुष्कळदां सर्वसामान्य लोकांना शक्य होत नाहीं. म्हणून सरकारच्या कामगिरीचा सत्ताधारी पक्षाला फायदा मिळाल्याखेरीज राहात नाहीं पण त्या बरोबरच कांही अपरिहार्य प्रसंगांना तोंड देत असतां घडून येणाऱ्या अनिष्ट गोष्टींची जबाबदारीही ( गोळीबार, रेल्वे अपघात, सर्वसाधारण यंत्रणेंतील अकार्यक्षमता, इ. त्याला पत्करावी लागते. आणि त्यामुळे कांही तोटेही होतातच. सत्ता, पैसा व प्रचारसाधनें या बाबतींत विरोधी पक्षांची कांही प्रमाणांत कुचंबणा होत असेल पण जनतेचें पाठबळ खरोखरच त्याच्या मागे उभें असेल तर निवडणुकींत बहुमत मिळवून तो अधिकारारूढ पक्षाला सत्तेवरून खाली ओढूं शकतो. केरळमध्यें १९५७ च्या निवडणुकींत विधानसभेंत बहुसंख्य जागा मिळवून कम्युनिस्ट पक्ष अधिकारारूढ झाला. तेव्हा आपला मतदार हा निर्बुद्ध आणि केवळ सत्तापूजक आहे असे आपण म्हणूं शकत नाही. म्हणून आपल्या लोकशाहींत शांततामूलक व सनदशीर सत्तांतराला पुरेसा वाव आहे असें म्हणावयास हरकत नाही. आज आपल्या देशांत विरोधी शक्ति निर्माण होऊं शकत नाहीं याची जबाबदारी लोकांपेक्षां वेगवेगळ्या विरोधी पक्षांतील कार्यकर्त्यांवरच अधिक आहे असे मला वाटते."

## • जातीयतेस शह देण्याचा मार्ग

निवडणुकींत मतदारांवर येणाऱ्या दडपणांबद्दल बोलतांना प्रा. सरदार म्हणाले, " जातीय भावनेला दडपण म्हणणें योग्य होणार नाही. कारण त्यांत तात्कालिक प्रलोभनापेक्षा किंवा वैयक्तिक हितसंबंधांपेक्षां पूर्वसंस्काराचा व परंपरागत जाणिवेचा भाग अधिक आहे. व्यक्तीला जातीबद्दल जी ओढ आहे त्यांत संरक्षणाची अपेक्षा आणि सत्ता संपादनांतील सुकरता या गोष्टींना प्राधान्य आहे. ज्यावेळेला एकंदर वातावरण अधिक उदात्त आणि व्यापक जाणिवांनीं भरलेलें असतें त्यावेळीं सत्ताकांक्षी उमेदवार आणि मतदार जातीयतेच्या संकुचित भावनेवर मात करूं शकतात असा संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांतील अगदीं अलीकडचा अनुभव आहे. म्हणून सत्तासंघर्षातील जातीयतेच्या अनिष्ट प्रवृत्तीला परिणामकारक शह द्यावयाचा असेल तर राजकीय पक्ष, वर्गीय व व्यावसायिक संघटना यांच्या नव्या जाणीवा जनमनांत खोलवर रुजविण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. "

## • पक्षनेत्यावरील श्रद्धेचा पगडा

मतदारांच्या जागरुकतेबद्दल बोलतांना प्रा. सरदार म्हणाले कीं, जागरुकता थोडी वाढली आहे; पण पक्षाचा कार्यक्रम समजावून घेऊन मत देणारे फार थोडे. पक्षनेत्यावरील श्रद्धेचा पगडा बराच प्रभावी आहे. कॉंग्रेसला पडलेलीं मतें हीं मुख्यतः पंडित नेहरूंना पडलेलीं मतें आहेत. तसेंच प्रदेश व जिल्हा या पातळीवर ज्यांच्या हातांत संघटनेचीं सूत्रें आहेत अशा पुढाऱ्यांच्या व्यक्तित्वाचाहि थोडा बहुत प्रभाव पडतो. पण कॉंग्रेसला मिळालेल्या या प्रचंड पाठिंब्यांत या पक्षाची विचारप्रणालि आणि कार्यक्रम यावरील डोळस निष्ठेचा भाग बराच कमी आहे असे दिसून येते.

## • संधिसाधु पक्षपालट

आपल्या राजकीय पक्षांचा निकोप विकास होण्याच्या मार्गातील एक अनिष्ट प्रवृत्ति म्हणजे संधिसाधु पक्षपालट. निवडणुकीत एका पक्षाच्या तिकिटावर निवडून यावयाचें आणि निवडून आल्यानंतर मात्र पक्ष बदलावयाचा ही प्रवृत्ति थांबली पाहिजे. निवडून आलेला प्रतिनिधि हा त्या त्या मतदारसंघाचा प्रतिनिधि असतो. विशिष्ट पक्षाचा म्हणून मतदारांनी त्याला मत दिलेलें असते असें असता आपल्या सोयीप्रमाणे पक्षांतर करणें म्हणजे मतदारांचा विश्वासघात करणें होय. पक्षांतर करणाऱ्या प्रतिनिधीने नुसता आपल्या पक्षाचा राजिनामा न देतां विधान सभेंतील किंवा लोकसभेंतील आपल्या जागेचाहि राजिनामा दिला पाहिजे. हा प्रतिनिधि ज्या नव्या पक्षांत जाणार त्या पक्षानेसुद्धां त्याला एकदम प्रवेश न देतां लोकसभा किंवा विधानसभेची निवडणूक त्याने नव्या पक्षाच्या तिकिटावर लढवून

निवडून आले पाहिजे आणि निवडून आल्यानंतरच नव्या पक्षांत त्यास प्रवेश मिळाला पाहिजे. शक्यतर निवडणूक नियमांतच त्यासाठीं आवश्यक ती तरतूद करतां आल्यास तें श्रेयस्कर होईल असे प्रा. सरदार यांनीं आपले मत व्यक्त केले.

## • सत्ताधारी पक्षाने पाळावयाचीं पथ्यें

लोकशाही प्रथा आणि प्रवृत्ति आपल्या देशांत वाढीस लागण्याच्या दृष्टीनें सत्ताधारी पक्षानेंहि कांहीं पथ्यें पाळणें जरूर आहे असे सांगून प्रा. सरदार पुढे म्हणाले, निव्वळ संख्याबळावर विसंबून राहून विरोधी पक्षाच्या न्याय्य टीकेंतील ग्राह्यांशहि मान्य न करणें हे केवळ त्या पक्षालाच नव्हे तर एकंदर देशाच्या हितालाहि विघातक ठरणार आहे. म्हणून विरोधी पक्षांत बेजबाबदारपणा वाढूं नये आणि राजकीय कार्यकर्त्यांची संसदीय लोकशाहीवरील श्रद्धा कायम राहावी म्हणून राज्यकर्त्या पक्षाने अधिक उदारतेचे व समंजसपणाचे धोरण ठेवले पाहिजे. विरोधी पक्षाच्या योग्य त्या सूचना निःसंकोचपणें ग्रहण करण्याची तत्परता दाखविली पाहिजे. यामुळेंच आपले राजकीय जीवन अधिक निकोप आणि खेळीमेळीचे होईल आणि लोकशाहीच्या प्रवृत्ती बळावत जातील."

* * *

# सदोष निवडणूक पद्धतीने अन्याय

—श्री. श्रीनिवास सरदेसाई

(कम्युनिस्ट पक्षाचे एक प्रमुख नेते श्री. श्रीनिवास सरदेसाई वेळेअभावी आमच्या प्रश्नावलीस उत्तर पाठवू शकले नाहींत. पण 'महाराष्ट्रातील तिसरी सार्वत्रिक निवडणूक या त्यांच्या छोट्या पुस्तिकेत आमच्या प्रश्नावलीतील कांही प्रश्नांचें विवेचन आलेलें आहे. कम्युनिस्ट पक्ष व समितीची भूमिका स्पष्ट होण्याचे दृष्टीने त्यांतील तेवढाच भाग येथे देत आहोंत.)

गेल्या निवडणुकीपेक्षा या वेळी कॉंग्रेसनें द्रव्य, सत्ता, दहशत आणि जातीयता याचा वापर फार मोठ्या प्रमाणावर केला. हा कॉंग्रेसच्या विरोधकांचाच नव्हे तर अनेक स्वतंत्र निरीक्षकांचा अनुभव आहे. पण तसा प्रयत्न राज्यकर्त्या पक्षानें १९५७ सालीं केला नव्हता कां ! केला होता. पण तरी ही ते सर्व प्रयत्न धाब्यावर बसवून महाराष्ट्रांतील जनतेनें समितीला प्रचंड बहुमतानें निवडून दिलें. असे असता आज तीच जनता लाचलुचपतीला किंवा दहशतीला किंवा जातीयतेला बळी पडून कॉंग्रेसला मतदान करील हें म्हणणें व्यर्थ आहे. तसें म्हणणें म्हणजे जनते-

वरच अविश्वास व्यक्त करणें. वरील साधनांनीं काँग्रेसनें आपलें मतदान कांहीं अंशानें वाढविलें हे म्हणणे वेगळें व तें खरेंही आहे. पण त्या कारणांनीं समितीच्या मतांतील घट आणि काँग्रेसच्या मतांतील वाढ यांची उपपत्ति लागूं शकत नाहीं. १९५७ मध्यें समितीनें महाराष्ट्रांत घडवून आणलेली व्यापक एकजूट, तिच्यातील लढाऊ बाणा आणि जिद्द आणि त्यांतून निर्माण झालेला समितींवरील विश्वास १९६२ मध्यें मोठ्या प्रमाणावर उतरला होता; हेंच समितीच्या अपयशाचें मुख्य कारण मानलें पाहिजे. याचा अर्थ काँग्रेसवरील जनतेचे प्रेम व श्रद्धा त्या प्रमाणांत वाढली असाहि होत नाहीं, पण प्राप्त परिस्थितींत काँग्रेसशिवाय दुसरा मार्ग नाहीं. एवढा अर्थ काँग्रेसला ज्यांनीं मतें दिली त्या मतदानाचा जरूर होतो

## • सदोष निवडणूक-पद्धति

समिति व काँग्रेस यांना मिळालेल्या मतांचे व जागांचें प्रमाण सारखें नाहीं. समितीस एकुण २१·४ टक्के मतदान झालें. परंतु विधान सभेंतील फक्त १२ टक्के जागा मिळाल्या. मतदानाच्या प्रमाणानें पाहावयाचे तर समितीला ३२ च्या ठिकाणीं ५८ जागा मिळावयास हव्या होत्या. उलटपक्षीं काँग्रेसला ४८·८ टक्के मतें तर विधान सभेंत ८१ टक्के जागा मिळाल्या आहेत. मतदानाच्या प्रमाणानुसार काँग्रेसला २१४ च्या ठिकाणीं १२९ जागा मिळावयास हव्या होत्या. भारतांत प्रमाणशीर मतदान पद्धत नसल्यामुळें कायदे-मंडळांतील प्रतिनिधित्वांत हा दोष दिसून येतो. हा प्रश्न तक्रारीचा नाहीं तर राजकीय अन्यायाचा आहे. कारण निवडणूक पद्धतीच्या या दोषामुळें अल्पसंख्य मतदारांना नियुक्त संस्थांत योग्य प्रतिनिधित्व मिळत नाहीं व इतरांना त्यांच्या प्रमाणाबाहेर मिळते. व त्यामुळें चुकीचे राजकीय समजहि जनतेंत प्रसृत होतात. गेल्या खेपेस समितीचे उमेदवार फार मोठ्या प्रमाणावर निवडून आल्यामुळें "महाराष्ट्रांत काँग्रेस नेस्तनाबूद" झाली असा कित्येकांचा समज झाला होता. पण त्या वेळींही काँग्रेसला ४५·३ टक्के मतदान झालें होतें, काँग्रेस बिलकूल नेस्तनाबूद झालेली नव्हती.

## • स्पृश्य व अस्पृश्य यांची समरसता

निवडणुकींत रिपब्लिकन पक्षाच्या सभासदांना सर्वसाधारण मतदार संघात उभे करणें, स्पृश्य व अस्पृश्य भूमि-हीनांनीं हातात हात घालून जमिनीसाठीं लढणें, कामगारांच्या संयुक्त ट्रेड युनियन्स बनाविणें, या महाराष्ट्रांतील कष्टकरी व शोषित जनतेच्या जीवनांतील साध्या सुध्या घटना नाहींत, एक मोठा टप्पा आहे. महाराष्ट्रांत खऱ्या लोकशाहीची सामाजिक समतेची आणि समाजवादाची चळवळ

[ पुढील मजकूर पान ८७ वर पहा ]

# निवडणुका आणि
# मध्यमवर्गाची उदासीनता--

" सत्ताधारी वर्गाची सत्तेची मिरासदारी, लोकशाहीच्या नांवाखाली एका पक्षाची व व्यक्तीची हुकूमशाही, पक्षांतर्गत गटबाजी व वशिलेबाजी, राज्यकारभारातील अनाचार व भ्रष्टाचार या सर्व घटनांचा उबग वा वैताग येऊन निवडणुकींच्या राजकारणाबाबत मध्यमवर्ग दिवसेंदिवस अधिक उदासीन होत राहिला तर तो दोष सर्वस्वी त्या वर्गाचाच कसा म्हणता येईल?" अशा शब्दात या महत्वाच्या प्रश्नाची मीमांसा प्रा. के. गो. पंडित यांनीं या लेखात केली आहे. पण कारणे कांहींहि असोत ही उदासीनता व निष्क्रियता क्षम्य नाहीं असें सांगून ते म्हणतात " जागृत व जागरूक लोकमत ही लोकशाहीची एकमेव हमी व कसोटी आहे. स्वतंत्र भारतात ही जबाबदारी सुशिक्षित पांढरपेशा मध्यमवर्गाची आहे."

लेखकः–प्रा. के. गो. पंडित

आधुनिक लोकशाह्यांच्या उदयामुळें राज्यसत्तेच्या एकंदर कल्पनेंतच अत्यंत मूलगामी अशा स्वरूपाचें बदल घडून आले आहेत. सत्तेचें उगमस्थान आतां राजा नसून प्रजा आहे. सरकार नसून जनता आहे. सत्तेचा वापर करण्याच्या दृष्टीनें जनतेला स्वाभाविकपणेंच संघटित होणें आवश्यक होत आहे. जनतेचे योग्य प्रतिनिधित्व करतील असें जनतेचे पुढारी वा नेते निवडून देण्याची जबाबदारी सर्वस्वी जनतेची आहे.

भारताला प्रातिनिधिक सरकार देण्याबाबत चाळीस वर्षांपूर्वीं जेव्हां प्रथम गंभीरपणें चर्चा करण्यांत आली तेव्हां अशा तऱ्हेचें सरकार भारताच्या राष्ट्रीय प्रकृतीला कितपत मानवेल याविषयी अनेक शंका व्यक्त करण्यांत आल्या होत्या. अशा सरकारच्या मार्गातील नानाविध अडचणी म्हणून देशातील जातिभेद, धर्मभेद, पक्षभेद, परस्पर अविश्वास व असहिष्णुता, विभूति वा व्यक्तिपूजा, अल्पसंख्य सुशिक्षित वर्ग, सार्वजनिक प्रश्नाबाबत सामान्यपणें बहुसंख्य लोकांची अनास्था वगैरे गोष्टींचा निर्देश केला जात होता. लोकशाही स्वराज्याच्या कारभाराचा दहाबारा वर्षांचा अनुभव घेतल्यानंतर वरील शंका कुशंकांपैकीं निदान कांहीं शंका तरी सकारण अथवा साधार आहेत असें कबूल केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. आज सुशिक्षितांचा वर्ग थोडा वाढलेला दिसत असला तरी वर निर्दिष्ट केलेल्या इतर

अडचणी दूर सारण्याच्या कामीं आपल्याला कितपत यश आलें आहे याबद्दल जबर शंका आहे. व्यक्तिपूजेचे महात्म्य अद्यापि फारसे कमी झालेले आहे असे म्हणण्याला फारसा आधार नाहीं. पूर्वी महात्मा गांधी व आतां पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याबाबत भारतीय जनतेचीं सर्वसाधारण वृत्ति दुसरें कशाचे द्योतक आहे ? देशातील अंतर्गत वाद व विग्रह कमी होण्याऐवजीं उलट अधिकच वाढत व बळावत चालले आहेत.

## • लोकशाहीचे नाटक

सार्वजनिक प्रश्नांबाबत उदासीनतेचें अगदी अलीकडील उदाहरण म्हणून नुकत्याच ओरिसामध्यें झालेल्या निवडणुकीकडे बोट दाखवितां येईल. या निवडणुकींत ३० टक्के लोकांनींही मतदान करण्याचे श्रम घेतले नाहीत. सर्व साधारण रीत्या इतर ठिकाणीं अशा तऱ्हेच्या निवडणुकींचें वेळीं वरीलपेक्षां पुष्कळच अधिक प्रमाणांत मतदान होते हे खरें असले तरी तेवढ्यावरून आपण स्वतःची फसवणुक वा दिशाभूल अरून घेता कामा नये. आपल्या खेड्याबाहेर ज्यांची दृष्टि जात नाहीं अथवा त्या बाहेरील सार्वजनिक प्रश्नांचा ज्यांना गंध नाही अशा बहुसंख्य लोकांना निरनिराळी आमिषें—कायदेशीर वा बेकायदेशीर—दाखवून मतदान केंद्रावर पुढें घालून आणले जातें व त्यांची मतें राष्ट्रहिताच्या वेगवेगळ्या कार्यक्रमावर नोंदविण्याचें लोकशाही नाटक केले जाते. खऱ्या लोकशाहीला न पटणारे व न शोभणारे असले प्रकार थांबवले तर मतदान शेकडा ३० टक्के तरी होईल कीं नाही याबद्दलही जबरदस्त शंकाच आहे. आणि लोकशाहीचा शब्द न घेतां अर्थ लक्षांत घेतला तर अशिक्षित, अडाणी व असमंजस लोकांच्या ६० वा ७० टक्के मतदानापेक्षां सुशिक्षित व सुसंस्कृत लोकांचें ३०-४० टक्के मतदानच अधिक श्रेयस्कर असेंच म्हणणें भाग आहे.

## • लोकशाही मनोवृत्ति रुजली नाहीं

आपल्या देशांत सार्वजनिक प्रश्नांबाबत व निवडणुकींबाबत सर्वसाधारण जनतेंत एवढी अनास्था व उदासीनता का याचा विचार करणें भारतीय लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीनें हितावहच नव्हे तर आवश्यक ठरणार आहे कारण जाणतें व जागरुक लोकमत हीच लोकशाहीची खरी शाश्वती आहे. कदाचित वरील राजकीय अनास्था वा उदासीनतेच्या परिस्थितीला या देशाची ऐतिहासिक परंपराच थोडीफार जबाबदार असूं शकेल. ही परंपरा मुख्यत्वें लोकशाहीची नसून राजेशाहीचीच होती असें म्हणतां येईल. " राजा कालस्य कारणम् " हीच लोकांची विचारसरणी होती. भारताचा गतकालीन इतिहास म्हणजे छोट्या मोठ्या राज्यांचा आणि साम्राज्यांचा इतिहास ! लोकशाहीची कल्पना पाश्चात्य देशांच्या सान्नि-

ध्यानें व शासनव्यवस्थेनें या देशांत आली. किंबहुना लोकशाही ही पाश्चात्य देशांची—इंग्लंड अमेरिकेची—भारताला मोठी देणगी असें म्हटलें असता चालेल. स्वतंत्र होताना भारतानें लोकशाही राज्यपद्धति स्वीकारली परंतु त्या मुळें भारतीय जनतेत लोकशाही मनोवृत्ति निर्माण झाली असें म्हणता येत नाही. उपराष्ट्रपति जेव्हां वेळोवेळीं भारतांत लोकशाहीचें शरीर आहे परंतु आत्मा—सत्व—आहे की नाही याची शंका आहे असें म्हणतात तेव्हां त्यांचा रोख या लोकशाही मनोवृत्ति व प्रवृत्तीच्या अभावावरच असतो. लोकशाही ही केवळ एक शासन व्यवस्था नाहीं, तर ती एक मन:प्रवृत्ति, जीवननिष्ठीं आहे हे ध्यानांत ठेवले पाहिजे लोकशाही ही भारतांत अद्यापि बाल्यावस्थेंत आहे. सार्वजनिक प्रश्नांबाबत उदासीनता ही या बाल्यावस्थेचीच द्योतक आहे.

## • मताचा हक्क विनासायास मिळाला

सार्वत्रिक निवडणुकी व मतदानाचा हक्क याबाबतही थोडे फार असेच म्हणता येईल कीं हा लोकशाही हक्क वा अधिकार भारतीय जनतेला विनासायास मिळाला, फारच "स्वस्तात पडला." त्यासाठीं इतर लोकशाही देशांप्रमाणें जनतेला अनेक वर्षं झगडावे लागले नाहीं. भारतानें स्वातंत्र्यासाठीं लढा दिला, लोकशाहीसाठीं नाहीं. यामुळेंच मतदानाच्या हक्काची मातबरी, महत्त्व भारतीय जनतेला कळले नाहीं अशिक्षित त्याचा माकडाच्या हातीं कोलीत दिल्याप्रमाणें गैरवापर करू लागले. सुशिक्षित त्याचा वापर करण्याबाबत उदासीन राहूं लागले. निवडणुकीबाबत व मतदानाबाबत एकंदर सर्वसाधारण भारतीय जनतेची वृत्तीच बेपर्वाईची वा बेफिकिरीची. त्यांत सुशिक्षित पांढरपेशा वर्गाची वृत्ति तर अधिकच बेफिकीरीची असे दिसून येते. वास्तविक सुशिक्षित जनता म्हणजे मुख्यत्वेकरून मध्यमवर्गीय पांढरपेशी जनता. हा वर्ग म्हणजे समाजाचा कणा. इतर वर्गासाठीं राजकीय नेतृत्व पुरविण्याची बौद्धिक जबाबदारी खरें पाहिले असतां या वर्गाची. हा वर्ग सुविद्य असतो. वृत्तपत्रे वाचतो. राजकारणाची चर्चा करताना दिसतो. परंतु प्रत्यक्ष कृति करावयाला क्वचितच पुढें सरसावतो. हा निवडक समाजच सार्वजनिक प्रश्नाबाबत वा निवडणुकीबाबत क्रियाशून्य राहिला तर देशात लोकशाहीची वा प्रातिनिधिक सरकाराची निकोप वाढ होईल अशी आशा कशी बाळगावयाची ?

## • शिक्षक व पदवीधरांची अनास्था

सुशिक्षित मतदारांची निवडणूक व मतदानाविषयीं बेपर्वाई कोणत्या थराला जाऊ शकते याची प्रचीति वरिष्ठ कायदेमंडळाच्या निवडणुकांचे संदर्भात चांगलीच दिसून येते. उदाहरणार्थ राज्यघटनेनें या कायदेमंडळावर पदवीधर व शिक्षक

यांच्यासाठीं खास प्रतिनिधित्व ठेवले आहे. म्हणजे एका अर्थानें ह्या निवडणुकी "अप्रत्यक्ष" निवडणुकीसारख्याच आहेत. प्रत्यक्ष निवडणूक पद्धतीपेक्षां अप्रत्यक्ष निवडणूक पद्धति चांगली असा युक्तिवाद करतांना असे सांगितले जाते कीं अशा निवडणुका अधिक जाणत्या व जबाबदार लोकांकडून केल्या जातात व म्हणून त्या लोकशाहीच्या दृष्टीनें अधिक महत्वाच्या ठरतात. शाळा कॉलेजातील अभ्यासू व अनुभवी शिक्षक व विद्यापीठाचे पदवीधर यांच्यापेक्षां अधिक सुविद्य व सुबुद्ध मतदारसंघ आणखी कोणता असू शकेल ? असें असतां या मतदारसंघातर्फें होणाऱ्या निवडणुकाचे वेळीं मतदान १५ ते २० वा २५ ते ३० टक्के इतकेच होते हें कशाचें निदर्शक ? विशिष्ट हितसंबंधाचें संरक्षण व संवर्धन होण्यासाठीं दिलेल्या खास प्रतिनिधित्वाची संबंधित सुशिक्षितांकडून जेथें ही अनाकलनीय व असमर्थनीय उपेक्षा केली जाते तेथे सार्वत्रिक निवडणुकाबाबत सामान्य जनतेनें उपेक्षा वृत्ति दाखविल्यास आश्चर्य तें कसलें ?

सध्या नव्या महाराष्ट्र राज्यांत वरिष्ठ कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी वरील दोन्ही मतदारसंघांच्या नव्या मतदार याद्या तयार करण्याचे सरकारी काम सुरू आहे. जुन्या-नव्या सर्व मतदारांनीं नवे नोंदणी अर्ज नोव्हेंबर ७ च्या आंत भरून पाठविण्यासंबंधीं सरकारी पत्रके निघाली होती. संबंधित लोकांपैकीं सांगण्यास शरम वाटेल इतक्या थोडया लोकांनीं या पत्रकांची दखल घेतल्यामुळें सरकारी निवडणूक खात्यातर्फें संभाव्य मतदारांना व्यक्तिगत पत्रे पाठविण्याचें काम सध्यां सुरू झाले आहे. इतकेही करून बहुसंख्य पदवीदार व शिक्षक मतदार वाढविलेल्या मुदतीच्या आंत आपले अर्ज पाठवितात किंवा नाहीं याबद्दल सरकारी अधिकारी बरेच साशंक असल्यासारखे दिसतात. हा सर्व विस्मयकारक खेदजनक प्रकार सुशिक्षित पदवीधरांच्या व मध्यमवर्गींच्या एकंदर मनोवृत्तीवर चांगलाच प्रकाश पाडीत नाही काय ? सरकारी पत्र-पत्रकांच्या जोडीला निवडणुकीसाठीं उभे राहणाऱ्या संभाव्य उमेदवारांकडून होणाऱ्या खासगी प्रयत्नांना ही असाच थोडाफार निराशा जनक अनुभव येत असल्याचे ऐकण्यांत येते "बघूं हो" "काय घाई आहे ?" "काय करावयाचें आहे नांव नोंदवून" "कशाला जायचें मत द्यायला ?" "कोण करतो त्रास" "आम्हाला काय त्यांत लभ्यांश" अशा तऱ्हेची मुक्ताफळें उमेदवारांच्या किंवा त्यांच्या प्रचारकांच्या कानांवर पडतात. सुशिक्षित पदवीधरांची नागरिक हक्क-कर्तव्य वा जबाबदाऱ्याबाबत ही जाणीव, समाज व देशहिताबद्दल ही कळकळ, वैचारिक मूल्यें व पातळी पाहिल्यानंतर या देशांत विशुद्ध लोकशाही कशी रुजणार व रुळणार याविषयीं खरोखरच विचारवंतांना चिंता वाटल्याखेरीज रहाणार नाहीं.

## • उबग यावा अशीच परिस्थिति

अर्थात सार्वजनिक प्रश्नाबाबत वा निवडणुकीबाबत पांढरपेशा मध्यमवर्गाच्या उपेक्षेला वा उदासीनतेला दुसरीही बाजू आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. देशाची राजकीय धोरणें आज अशाच रीतीनें आखली जात आहेत कीं त्यांत सुशिक्षित, स्वतंत्र वृत्तीच्या व स्वाभिमानी वर्गाला प्रत्यक्ष भाग घेण्यास विशेष उत्साह वाटूंच नये. पांढरपेशा मध्यमवर्ग हा बव्हंशी बुद्धिजीवि वर्ग आहे. आजचा सत्ताधारी पक्ष वा सरकार श्रमजीवि वर्गाची काळजी करते. त्यांची आर्थिक सामाजिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करते. कारण बहुसंख्य मतदार ते आहेत. निवडणुकींतील यश त्यांच्या मतावर अवलंबून आहे. सत्ताधारी पक्ष भांडवलदार वा धनिक वर्गांचीही मर्जी सांभाळतो. कारण त्यांच्याजवळ पैसा आहे. निवडणुकां-साठीं लागणारा अवाढव्य खर्च त्यांच्या देणग्यांमुळेंच भागवितां येतो. मध्यमवर्गा-जवळ ना मतांची मोठी संख्या, ना संपत्तीचा मोठा साठा ! सत्तेचें राजकारण सदासर्वदा खेळत रहाणाऱ्या सरकारनें मध्यम वर्गाची पर्वा कशासाठीं करावी ? सध्याच्या अर्थव्यवस्थेत खालच्या वर्गाचे जीवनमान उंचावत आहे. वरचा वर्ग लखपती कोट्याधीश होत आहे. मध्यमवर्ग मात्र महागाई आणि बेकारी यामध्यें अक्षरशः भरडून पिचून निघत आहे. सामाजिक व आर्थिक कायदे त्याच्याच पिळवणुकीला कारणीभूत होत आहेत. निवडणुकीसाठीं उभे करावयाच्या उमेद-वारांच्या यादींत त्यांचा अंतर्भाव नाहीं. अधिकारी व मंत्रीपदाच्या जागांत लायकी असून त्यांना वाव नाहीं. अशा परिस्थितींत पांढरपेशा मध्यमवर्गाला एक प्रकारच्या वैफल्यानें व नैराश्यानें ग्रासलें असल्यास तें सहज समजण्यासारखे आहे. आहे ही परिस्थिति अशीच चालू राहिली अथवा अधिकच चिघळली तर मध्यम वर्गाचें अस्तित्व उरेल किंवा नाहीं अशीं साधार भीति व्यक्त करण्यांत येत असल्यास नवल नाहीं. सत्ताधारी पक्षाची सत्तेची मिरासदारी, लोकशाहीच्या नांवाखाली एका पक्षाची वा व्यक्तीची हुकुमशाही, पक्षांतर्गत गटबाजी व वशिलेबाजी, राज्य-कारभारांतील अनाचार, भ्रष्टाचार या सर्व घटनांचा उबग वा वैताग येऊन निवडणुकीच्यां राजकारणाबाबत मध्यमवर्ग दिवसेंदिवस अधिक उदासीन होत राहिला तर दोष सर्वस्वी त्या वर्गाचाच कसा म्हणतां येईल ? या परिस्थितींत सुधारणा करण्याला आपण सर्वस्वी असमर्थ आहोत या पराभवी भावनेनें ग्रासल्या-मुळें हा वर्ग किंकर्तव्यतामूढ बनला असेल तर त्याबद्दल सर्वस्वी त्यालाच अपराधी कसे ठरवितां येईल ? पांढरपेशा मध्यमवर्ग बुद्धिजीवि, स्वतंत्र विचाराचा, निर्भीड वृत्तीचा असतो. आजच्या पक्षीय राजकारणांत त्याला स्थान नाहीं आणि मानही नाहीं. माजी अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुखांच्या राजकीय जीवनाचा शोक-पर्यवसायी इतिहास याबाबतींत सतत साक्ष देत राहील.

मराठी ग्रं... संग्रहालय ... ग्रं. क्र. ........

## • निष्क्रियता क्षम्य नाहीं

परंतु वरील परिस्थिति कितीही खरी असली, निरुत्साहजनक असली तरी तेवढयानें पांढरपेशा मध्यमवर्गाचे निष्क्रियतेचें धोरण केव्हांही क्षम्य वा समर्थनीय ठरत नाही. सुशिक्षित जनता हा लोकशाहीचा भक्कम पाया आहे. जागृत व जागरूक लोकमत ही लोकशाहीची हमी व कसोटी आहे. स्वतंत्र भारतांत ही जबाबदारी सुशिक्षित पांढरपेशा वर्गाची आहे मध्यमवर्गांजवळ संख्याबल नसेल अथवा संपत्ति बलही नसेल परंतु त्याच्याजवळ बुद्धिबल विपुल आहे. बाल्यावस्थेत असलेल्या भारतीय लोकशाहीला त्याचीच सर्वात अधिक जरूरी आहे. राजकारण हा बुद्धि-बळाचा डाव आहे असें म्हणतात. " बुद्धिर्यस्थ बल तस्य " बुद्धि हेंच अखेर बळ ठरते. वर्तमानकाळ मध्यमवर्गाला प्रतिकूल वाटला तरी भविष्यकाळ अनुकूल होणार नाहीं असें मानण्याचें कारण नाहीं. देशाच्या सर्वांगीण विकासाला हाता-इतकीच किंवा त्यापेक्षा अधिक डोक्याची गरज असते. समाजवादाच्या दिशेनें वाटचाल करीत असलेल्या देशांत यापुढें वरिष्ठ वा कनिष्ठ, खालचा वा वरचा असे वर्ग न रहाता मध्यमवर्गाच्या पातळीवरच सर्व वर्ग स्थिर होतील व मध्यम वर्ग हा एकच वर्ग राहील असाच आज संभव दिसत आहे. सर्व समाजाचें व देशाचे नेतृत्व व कर्तृत्व या वर्गाच्याच हातीं येणार आहे. भविष्यकाळावर नजर ठेऊन मध्यमवर्गानें आपलें सध्याचें दैन्य व औदासिन्य सोडून देणें व लोकशाहीतील त्याचे हक्क व जबाबदाऱ्या चोख रीतीनें बजावणें हें त्या वर्गाच्याच नव्हे तर समाजाच्या व राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें सर्वथैव उचित आहे. मध्यमवर्गात ही कर्तव्य जागृति होईल का ?

• • •

# पक्षाधिष्ठित लोकशाहीच्या उणीवा

( आपल्या निवडणुका व लोकशाही, पक्ष पद्धतीशीं निगडित आहे. अशा प्रकारच्या लोकशाहीस प्रत्यक्षात कसे विकृत रूप येते हे प्रसिद्ध समाज शास्त्रज्ञ श्री. नर्मदेश्वर प्रसाद यांनी एका भाषणात विशद केले. ‘ सोशालॉजी, सोशल रिसर्च अँड सोशल प्रॉब्लेम्स इन इंडिया ’ या पुस्तकांत समाविष्ट केलेल्या त्यांच्या या भाषणातील महत्वाचा भाग येथें दिला आहे. )

जात आणि लोकशाही एकमेकांशी विसंगत आहेत—गेल्या दोन सार्वत्रिक निवडणुकात मुख्यता जातीचाच विचार करून मतदान झाले. निरनिराळ्या जातींच्या लोकसंख्येचे पायावरच उमेदवार निवडणुकीत विजयी झाले किंवा पडले.

राजकीय पक्ष, त्यांची भूमिका, कार्यक्रम किंवा विचारसरणी यांना सार्वत्रिक निवडणुकीत फारच थोडे महत्व होते. सांगाडा लोकशाहीचा पण आत कुडी मात्र जातीची यामुळे आपल्या लोकशाहीला जातशाहीचे विकृत रूप आले.

... संसदीय लोकशाही आपल्या देशात फारशी रूजू शकलेली नाही हे नाकारता येणार नाही. आपल्या संस्कृतीच्या फक्त वरच्या थरांना तिनें स्पर्श केला आहे. या स्वरूपाची लोकशाही प्रबळ राजकीय पक्षावर अवलंबून असते.

...अधिकारारुढ पक्षास कित्येकदा जेमतेम बहुमत मिळालेले असते व बहुसंख्य लोकांच्या मतापेक्षा अल्पसंख्य मताचेच प्रतिनिधित्व हा पक्ष करीत असतो ...दुसरे असें कीं देशावर राज्य संसदेतील पक्षाचे नव्हें तर संसदेबाहेरील पक्षाचे असते कारण सरकार बनविण्यांत आणि देशावर राज्य करण्यात त्याचाच वाटा असतो. या राजकीय पक्षाचे एक कार्यकारी मंडळ असते. त्यात सर्व प्रमुख नेते असतात. कार्यकारिणीत पंचवीस ते तीस सभासद असतात. पक्षाचे धोरण कार्यक्रम आणि विधिमंडळाच्या प्रतिनिधींचीं निवड याच पंचवीस तीस व्यक्ती ठरवितात. या कार्यकरिणीतसुद्धा बहुमतानें निर्णय घेतले जातात. एखाद्या सूचनेबाबत १३ अनुकूल व १२ प्रतिकूल मते पडून अवघ्या एका जादा मताने धोरण ठरते. या तेरा सभासदातसुद्धा तीन, पांच किंवा सात सभासदच खरे निर्णय घेणारे असतात. एखाद्या राजकीय पक्षात रुझवेल्ट, चर्चिल किंवा नेहरूंसारख्या व्यक्ती असल्या म्हणजे सर्व परिस्थिति त्यांच्याच हाती असते. लोकशाही पद्धतीनें काम करावयाचे की आपली मते हुकूमशाही पद्धतीने पक्षावर लादावयाची हे त्यांनीच ठरवावयाचें असते. अल्पसंख्य व्यक्तींच्या किंवा एका व्यक्तीच्या हुकूमशाहीचे तत्व याप्रमाणें पक्षपध्दतींत अंगभूतच आहे. इंग्लंडमध्ये तसे नेहमी घडत नाही ही काही त्यविरुद्ध हमी नव्हे. राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नावर अर्थमंत्रिपदाचा राजिनामा देताना श्री. सी. डी. देशमुख यांनी जे निवेदन केले ते यासंबंधात लक्षांत घेतले पाहिजें. मध्यवर्ती मंत्रिमंडळात एक सुपर कॅबिनेट आहे असें त्यांनी म्हटले होते. लोकशाहीत व्यक्ति महात्म्यामुळें अल्पसंख्य मत प्रभावी न ठरता बहुमत प्रभावी असेल तर त्यासाठीं आवश्यक अशी संस्थात्मक नियंत्रणे पक्षपद्धतीवर आधारलेल्या लोकशाहीत अजून निर्माण व्हावयाची आंहेत.

हिंदमधील सध्याची परिस्थिति तर अधिकच गोंधळाची आहे. कारण येथें एकच प्रभावी राजकीय पक्ष असून बाकी पांच सहा पक्ष कमकुवत आहेत. अल्पसंख्य मते मिळवूनहि कॉंग्रेसपक्ष निर्णायक बहुमत मिळविण्यांत यशस्वी होतो बहुसंख्य मते अनेक छोट्या राजकीय पक्षात विभागली जातात. प्रत्येक राजकीय पक्ष सारखीच विचारसरणी व कार्यक्रम मांडतो तेव्हां तर परिस्थिति अधिकच हास्यास्पद होते. मागासलेली अर्थ व्यवस्था असलेल्या आपल्या देशात अधिकारारुढ पक्ष

आणि विरोधी पक्ष यांच्यातील एकमताचे क्षेत्र जास्तीत जास्त वाढविणें परिस्थितीनेच आवश्यक आहे असें सिद्धांत मधून मधून मांडले जातात. वस्तुस्थिति अशी आहे कीं हिंदसारख्या देशांत विरोधी पक्षांचे स्थान व भूमिका स्पष्ट नाहीं कित्येकदा अजागल स्तनाप्रमाणें ते अनावश्यक वाटतात.व कांहीं वेळा ते लुटुपुटूची लढाई करीत असल्याचे दिसते.

पक्ष पद्धतीचे ऐतिहासिक कार्य संपले आहे असें मला वाटते. लोकशाहीच्या विकासासाठीं ते यापुढें योग्य साधन ठरूं शकणार नाहीं. निरनिराळ्या राजकीय पक्षांची स्वेच्छेने आत्मविसर्जन करणे हा लोकशाहीचा उद्देश आहे. हिंदच्या सध्याच्या परिस्थितीतही या दिशेने थोडी सुरवात करता येईल. खेडे शहर किंवा जिल्हयाचा कारभार पक्षरहित पायावर चालविणे शक्य आहे.वरिष्ट पातळीवरहि पक्षरहित सरकार स्थापन करणें शक्य आहे. एकाच राजकीय पक्षाचे नव्हें तर पार्लमेंटांतील सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी असलेले मंत्रिमंडळ स्थापन करता येईल. प्रत्येक पार्लमेंटात स्पीकर असतो त्याची निवड झाल्यानंतर तो विशिष्ट पक्षाचा न राहाता पक्ष रहित भूमिकेवर कार्य करतो हेच तत्व मंत्रिमंडळास लावता येईल. खऱ्या निवडणुका पक्षाचे पायवर लढविल्या जातात. पण निवडून आल्यानंतर सभासदांनीं आपला विशिष्ट पक्ष सोडून सर्व पार्लमेंट सभासदांचा एक मतदारसंघ बनवावा व त्यातून मंत्रिमंडळाची निवड करण्यांत यावी.

• • •

राजकीय पक्षांचे धोरण व कार्यक्रम निवडणूक जाहीरनाम्यांत स्पष्टपणें मांडलेला असतो. त्यातील आर्थिक धोरणाच्या भागाचा तुलनात्मक आढावा या लेखांत घेतला आहे.

## पक्षांची आर्थिक धोरणें

# एक तौलनिक छाननी

लेखक : म. त. दा.

मतदारांना आवाहन करण्यासाठीं निवडणुकीच्या आखाड्यांत उतरलेले विविध पक्ष आपले जाहीरनामे प्रसिद्ध करतात. त्यांचा आढावा निवडणुकीच्या निमित्तानें घेणें उद्‌बोधक ठरेल असें वाटते. प्रत्येक जाहीरनाम्यांत तो तो पक्ष आपापल्या तत्त्वप्रणालीला ध्येयवादाला अनुसरून विविध क्षेत्रांसाठीं कार्यक्रम आखून मतदारांपुढे मांडतो. निवडणुकींत मुख्यत्वें अखिल भारतीय पातळीवर कॉंग्रेस, प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट, स्वतंत्र व जनसंघ हे पाच पक्ष आहेत. यापूर्वीच्या १९५७ च्या निवडणुकींत स्वतंत्र पक्ष वगळतां बाकी पक्ष अस्तित्वांत होते. त्यांच्या दोन्ही निवडणूक जाहीरनाम्यांचा तौलनिक परामर्शहि आपल्याला अनेक प्रकारें मार्गदर्शक ठरावयास हरकत नाहीं. त्यामुळें विविध पक्षांतील तफावत आणि त्या त्या पक्षाच्या धोरणांतील बदलहि आपल्याला कळून यावा. अर्थात् निवडणूक जाहीरनाम्यांतील सर्वच क्षेत्रांतील—सामाजिक, राजकीय व आर्थिक आश्वासनांचा आढावा घेणें एका लेखाच्या मर्यादेबाहेरचें आहे. म्हणून केवळ आर्थिक कार्यक्रमाचाच विचार या लेखांत करण्याचा इरादा आहे.

### • समाजवादी भूमिकेशी जवळीक

एक गोष्ट प्रथमत: आपल्या चटकन् लक्षांत येते ती ही की आधुनिक काळांत समाजवादी भूमिकेशीं कमी अधिक जवळीक दाखविल्याशिवाय कोणत्याहि राजकीय पक्षाला लोकशाही निवडणुकींत सहभागी होणें कठीण बनलें आहे. मग एकादा जातीयवादी पक्षहि आपल्या दृष्टिकोणाशीं समाजवादाचें नाते लावून कांहीं कार्यक्रम लोकांपुढें ठेवण्याचा प्रयत्न करतांना आढळून येतो ! नव्याने अस्तित्वांत आलेल्या स्वतंत्र पक्षालाहि श्रमिक, मध्यमवर्गीय आणि ग्रामीण गरीब जनतेला आकृष्ट करणारा कार्यक्रम आखला असल्याचें आवर्जून सांगावे लागते. तेव्हा या विविध पक्षांत एकादाच मूलभूत फरक दृष्टिकोणांत असल्याचे विशिष्ट कार्यक्रमावरून आढळून आलें तरी बहुसंख्य आश्वासनांतील फरक केवळ चढा-ओढीच्या स्वरूपाचाच आहे असे आढळून येईल. भारतासारख्या मागासलेल्या

देशांत पददलित मागासलेला वर्ग, ग्रामीण शेतकरी वर्ग, कामगार वर्ग यांना आवाहन केल्याखेरीज कोणत्याहि राजकीय पक्षाला निवडणुका जिंकण्याची आशा करणें अवघड आहे, जवळ जवळ अशक्य आहे असे म्हटलें तरी चालेल. पण ही आश्वासनें प्रत्यक्षांत कोणता पक्ष कोण कोणत्या मार्गांनी व किती प्रमाणांत पूर्ण करील हें कळण्याइतपत बहुसंख्य भारतीय मतदार सुजाण आहे ,असें म्हणण्याइतपत सबळ पुरावा अद्यापि उपलब्ध व्हावयाचा आहे. निवडणुकीनंतर सत्तेवर आलेल्या पक्षाला जनतेच्या किमान व निकडीच्या गरजा भागविण्यासाठीं विकास योजना आखून मागस देशाला पुढें नेण्याचे प्रयत्न करणें अपरिहार्यच आहे. योजनेच्या अंमलबजावणीत दोष निर्माण झाले तरी जमेच्या बाजूला साहजिकच अधिक असते. तशांत नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशांत पारतंत्र्याच्या काळांत राष्ट्रीय पक्ष म्हणून भरीव कार्य केल्याची पार्श्वभूमि एखाद्या राजकीय पक्षाला असली म्हणजे ती पुण्याई अधिकच कामाला येते. अन्य पक्षांना दोष दाखविण्याचे, टीका टिप्पणी करण्याचें कार्य करावें लागतें. व त्याचा कमी अधिक प्रभाव राज्यकारभारावर पडला म्हणजे तेवढ्यापुरते श्रेय त्यांच्या पदरांत पडले तरी अंमलबजावणी केल्याबद्दलचें श्रेयहि लाटता येतें ! देशांत प्रबळ विरोधी पक्ष अस्तित्वांत नसला तर वर्षानुवर्षें सत्तेवर असलेल्या पक्षाचे एकूण कार्य अधिक सुकर बनते. स्थान स्थिर होण्यास मदत होते. एकादा तुल्यबल विरोधी पक्ष अखिल भारतीय पातळीवर निर्माण व्हावयास हवा, ती एक आजची गरज आहे, असें जे पुष्कळदा म्हटलें जाते त्यामागील अर्थ आपल्या सहज लक्षांत येईल. तो निर्माण होण्यात मात्र अनेक अडचणी आहेत हे आपण पाहतोच आहोंत. भारतांत आज अखिल भारतीय पातळीवर कॉंग्रेसखेरीज कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी, स्वतंत्र, जनसंघ असे अन्य पक्ष आहेत असें म्हटले तरी एकेकाची शक्ति कमीच पडते हें आपल्याला माहीत आहे. जनसंघ व स्वतंत्र हे तुलनेने नवीन पक्ष आहेत आणि त्यांची शक्ति वाढत आहे असें दिसून येत असलें तरी त्यांचे सुनिश्चित भवितव्य सांगता येण्याइतका काळ अद्यापि लोटलेला नाहीं. साम्यवादी व प्रजासमाजवादी पक्ष त्या अर्थानें जुने असले तरी अनेक कारणांनी त्यांना वेळोवेळीं पीछेहाट घेण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली व त्या त्यावेळीं त्यांचा शक्तिपात झाला. त्याचा फायदा सत्तारूढ पक्षाने न उचलला तरच नवल.

## • १९५७ चे जाहीरनामे

ही सामान्य पार्श्वभूमि पाहिल्यानंतरहि लोकशिक्षण व लोकजागृति यासाठीं प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यक्रमाचा तौलनिक आढावा घेणें हितकर ठरेल, असें वाटतें. आधी १९५७ च्या निवडणुकीच्या आखाड्यांते जे पक्ष उतरले होते त्यांच्या त्या वेळच्या जाहीरनाम्यांतील तपशील पाहूं या.

सर्व पक्षांच्या दृष्टीनें शेती व शेतकरी, उद्योग व कामगार, बेकारी आणि लोकसंख्या, करविषयक धोरणें हे महत्त्वाचे प्रश्न होते. यांना पूरक असलेल्या शिक्षण व आरोग्यविषयक कार्यक्रमाच्या तपशीलांत विविध पक्षांत फरक नव्हता, असें म्हटलें तरी चालेल. जनसंघाची सुपरिचित प्रकृति लक्षांत घेतल्यानंतर संरक्षण, सांस्कृतिक शिक्षण यांना अनुलक्षून असलेल्या त्यांच्या कार्यक्रमाची कल्पना सहज करतां यावी. पण फरक पडतो तो एवढाच. बाकीच्या कार्यक्रमांतील फरक हा केवळ कमीअधिक तपशीलाचा. शेतीउत्पादन वाढलें पाहिजे, कसेल त्याची जमीन झाली पाहिजे, लघु उद्योगांना महत्त्व दिले पाहिजे, सहकाराची कांस धरली पाहिजे, बेकारी दूर झाली पाहिजे, आर्थिक विषमता कमी होणें आवश्यक आहे हे उद्देश १९५७ सालच्या सर्वच जाहीरनाम्यांत होते व आजहि ते आहेतच.

## • शेतीविषयक कार्यक्रम

काँग्रेसनें शेतीबाबत १९५७ सालीं पुढीलप्रमाणें कार्यक्रम जनतेपुढें मांडला होता—कसेल त्याची जमीन व त्यातील मध्यमजनाचें ( इंटरमीडियरीज ) उच्चाटन करावयाचें. जमिनीच्या मालकीची कमाल मर्यादा ठरवून द्यावयाची. मर्यादित स्वरूपांत शेतीचें यांत्रिकीकरण करावयाचें. गहन स्वरूपांत शेती करावयाची आणि शक्य तेथें सहकारी संघटनांचा उपयोग करावयाचा. प्रजासमाजवादी पक्षानें कुळाची हकालपट्टी करण्याच्या प्रवृत्तीला पायबंद घालण्याचें आश्वासन दिलें होतें. आणि जेथें अशी उदाहरणें आढळून येतील तेथें कुळांना परत जमिनी देण्याचें आश्वासन दिलें होतें. जमिनीच्या मालकीची कमालमर्यादा, सहकारी संस्थांद्वारा खरेदीविक्री याचा उल्लेख त्यांनीहि केला होता. शेतमालाच्या किंमतीबाबत धोरण आखणें, बेकाम शेतकरी मजुरांची संघटना उभारणें हे कार्यक्रम त्यांत नव्यानें दिसले. कम्युनिस्टांचा कार्यक्रम शेतीबाबत याहून निराळा नव्हता. फक्त गैरहजर ( न कसणाऱ्या ) जमीन मालकांना त्यांच्याकडून घेतलेल्या जमिनीबद्दल नुकसान-भरपाई देण्याबाबतचें आश्वासन पुढें ढकलणें, एवढाच भाग नव्यानें उठून दिसतो. जनसंघाच्या कार्यक्रमात जमीनमालकीच्या कमाल धारणेबाबत उल्लेख नव्हता. शेतीचें यांत्रिकीकरण करीत असतांना जास्तीत जास्त लोकांना रोजगार देण्याचें धोरण जाहीर केलें होतें.

ग्रामोद्धारविषयक कार्यक्रम सर्व पक्षांच्या जाहीरनाम्यांत होता. काँग्रेसनें स्थानिक नेतृत्व निर्माण व्हावें म्हणून व शहरे व खेडी यांत दुवा सांधण्यासाठीं सामूहिक विकास योजनांना प्राधान्य देण्याचा निर्णय केला होता. बाकीच्या सर्व पक्षांनीं ग्रामपंचायतींची पुनर्रचना करण्याची घोषणा केली होती, त्यांना अधिक सत्ता व निधि द्यावयाचे व तेथील दुर्लक्षित, शक्तिहीन वर्गाकडे विशेष लक्ष द्यावयाचे अशी आश्वासनें दिलेली होती.

## • औद्योगिक धोरणें

कॉंग्रेसचे १९५७ चें औद्योगिक धोरण " लवचिक " म्हटलें पाहिजे. मोठ्या, मध्यम व छोट्या सर्व उद्योगांना प्रोत्साहन देऊन अपरिहार्य असेल तर केंद्रीकरण व शक्य तेथें विकेंद्रीकरण करावयाचें असें तें धोरण होतें. प्रजासमाजवादी पक्षाने प्रादेशिक समतोल साधण्यावर भर दिलेला होता. कामगारांना उद्योग व्यवस्थेत सहभागी करणें, एकमेवाधिकार प्रवृत्तीला ( मानॉपोलि ) पायबंद घालून सरकारी प्रोत्साहनानें मध्यम उद्योगांची उभारणी करणें असाहि कार्यक्रम होता. जनसंघाने संरक्षणविषयक उद्योगांना प्राधान्य दिलें होतें. अन्य उद्योग गृहोद्योग व ग्रामोद्योगांना पूरक होतील अशा रीतीने संघटित करण्याचा इरादा व्यक्त केला होता. कम्युनिस्टांच्या दृष्टीनें प्रचंड उत्पादक उद्योग हें महत्वाचे होतें

कामगारांच्या वेतनाबाबत राष्ट्रीय किमान वेतन निर्धारित करून देऊन क्रमाक्रमानें आर्थिक समानता प्रस्थापित करण्याचें आश्वासन कॉंग्रेसच्या त्यावेळच्या जाहीरनाम्यात होतें. प्रजासमाजवादी पक्षानें शेतीबाबत किमान वेतन नेमून देण्याचें आश्वासन दिलें. याखेरीज उद्योगाच्या नफ्यांत कामगारांना सहभागी करण्याचाहि निर्णय जाहीर केला होता. कम्युनिस्टांनी कामगारांच्या वेतनांत २५ टक्के वाढ करण्याचें व उत्पन्नाबाबत कमाल मर्यादा घालण्याचें आश्वासन दिलें होतें. जनसंघाच्या मतें कमाल व किमान वेतन मर्यादा दरमहा रु. २००० ते रु १०० असावी व हे प्रमाणहि क्रमाक्रमानें / १० : १ या प्रमाणांत आणण्याचें आश्वासन दिलें होतें.

राष्ट्रीयकरणाबाबत कॉंग्रेसचे धोरण १९५७ साली लवचिकच होतें. नियोजन वा निकड यामुळें अनिवार्य बनलें तर उद्योगाचें अर्थरचनेंतील स्थान लक्षांत घेऊन राष्ट्रीयकरण करावयाचें नाहीं तर खासगी उद्योगांनाहीं प्रोत्साहन द्यावयाचें असें तें धोरण होतें. प्रजासमाजवादी पक्षानें बँका, खनिज तेलें, मोठे मळें, निवडक वस्तूंचा ठोक व विदेशी व्यापार यांचें राष्ट्रीयकरण करण्यांचे अभिवचन दिलें होतें. लहान उद्योगांना अर्थात यातून वगळण्यांत आले होतें. कम्युनिस्टांचा कार्यक्रम याहून भिन्न नव्हता. जनसंघानें विदेशी नियंत्रण असलेल्या उद्योगांचे भारतीकरण करण्याची तयारी दर्शविली होती.

## • करविषयक धोरण

करविषयक धोरणाबाब्रत १९५७ साली काय आढळले ? कांग्रेसचें धोरण ढोबळपणें निवेदन करण्यांत आलें होतें. ज्यांना करभार सहन करण्याची शक्ति आहे त्यांच्यावर करभार विशेष टाकावयाचा असें धोरणाचें सूत्र होतें. पण कर आकारणीवाचून अर्थात गत्यंतर नव्हते कारण उपलब्ध सांपत्तिक साध-

नेच तुटपुंजी होती. विदेशी मदतीचें स्वागत करण्यांत आलें होतें. त्यांत देशोदेशांत प्राधान्यक्रम असा कांही नव्हता. कोठल्याहि देशांकडून मदत स्वीकारण्याची तयारी होती. महागाईला आळा घालण्यासाठी मूल्य नियंत्रण आणि बचतीला प्रोत्साहन हे या धोरणाचे अन्य पैलू होतें. प्रजासमाजवादी पक्षानें मोठ्या उद्योगांवर अधिक कर आकारणी करण्याचा हेतु जाहीर केला होता. संस्थानिकांचे तनखे बंद करून त्यांना सामान्य कर आकारणीस पात्र ठरविण्याचाहि निर्णय होता. अन्नधान्य व अत्यावश्यक वस्तूंवर कर आकारणी करावयाची नाहीं, विक्रीकर अधिक सोपा व सुगम करावयाचा आणि करबुडव्यांना जास्तीत जास्त शासन करावयाचे अशींहि आश्वासनें जाहीरनाम्यात होतीं. कम्युनिस्टांचा करविषयक कार्यक्रम याहून भिन्न नव्हता गुप्त संचित संपत्ति सक्तीने कर्ज म्हणून सरकारनें ताब्यात घ्यावयाची या एका नवीन गोष्टीचा उल्लेख करतां येईल. जनसंघाने विक्री कर काढून टाकण्याचे आश्वासन दिलें होतें.

## • विकासाचा वेग कमी

काँग्रेस, प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट, जनसंघ यापैकी काँग्रेसला आपला कार्यक्रम प्रत्यक्षांत उतरविण्याची संधि मतदारांनी १९५७ च्या निवडणुकीत दिली. त्यावेळच्या निवडणूक जाहीर नाम्यातील कांहीं आश्वासनांची योजनांतर्गत तरतूद करून परिपूर्ति करण्याचा कमी अधिक प्रयत्न काँग्रेसने नंतरच्या पांच वर्षांत केला. काँग्रेसमध्यें सर्व प्रकारचे विचारप्रवाह आजमितीलाहि आहेत. व ते परस्परांना विविध दिशांनीं खेचीत आहेत. त्याचें प्रतिबिंब त्यांच्या विद्यमान सरकारांत (मध्यवर्ती व राज्यांतील ) पडलेलें आपण प्रत्यही पाहतो. त्यामुळें समाजवादी धोरणाचा उद्घोष असूनहि अनेकदा त्याला मुरड घातलेलीहि आढळते. ' व्याव-हारिक धोरण " केवळ " सैध्दान्तिक " नव्हे असें त्याचें समर्थन करण्यात येते. काँग्रेसच्या अखिल भारतीय व्याप्तीमुळें या समन्वयकारी ( तडजोडवादी ) धोरणाचे परिणाम वेळोवेळीं पेचप्रसंग टाळण्याच्या दृष्टीनें अनेकदा फायद्याचे ठरलेले असले तरी त्यामुळें प्रश्नाची सोडवणूक झाली असें पुष्कळदा होत नाहीं. "अशुभस्य कालहरणम्" एवढाच त्याचा पुष्कळदा परिणाम होतो. जागतिक शांतता व सर्वत्र विकास आणि पुनर्रचना यांस असलेलें पोषक वातावरण यामुळे धीमेपणें कां होईना पण प्रगतीचीं चिन्हें दिसत आहेत हें नाकारता येत नाही. हा विकासाचा वेग भारताच्या बाबतींत अन्य अनेक मागासलेल्या आशिआई देशांच्या विकासाच्या गतीच्या मानानें कमी आहे हें आंतराष्ट्रीय संघटनानी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून स्पष्ट झालें आहे हेहीं जाता जाता सांगितले पाहिजे.

## • नागरी उत्पन्नावर मर्यादा

या पार्श्वभूमीवर कॉंग्रेसनें व इतर पक्षांनीं १९६२ च्या निवडणुकीसाठीं काय कार्यक्रम मतदारांपुढें ठेवला हे पाहणें योग्य ठरेल.

सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करणें हें कॉंग्रेसचें अंतिम ध्येय असल्याचें जाहीरनाम्यांत सांगण्यांत आलें आहे. त्या दृष्टीनें सार्वजनिक आर्थिक क्षेत्राचा विस्तार, नागरी उत्पन्नावर कमाल मर्यादा हे उपाय त्यांत अंतर्भूत करण्यांत आले आहेत. करधोरणाचा पाठपुरावा हीच दृष्टि ठेवून केला जाईल. भू-धारणेवर कमाल मर्यादा घातल्यानंतर नागरी उत्पन्नावर मर्यादा घालणें ओघानेच येते. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार झाला तरी लोकशाही नियोजनांत खासगी क्षेत्राचें महत्त्वहि कमी मानण्यांत आलेलें नाहीं किंबहुना अर्थरचनेचीं ती दोन उपांगे समजण्यांत यावयाची आहेत. या दोन्हीचा समन्वय वा समतोल सहकारी क्षेत्राच्या परिपोषानें साधला जावयाचा आहे. कारण विकासाच्या या प्रक्रियेत खासगी उद्योगांच्या तौलनिक विस्ताराबरोबरीनें कांहीं नवीन प्रश्न निर्माण होत असल्याचें मान्य करण्यांत आले आहे. म्हणून प्रचंड उद्योग सार्वजनिक क्षेत्रांत समाविष्ट करून मध्यम व लघुउद्योगांना सहकारी क्षेत्रांत आणून हा समतोल साधला जाईल. त्यासाठीं आधीच अस्तित्वांत असलेल्या आयुर्विमा मंडळ व औद्योगिक वित्त मंडळे यांचा अधिक मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जाईल.

ग्रामीण पातळीवर प्रत्येक खेड्यांतून पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था, प्राथमिक शाळा व चांगला रस्ता यांचे आश्वासन आहे. कृषि मालाच्या किंमती स्थिर राखण्याचे धोरण पुनः दोहरण्यांत आले आहे. शेतकऱ्याला किंमतीतील वाटा अधिक मिळावा असे प्रयत्न होतील. सहकारी शेतीला पाठिंबा आहे. पण त्याच्या विवाद्य तपशीलावर भर नाहीं. सामाजिक कार्यक्रमांत ( ज्यांचे परिणाम आर्थिकहि आहेत. ) दारूबंदी, कुटुंब नियोजन. समाजकल्याज कार्य, श्रमिक स्वास्थ्य व वेतन यांचा उल्लेख आहे. पण त्यांची तपशीलवार चर्चा नाहीं.

एकूण राष्ट्रीय उत्पन्नांत आजच्या ८ % दरावरून ११% इतकी भर पडेल अशी तरतूद करण्यांत येणार आहे. सुख विलासांच्या दुय्यम तिय्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यांत येणार नाहीं. भांडवलाच्या गुंतवणुकीचा दर वाढविण्यांत येईल. त्यामुळे वैयक्तिक उपभोगावर मर्यादा घालणें अपरिहार्य आहे. मात्र या धोरणाची जीवनमानाची पातळी वाढविण्याच्या हेतूशीं सांगड घालण्यांत अनेक अडचणी आहेत. त्यामुळें हें कार्य प्रचंड तसेंच गुंतागुंतीचें बनते. गेली दहा वर्षे कॉंग्रेस या देशांत अधिकारावर आहे व नियोजनहि दहा वर्षे चालू आहे. या काळांतील साध्य व साधनांचा परिचय आपल्याला पूर्ण असल्यानें त्याबाबत सविस्तर उहापोह करण्याचे कारण नाहीं.

## • आश्वासने व त्यांची पूर्ति यातील दरी

प्रजासमाजवादी पक्षाचा जाहीरनामा आर्थिक कार्यक्रमाच्या दृष्टीनें अनेक बाबतीत कॉंग्रेसच्या जाहीरनाम्याहून फार दूर गेलेला नाहीं. कॉंग्रेसच्या आता पावेतो ज्या राज्यव्यवस्थेत धोरण व अंमलबजावणी यांत तफावतच पडल्याचे दिसतें व आर्थिक विषमता वाढून जीवनमानाची पातळी घसरल्याचा आरोप करण्यांत आला आहे. बेकारी वाढत आहे. शिक्षण व वैद्यकीय मदत यांतही पुरेशी सुधारणा नाही. त्यामुळें नैराश्य, अशाश्वति व ताण निर्माण झाला असून त्याविरुद्ध लढा देण्याचे आश्वासन त्यांनी आपल्या जाहीरनाम्यांत दिले आहे. समाजवादावरील या पक्षाची श्रद्धा स्वयंभू आहे व अभिप्रेत असलेल्या आर्थिक समतेच्या धोरणाला पोषक असा कार्यक्रम आखणें ओधानेच येते. तरीहि त्याची अंमलबजावणी पुढील वर्षांत प्रामाणिकपणें व संपूर्णपणें होण्यावरच या देशांतील समाजवादाचे भवितव्य अवलंबून आहे, असें या पक्षाला वाटते. त्या दृष्टीनें हा काळ निर्णायक आहे असें त्यांचे मत आहे. लोकशाही नियोजन या पक्षाला मान्य असल्यानें लोकांना कार्यक्रमाशीं निगडित करण्याची गरज त्यांनींही प्रतिपादिली आहे. पण प्रत्यक्षांत त्या दृष्टीनें भरकस प्रयत्न झाले नाहीत असा त्यांचा आक्षेप आहे. योजनेचा आकार वाढत आहे पण प्रत्यक्षांत राष्ट्रीय उत्पन्नांत प्रगतिशील घट आढळते. उद्घोषिलेल्या धोरणानुसार विकास होत नाहीं. त्यामुळें आश्वासनें व अंमलबजाणी यांत दरी निर्माण होत आहे. किंबहुना दोहोंची रस्सीखेंच चालू आहे असें त्यांना वाटतें. आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण होत असून त्याला पायबंद बसला पाहिजे. त्याला अनुकूल असें करधोरण कटाक्षानें आखायचें आश्वासन दिलें आहे. आर्थिक विषमता कमी करायचे एक लक्ष्य म्हणून त्यांनी १० : १ हे कमाल व किमान उत्पन्नाचे प्रमाण युक्त मानलें आहे.

श्रमिकांचे सामूहिक व्यवहारासाठीं संघटन स्वातंत्र्य त्यांनी मान्य केलें असून ग्रामीण जनतेसाठीं सहकारी प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्याचेंहि आश्वासन जाहीरनाम्यांत आहे.

## • कम्युनिस्टांचा राष्ट्रीयकरणावर भर

कम्युनिस्ट पक्षानें भारतीय जनतेला समाजवादाचा संदेश प्रथम दिल्याचे श्रेय आपणाकडे घेतले असून सर्व "लोकशाहीवादी" शक्तीना एकत्रित होण्याबद्दल आवाहन केलें आहे. या संदर्भात पक्षाच्या "समाजवाद" आणि "लोकशाही" यांच्या व्याख्या व प्राप्तीशी सर्वजण सहमत होतील असें नाहीं. प्रचंड उद्योगावर बंधनें व एकमेवाधिकार शाहीचा नायनाट करणें हें एक धोरण असून विमा, बँकिंग, लोखंड-पोलाद, खनिज तेलें, साखर, ताग, चहामळे इत्यादि उद्योगांचे राष्ट्रीयकरण कर-

ण्याचे त्यांनी अभिवचन दिले आहे. भांडवलशाही राष्ट्राकडून आर्थिक मदत स्वीकारावयाची नाही असा त्यांचा निर्णय आहे. काँग्रेसच्या पहिल्या व दुसऱ्या योजनेमुळे देशाचे कांहीच भलें झालें नसून तिसरी योजना त्या दोहोंहून भिन्न नसल्यामुळें अंतिम स्थितीत सुधारणा होईल अशी आशा करणें व्यर्थ होय असे त्याचें मत आहे उलट अधोगतीच होईल असा इषारा या पक्षानें मतदारांना दिला आहे. औद्योगीकरण भू–सुधारणा, श्रमिकांच्या वेतनांत वाढ ही आश्वासनें या पक्षानें प्रामुख्यानें आपल्या जाहीरनाम्यांत दिलेली आहेत.

## • स्वतंत्र पक्षाचा कार्यक्रम

कम्युनिस्टांच्या विरूद्ध टोकाला असलेल्या स्वतंत्र पक्षाचा जाहीरनामा आता पाहणें उद्‌बोधक ठरेल. समाजवादी धोरणाचा घोष करणारी काँग्रेस भांडवलदार व उद्योगपति (आणि संस्थानिकहि) यांना दूरची वाटत नसली तरी स्वतंत्र पक्ष त्या मानानें त्यांना अधिक जवळचा वाटू लागलेला आहे हें स्पष्ट दिसून येते. पण या पक्षानें आपला जाहीरनामा " ग्रामीण " विकासाला अधिक प्राधान्य देतो असें प्रतिपादिलें आहें. राज्याच्या आर्थिक क्षेत्रातील अनिर्बंध विस्ताराला या पक्षाचा मूलभूत विरोध आहे. "आर्थिक राज्यवाद" समूळ उखडून टाकण्याचे कंकणच या पक्षानें बांधले आहे. त्यासाठीं जमिनीवरील कर काढून शेतमालाच्या किंमती स्थिर करणें, नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्याच्या दृष्टीनें एक राष्ट्रीय विमा निधि उभारणें ही शेतकऱ्यांची आजची गरज असल्याचे सांगितले आहे. अन्य तथाकथित विरोधी पक्ष प्रचलित सत्तारूढ पक्षाच्या विविध धोरणाशी कमी अधिक प्रमाणांत सहमत असल्यानें देशांत प्रबळ विरोधी पक्ष म्हणून काम करण्याची शक्ति त्यांच्यांत कधीच येणार नाहीं व लोकशाहीची ती निकडीची गरज असून स्वतंत्र पक्षच ती भागवू शकेल असा विश्वास या पक्षानें आपल्या जाहीरनाम्यांत व्यक्त केला आहे. सामान्य व्यक्तीला अन्नवस्त्र व निवारा देण्याची जबाबदारी सरकारनें पत्करली पाहिजे व त्या दृष्टीनें अधिक रोजगार, अधिक धान्योत्पादन, पाणी पुरवठा छोटया योजना, शाळा, लघु उद्योग यांना हा पक्ष प्रोत्साहन देईल असे आश्वासन या पक्षाने मतदारांना दिलें आहे. करांत अनेक प्रकारच्या सवलती व कपात करण्याचेहि अभिवचन त्यांत आहे.

शेतीत व्यक्तीची स्वतंत्र मालकी व शेती करण्याचा हक्क मान्य करण्यांत येईल. स्वतंत्र व स्वावलंबी शेतकरी हें त्यांचे उद्दिष्ट आहे. गहन शेतीला सर्वतोपरि उत्तेजन दिलें जाईल. साधनें पुरविली जातील. मालक व कुळें यांत चांगले संबंध राहतील असे प्रयत्न हा पक्ष करूं इच्छितो. भूमिहीन शेतकऱ्यांना किमान वेतन ठरवून दिले जाईल व छोटे उद्योग ग्रामीण क्षेत्रांत सुरू केले जातील.

अनुक्रम ...33408... दि. ...12-4-2...
[illegible]



## • सरकारचे किमान नियमन

उद्योग व व्यापारात सरकारचे धोरण सहाय्यकारी असेल. किमान नियमनाचें असेल. त्यांत सरकारी सहभाग नसावा असें त्यांना वाटते. या दृष्टीनें "मुक्त उद्योगाचे" ( फ्री एन्टरप्राइझचें ) समर्थन केले आहे. प्रचंड उद्योग व उपभोग्य वस्तूंची निर्मिति करणारे उद्योग यांत समतोल साधला पाहिजे नाहीतर जीवनमानांत ताण निर्माण होतात असे या पक्षाला वाटते. अर्थरचना एकांगी होते. जाचक नियंत्रणे, परवाने यामुळें एकूण अर्थव्यवस्थेंत लाचलुचपत आणि गोंधळ निर्माण होतो. तो नाहीसा करण्यासाठीं पूरक धोरणें आखली जातील. साहसी ( एन्टर प्राइझर ), कामगार, उपभोक्ता ( कन्झ्यूमर ), उत्पादक यांचें निर्णय स्वातंत्र्य मान्य करण्यांत आले पाहिजे असें त्यांच्या धोरणाचे सूत्र आहे. त्यांच्या विकासाला मुक्त वाव असावा. स्पर्धेतून चांगल्या गोष्टी निर्माण होतात. यामुळें एकमेवाधिकारशाहीला ( मॉनॉपॉलि ) आपला विरोध त्यांनी दर्शविला आहे. (पण हें नियंत्रणावाचून कसें होणार ? ) श्रमिकांचें हितसंबंधहि सुरक्षित राखण्याचें अभिवचन त्यांत आहे. भारतीय जीवनास पोषक असलेले व महात्मा गांधींनीं निवेदिलेले "विश्वस्त" स्वरूपाचें तत्त्व त्यांनीं मार्गदर्शक तत्व म्हणून मान्य केलें आहे. हें सामाजिक दायित्व समुचित सरकारी धोरणाच्या द्वारा पार पाडले जाईल याकडे हा पक्ष सत्तेवर आल्यावर विशेष लक्ष देईल असें मतदारांना त्यानें आश्वासन दिले आहे.

## • नियोजन मंडळच नको

लोकसभेचे सार्वभौमत्व या पक्षाला अर्थात् मान्य आहे, पण नियोजनासाठीं "नियोजन मंडळाची" जरूर नसल्याचें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. "उत्तरदायित्व नसलेलें हे अधि सरकार ( सुपर गव्हर्मेंट " त्यांना नको आहे. त्यामुळे त्यांना अधिकारावर येण्याची संधि मिळाली तर नियोजनमंडळ अस्तित्वांत राहणार नाहीं. मूलभूत घटनात्मक व्यक्ति स्वातंत्र्यावर मर्यादा न घालतां नियोजन हातीं घेतलें जाईल.

श्रमिकांचें संघटन स्वातंत्र्य त्यांनींहि मान्य केलें आहे. सामूहिक विक्रय शक्तीचा त्यांचा हक्क त्यांना मंजूर आहे. पण संघटनांचे नेतृत्व राजकीय पक्षांनीं करू नये असा त्यांचा दावा आहे.

जनसंघाचा जाहीरनामा या सर्व पक्षांच्या जाहीरनाम्यांमधून वेगळा उठून दिसत नाहीं. नियोजनानुसार विकास झालेला नाहीं. पूर्वीच्याच चुका नवीन योजना आखताना केलेल्या आहेत ही त्यांची टीका आहे. लघुउद्योगांना यंत्राची

जोड देऊन खरेदी विक्रीच्या सोयी व सवलती त्यांना उपलब्ध करून दिल्या जातील. वाहतूक व विद्युत् शक्तीवर भर दिला जाईल. एकंदर विकास एकावयवी घडून यावा यावर त्यांचा भर आहे. त्यांतून अंतर्विरोध निर्माण होतां कामा नयेत. अशी त्यांची भूमिका आहे.

अशा रीतीनें विविध प्रमुख पक्षांनीं आपापला आर्थिक कार्यक्रम व धोरण आपापल्या जाहीरनाम्यांत अंतर्भूत केलेले आहे. यांतील बराचसा भाग ढोबळ स्वरूपाचा व भारतीयांच्या मूलभूत गरजा लक्षांत घेऊन आखलेला असल्यामुळें केवळ तौलनिक अग्रक्रमांत जी काय तफावत आढळते तीच. बाकी अर्थरचनेला स्वाभाविक गति प्राप्त होईपर्यंत समाजवादी धोरणाचा पाठपुरावाहि तो बहुतांशानें "सैद्धान्तिक" स्वरूपाचाच ठरतो. कम्युनिस्ट व स्वतंत्र पक्ष या एकांतिक टोकांच्या दरम्यान अन्य पक्ष येतात व त्यांच्यांतील आर्थिक कार्यक्रमाबाबतचा फरक दाखवणें अवघड बनते ( एकादा जनसंघासारखा पक्ष आपल्या कांहीं व्यवच्छेदक लक्षणानी निराळा उठून दिसला तरी आर्थिक बाबतींत कांहीं वेगळे मौलिक नाहीं. ) हें सहज लक्षांत येईल कीं भारताच्या आजच्या अवस्थेंत सार्वजनिक क्षेत्र वाढल्याने समाजवाद आकारास येतो असें समजणें चूक आहे. उत्पादन, समृद्ध जीवन व संस्कृति यांचा विकास या गोष्टी सामान्य व्यक्तीच्या दृष्टीनें अर्थात् महत्त्वाच्या आहेत. यांची हमी त्यांना देतां आली तर त्याला पूरक अशी समाजरचना आकारास आणण्यांत त्यांचे हार्दिक सहकार्य मिळेल. आणि या प्रक्रियेंत लोकशाही पुष्ट होईल. पण तितकी जागृति भारतांत अद्यापि झालेली नाहीं. त्यामुळें लोकशाही असूनहि तिच्यात जोम नाहीं. प्रबळ विरोधी पक्ष जन्माला न येण्यामागें हें कारण असूं शकेल काय ?

• • •

आजची प्रातिनिधिक लोकशाही ही खरी लोकशाही नाहीं त्यात सामान्य नागरिकाकडे केवळ प्रेक्षकाची भूमिका आहे. सर्वोदयवाद्यांची लोकनीतीची विचारसरणी व निवडणुकीसंबंधी त्यांच्या कल्पना या लेखात लेखकाने विशद केल्या आहेत.

# लोकनीति व निवडणुका

लेखकः—गो. बा. देशपांडे.

राजांची सत्ता कमी करण्याचा किंवा संपुष्टात आणण्याचा प्रयत्न सुरू करण्यामागे केवळ सुराज्याची भावना नव्हती. स्वराज्याच्या आकांक्षेतून लोकांनी उठाव केला. राजांचे राज्यांत कर्ता करविता राजा होता. राजसत्ता संपून त्या जागीं सामंतशाही आली. निर्णय घेणे, ते अंमलांत आणणे अथवा न आणणे यासाठीं लागणारी सत्ता सरदारांच्या हाती आली. राजसत्तेत राजा सर्वशक्तिमान, सामंतशाहीत सरदार तसेंच लोकशाहीत 'लोक' असलें पाहिजेत हा लोकशाही शब्दाचा खरा अर्थ आहे. सामंताच्या केवळ संमतीने राज्याचा कारभार चालावा असा सामंतशाहीचा अर्थ व व्यवहार नव्हता. हेच लोकशाहीलाहि लागूं झाले पाहिजे, आजची प्रातिनिधिक लोकशाही लोकांच्या संमतीवर चालते. लोकांच्या सहकार्याने ती चालू लागेल तेव्हांच ती खऱ्या अर्थानें लोक-सत्ता होऊं शकेल. लोकसत्तेत मुख्य विभूति 'लोक' आहे, पक्ष किंवा प्रतिनिधि नाहीं. पक्षाचे किंवा प्रतिनिधींचें महात्म्याचे ज्या पद्धतींत असेल तिला फार तर पक्षशाही किंवा प्रतिनिधि-शाही म्हणतां येईल. लोकशाहीसाठीं आणखी कांही पराक्रम व प्रयत्न करावे लागतील.

## • दोन पायांवरची तिवई

'लोक' याचीं व्याख्या करतां येणार नाही. लोक म्हणजे मतदार नव्हेत. नागरिकहि नव्हेत. आज किंवा पूर्वीं हयात असलेला समाज म्हणजेहि लोक नव्हे, लोक ही भावरूप पण अव्यक्त अशी संस्था आहे, भूमितीतल्या बिंदूप्रमाणें. पण लोक या संस्थेचे सगुण रूप म्हणजे व्यक्ति आहे. म्हणून लोक-शाही म्हणजे ज्या व्यवस्थेत व्यक्तींचे प्राधान्य आहे अशी व्यवस्था. व्यक्तीचे म्हणजे मानवाचे प्राधान्य. याचा अर्थ असा की मानवतेचे रक्षण, विकास व परिपोषण होईल अशी राज्य व्यवस्था. आजच्या प्रतिनिधिक राज्य व्यवस्थेत मानव्याच्या विकासांत किंवा रक्षणांत प्रत्येक व्यक्तीला भाग घेण्याची संधि, इतकी अल्प आहे कीं शोधून व्यक्ति सापडायची नाही. सभासद पक्ष, संस्था गट सगळे आहेत. फक्त निर्लेप व्यक्ति नाहीं. कायद्याने जरी अधिकार दिला असलातरी तो वापरण्याची शक्ति आली नाही. आणि परिस्थितीहि.

निर्माण करतां आली नाही. तीं निर्माण करतां येत नाही तोंवर प्रतिनिधींचेंच राज्य चालेल. तें बव्हंशी for the people असेलहि, of the people हि असण्याचा संभव आहे, पण by the people मात्र असणार नाही. आणि तसे तें होणार नाहीं तोवर दोन पायावर उभ्या असणाऱ्या तिवई प्रमाणें तें डळमळत राहणार यांत शंका नाहीं. कधी ती कायद्याच्या टेकूनें स्थिरावेल, तर कधीं शस्त्राच्या आधाराने टिकलेली दिसेल. पण ही अवस्था व व्यवस्था अल्पजीवीच असायची. दीर्घजीवी व बलशाली लोक-राज्य किंवा लोकसत्ता प्रस्थापित करायची म्हटले तर आजच्या तंत्राच्या जागीं दुसरे अधिक सुधारलेले म्हणजेच अधिक लोकशाहीप्रधान तंत्र आणले पाहिजे.

## • आजची लोकसत्ता अपुरी

अमेरिकेच्या लोकजीवनातील एका जन-श्रुतीत या तंत्राचा संकेत आहे. समाजांत राज्यव्यवस्थेत, अर्थरचनेत जे दोष आहेत त्यांच्या निराकरणाचा उपाय काय ? बंदूक ? नाहीं. सोने ? नाहीं. तर ? ती जन श्रुती सुचविते The remedy of all that is wrong and in perfect in society is democracy and still more democracy. समाजांत जे दोष व ज्या उणीवा असतील त्यांचा उपाय लोकशाही—उत्तरोत्तर अधिकाधिक लोकशाही. अधिकाधिक लोकशाही म्हणजे लोकांचा सत्तेत अधिकाधिक प्रवेश. लोकांचे सत्तेपासूनचे दूरत्व अधिकाधिक कमी करणें. सत्तेला लोकांचे केवळ साक्षीत्व नाही. सत्तेची म्हणजे कारभाराची प्रत्यक्ष भागीदारी हवी. हें कसें घडवून आणायचे ? लोकनीतीची विचारसरणी यासाठीं नागरिक जीवनात राजसत्तेचा वापर कमीत कमी असावा याचा पुरस्कार करते. ज्या प्रमाणांत कायद्याचा आणि राजसत्तेचा वापर नागरिक जीवनांत, नागरिकांच्या परस्पर संबंधात होतो. त्या प्रमाणांत राजसत्तेचा विस्तार होतो आणि लोकसत्तेचा संकोच होतो. लोकसत्तेचा विस्तार व राजसत्तेचा संकोच म्हणजेच लोकनीति. राज्यसत्तेचा लोप व्हावा हे सगळ्या क्रांतिकारकांचे अंतिम ध्येय आहे. लोकसंस्था राज्यसंस्थेत विलीन करून हे ध्येय गांठावयाचे कीं कसे ? जसजसें राज्याचे पाश व्यापक व घट्ट होत जातील तसतसे लोकसत्तेचे क्षेत्र संकुचित होत जाईल. सर्वंकष, सर्वस्पर्शी, राज्यव्यवस्था, लोकसंस्थेच्या अस्तित्वाला बाधक आहे. मग ती राज्यसत्ता लोकहिताच्या किंवा राष्ट्रकल्याणाच्या नावानें कां आली असेना. लोकसत्तेचा विकास घडविण्याची प्रक्रिया काय असावी हा खरा प्रश्न आहे. राज्यसत्ताच व्यापक करण्यासाठीं लोकांना राज्यानें दिलेली सत्ता, ही खरी लोकसत्ता नव्हें कारण दिलेली सत्ता काढून घेण्याची शक्ति देणाऱ्याच्या हातीच असते. म्हणून लोकांच्या शक्तितून सामर्थ्यातून व कर्तृत्वातून लोकसत्तेचा विकास व्हावा अशी राज्यव्यवस्था असली पाहिजे. असें

लोकनीतीचे म्हणणें आहे. यासाठी आजची प्रातिनिधीक लोकसत्ता अपुरी आहे. हळूंहळूं प्रतिनिधीच्या जागीं लोक, नागरिक आले पाहिजेत. कारभार व सत्ता दोन्ही त्यांच्या हाती गेली पाहिजे.

## • अधिकाधिक सत्ता तज्ञाकडे

आज या संदर्भात आणखीहि एक विचार करणें क्रमप्राप्त झाले आहे. विज्ञानाच्या विकासानें एक नवीन परिस्थिति निर्माण झाली आहे. उत्पादनाची साधनें पूर्वीपेक्षां अधिक गुंतागुंतीची होत चालली आहेत. जीवशक्तीपेक्षां जडशक्तिचा वापर वाढू लागला आहे त्यामुळें उपकरणें अवजड, महाग व सामान्य माणसाला हाताळायला कठीण झाली आहेत, अधिकाधिक सत्ता तंत्रज्ञ व यंत्रज्ञांच्या हाती चालली आहे.प्रतिनिधींचे यश या तंत्रज्ञांच्या शहाणपणावर अवलंबून राहू लागले आहे. म्हणजे हळूहळू आजची औपचारिक लोकशाही तज्ञ–शाहीकडे जात आहे. ह्याचाच अर्थ असा कीं लोकांची वास्तविक सत्ता केवळ राज्यसंस्थेच्या क्षेत्रात उरली नसून अर्थक्षेत्रात देखील तिला अनकूल रचना करावी लागणार. या सोबतच सामान्य नागरिकांच्या ज्ञानाची पातळी वाढविण्याचाहि प्रयत्न झाल्याखेरीज लोकसत्ता कृतार्थ होऊं शकणार नाहीं. राज्य व्यवस्थेच्या स्वरूपात व उत्पादनांच्या क्षेत्रांत क्रान्तिकारक व आमुलाग्र बदल घडवून आणणे यामुळें क्रमप्राप्त आहे.

## • सामान्य नागरिक केवळ प्रेक्षक

राज्यव्यवस्थेच्या क्षेत्रातून स्पर्धेचा अंत झाला पाहिजे असें लोकनीतीचे म्हणणें आहे. प्रतिनिधित्व व स्पर्धा यांचे अविभाज्य नाते नाहीं. स्पर्धा उमेदवारीमुळें येते म्हणून उमेदवारी नसावी असें लोकनीतीचे एक सूत्र आहे. उमेदवारालाच निवडणुकीची कळकळ असते असें दिसून येते. फार तर त्याच्या आप्तमित्रांना किंवा पक्षाचा असला तर काहीं पक्षनिष्ठ नागरिकांच्या ठिकाणी सक्रियता दिसून येते. सामान्य नागरिक उदासीन दिसतो. उमेदवार ठरविण्यांत आज त्याचा कांहीं संबंध नाहीं. तो नुसता प्रेक्षक किंवा श्रोता आहे. तो कर्ता झाला पाहिजे. उमेदवार ठरविण्यापासून तो आवश्यकता पडल्यास निवडून दिल्यानंतरहि नियोजित कालावधि संपण्यापूर्वी त्याला परत बोलाविण्यापर्यंतचे सर्व अधिकार त्याच्याकडे असले पाहिजेत व ते त्याला वापरता आले पाहिजेत. त्याचे दैन्य, दुःख, दारिद्रय दूर करणें त्याच्या पुरूषार्थाच्या क्षेत्रात आले पाहिजे. त्याचा मक्ता त्याच्याकडेच पाहिजे. तो जर दुसऱ्या कुणी घेतला तर हा सामान्य नागरिक स्वतंत्र कधींच होणार नाही आणि तो सतत कैवाऱ्याची, पालकाची प्रतीक्षा करण्यांत स्वतः हरवलेलाच राहील. कैवारी सुद्धां आणावा लागतो, याचीही जाणीव त्याला राहणार नाहीं. एक प्रकारच्या शून्यावस्थेत तो वावरूं लागेल. सार्वजनिक जीवनांत आजच्या सारखाच

त्याला रस वाटणार नाहीं. तेथें आपले कांहीं स्थान नाहीं असा त्याचा समज होईल. परिणाम असा होईल कीं, त्याचा पुरुषार्थ प्रकट होणार नाहीं. आणि त्यातूनच लोकशाहीच्या ऱ्हासाचा विषवृक्ष अंकुरित होईल. ही परिस्थिति ताबडतोब सुधारली पाहिजे.

## • विकेंद्रित अर्थव्यवस्था

आजची औपचारिक, प्रातिनिधिक राज्यव्यवस्था उध्वूंमूल असलेल्या वृक्षासारखी आहे. लोकराज्याची खरी विभूति जो नागरिक तोच सगळ्या सोहळ्यात कुठे तरी हरवून गेल्याप्रमाणें झाला आहे. त्यानें वस्तुतः निर्णय करायचे पण ते त्याच्यावर लादले जातात. त्यानें कारभार पहायचा; त्याचा तो केवळ साक्षी आहे. तो इतिहासाचा विधाता आहे; पण आज तो इतिहासाचा विषय बनलेला आहे. ही परिस्थिति कायम राहिली, तर प्रत्येक संसदीय लोकशाहीत सुप्त असलेली सामंतशाहीची मुळे जोरकस व्हायला उशीर लागणार नाही. म्हणून संपूर्ण नागरिक जीवनाचा पाया बदलला पाहिजे. हा बदल राजकीय व्यवस्थेबरोबर आर्थिक क्षेत्रांतहि आणावा लागेल. आजची उत्पादन पद्धति, साधनें, उत्पादक व उपभोक्ता यांचे संबंध, उत्पादनाचा हेतु आणि वितरणाची पद्धति यांत परिवर्तन घडवून आणले पाहिजे. उत्पादनाची साधने लोकांच्या हाती यायला पाहिजेत. राजकीय सत्ता लोकांच्या हातांत व आर्थिक सत्ता मूठभर कारखानदारांच्या हाती हे अयोग्य होईल म्हणून उत्पादनाचा मोठा भाग विकेंद्रित पद्धतीतून चालला पाहिजे आणि त्यावर लोकांचे नियंत्रण असले पाहिजे. क्षेत्रीय नियोजन त्या त्या क्षेत्रातील लोकांनी केले पाहिजे. आणि त्या योजना अंमलात आणण्याची जबाबदारी व अधिकार त्यांचा असला पाहिजे.

## • विकेंद्रित राज्यव्यवस्था

आर्थिक रचनेचा पाया व त्यावरील इमारत बदलणें आणि राजकीय तंत्राची नवी रचना करणें, हो दोन्ही कामे एकाच वेळीं व्हायला पाहिजेत. त्याशिवाय खरें लोकतंत्र उभे राहू शकणार नाहीं. राजकीय तंत्राची उभारणी करतांना लोकांची सत्ता त्यांत प्रधान असेल याकडेच सर्व लक्ष केंद्रित व्हावयास हवे. लोकांच्या हातांत खरीखुरी सत्ता असायची व ती त्यांनीं वापरायची, म्हणजे आजची केंद्रित राज्यव्यवस्था बदलून त्याजागीं विकेंद्रित राज्यव्यवस्था आणायला हवी. विकेंद्रित राज्यव्यवस्था म्हणजे ग्रामपंचायतीचें राज्य. जुन्या काळीं ग्रामपंचायती होत्या. पण त्या प्रांतिक सरकारनें बनविलेल्या, त्यांच्या तंत्रानें चालणाऱ्या व अल्प अधिकार असणाऱ्या होत्या. त्यांचा कारभार नीट चालला नाहीं. खऱ्या लोकशाहीसाठीं ज्या ग्रामपंचायती हव्यात त्या स्वायत्त व व्यापक अधिकार असणाऱ्या पाहिजेत. त्यांना

ग्रामांचा सर्व कारभार चालविण्याचे स्वातंत्र्य व हक्क असले पाहिजेत. अशा कांहीं ठराविक पंचायतीचे मिळून एक क्षेत्रीय पंचायत मंडळ बनावे. अनेक मंडळांचे मिळून एक जिल्हा पंचायत मंडळ बनू शकेल. पूर्वीच्या व्यवस्थेत जिल्ह्याच्या कारभाराची सर्व सूत्रे जिल्हाधिकाऱ्याच्या हाती असत. पंचायत राज्याच्या प्रणालीत जिल्हा अधिकाऱ्याचे स्वरूप आजच्या गव्हर्नर सारखे रहावे. राज्य सरकारचा तो प्रतिनिधि असावा. त्याचे अधिकार मर्यादित असावेत व खरी सत्ता लोक प्रतिनिधींच्या हाती असावी. क्षेत्रीय व जिल्हा मंडळांना ग्रामपंचायतीच्या योजनांत सुसंगति आणण्याचें काम असावे. ग्रामपंचायतींच्या कारभारात ढवळाढवळ करण्यांचा अधिकार लोकांशिवाय इतर कुणालाही असू नये.

## • श्री. जयप्रकाश यांची सूचना

पंचायत राज्याची पद्धति जिल्ह्यापावेतोच मर्यादित ठेवली, व विधानसभा किंवा लोकसभेसाठीं पक्षीय राजनीति चालू राहिली तर लोकांना आपल्याला खरी सत्ता मिळाल्याची जाणीव होणार नाहीं. खरी सत्ता आपल्यापासून दूर राहिली असें त्यांना वाटू लागले कीं हाती असलेल्या सत्तेची उपेक्षा करण्यांकडे त्यांचा कल होईल. पंचायत राज्य या मनोवृत्तीतून चालू शकणार नाही. म्हणून ग्रामपंचायतीपासून तो लोकसभेपावेतो एकमेकांशी संबंधित अशी वर्तुळे निर्माण केली पाहिजेत. एकातून दुसऱ्या वर्तुळाचा उदय होणाऱ्या या व्यवस्थेचा केंद्रबिंदू ग्रामपंचायत असली पाहिजे. श्री. जयप्रकाश नारायण यांनी यासाठीं एक रचना सुचविली आहे. ते म्हणतात "दरेक मतदार संघातील प्रत्येक ग्रामसभेनें, नियोजित वेळीं बोलाविलेल्या सर्वसाधारण सभेत दोन प्रतिनिधि ठरवावेत. हे दोन प्रतिनिधि निवडणूक मंडळाचे सदस्य बनतील. त्यांची निवड पुढीलप्रमाणें व्हावी. इच्छुकांची नांवे सभेत मागवावित. सुचविण्यांत आलेली व अनुमोदित नांवांची यादी करावी व ती नांवे मोठ्या फळ्यावर ठळक अक्षरांत लिहावीत. दोनपेक्षां अधिक नांवे सुचविण्यात आली नाहीत, तर अपोआपच त्या दोघांची निवड झाली असें होईल. अधिक नांवे सुचविली गेल्यास, हात वर करून प्रत्येक नांवावर मते घ्यावीत. तीं त्याच्या नांवासमोर नोंदवावीत अशा रीतीनें दोन नांवे उरेपर्यंत मतमोजणी करावी. कमीत कमी मते मिळविणारे नांव दरवेळीं कमी केले जावे.

यानंतरचे पाऊल म्हणजे त्या मतदार संघातील सर्व ग्रामसभांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या निवड मंडळाची बैठक बोलविणें हे असेल. या निवडणूक मंडळाकडे उमेदवार ठरविण्याचें काम असेल. ते ठरवितांना पुढील पद्धतीचा वापर करावा. प्रथम नांवे सुचविण्यांत यावीत. अनुमोदन मिळालेल्या व सुचविण्यात आलेल्या नांवावर मतमोजणी व्हावी. किमान मतांचा आकडा सर्वानुमते ठरविण्यांत यावा. समजा तो ३० टक्के असेल. किमान मते मिळतील त्या व्यक्तींना विधान

सभा किंवा लोकसभेसाठीं उमेदवार म्हणून उभे राहाता येईल, प्रत्येक जागेसाठीं शक्य तो एकच उमेदवार निवडणूक मंडळानें ठरवावा असा प्रयत्न व्हावा. यासाठीं हवे तेवढें लोकशिक्षण व आवश्यक तेवढ्या घटनात्मक व कायदेशीर तरतुदी करा-व्यात. हे सगळे करूनहि एकाहून अधिक नांवे सुचविली गेली, तर सार्वत्रिक निव-डणूकीसाठीं आजच्यापेक्षा वेगळी पद्धत अंगिकारता येणें शक्य आहे. निवड मंडळानें ठरविलेली नांवे मतदार संघातील सर्व ग्रामसंस्थांकडे पाठविण्यांत येतील. ग्रामसभेनें सर्वसाधारण बैठक बोलांवून प्रत्येक उमेदवारासाठीं मते घ्यावीत. यानंतर दोन पैकीं एक पर्याय मान्य करून अखेरची निवड करावी. दोन पर्याय असे–(१) जास्तीत जास्त मते ज्या उमेदवाराला पडतील तो उमेदवार त्या ग्रामसभेला आपला प्रतिनिधि म्हणून हवा आहे असे ठरेल. अशी जास्तीत जास्त ग्रामसभांची मते ज्याला मिळ-तील तो विधान सभा किंवा लोकसभेला जशी परिस्थिती असेल त्या प्रमाणें त्या मतदार संघातर्फे निवडून आलेला सदस्य म्हणून जाहीर करण्यांत येईल. किंवा (२) ग्रामसभांच्या सर्वसाधारण सभेत मिळालेल्या मतांची बेरीज करण्यांत यावी. जास्तीत जास्त मते मिळणारा उमेदवार निवडून आला असे जाहीर करण्यांत यावे.

लोकशाही यंत्रणेत अनेक पायऱ्या व मजले असतात. प्रत्येक मजल्यांचा दुसऱ्याशी संबंध असण्यावर यंत्रणेची मजबुती अवलंबून असते. वरील पद्धतीत हे उत्तम रीतीनें साधूं शकते. ग्रामसभा किंवा विकेंद्रित शासन व्यवस्थेला यामुळे कांहीं सार्थकता येऊ शकेल व क्षेत्रीय दुराभिमान आणि संकुचित क्षेत्राभिमान यांतून प्रादेशिक गटांची मुक्ति होईल. सुजाण मतदाराला संघटितरीत्या आपली स्थानिक व राष्ट्रीय व्यवस्था निवडता येतें. तो सभा व निवड मंडळाच्या व्दारा निवडून दिलेल्या प्रतिनिधीवर आपलें नियंत्रण ठेवूं शकतो. त्याचप्रमाणें निवडून आलेल्या प्रतिनिधींना त्यांच्याशी ग्रामसभांच्या व्दारा संबंध ठेवणेहि सुलभ होऊ शकेल.

## • निवडणुका एकमतानें व्हाव्या

विकेंद्रित पद्धतीच्या राज्यव्यवस्थेत निवडणुकी एकमतानें व्हाव्यात हे फार आवश्यक आहे. बहुमत अल्पमत म्हणजे लोकशाहीचा आत्मा नव्हें. लोकशाहीत विरोधी पक्ष अनिवार्य आहे. हे जसे ठरीव साच्याचे पण चुकीचे मत आहे, तसेंच बहुमत अल्पमताचे आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत हे कायम मतभेदाचे तत्व अंमलांत आणणें अत्यंत घातुक ठरण्याचा संभव आहे. अनेक तऱ्हेच्या भेदाभेदांनी विस्कळित झालेल्या खेड्यांत ग्रामपंचायतीची पद्धति आपण कशासाठीं नेत आहोत? अर्थातच विस्कळितपणा वाढविण्यासाठीं नव्हें. आधीच असलेल्या मतभेदांना, जातिभेदांना चेतविण्यासाठीं ज्या पद्धतीचा उपयोग होऊं शकेल अशी कोणतीहि पद्धति खेड्यांत नेल्यानें खेड्यांचे अहित होणार आहे. स्वयंशासनाचा उगम मतभेदांच्य

आखाड्यांतून होणार नाहीं, खेड्यांच्या पुनरुज्जीवनाच्या कार्याचा उगम मतैक्या-शिवाय असंभवनीय आहे आणि मतैक्याशिवाय ग्रामपंचायत होऊंच शकणार नाहीं हें कळलें, कीं मतैक्य कसें घडवून आणायचें या दिशेनें पावलें पडूं लागतील. मतभेद चेतवावे तितके चेततात. त्यांना आळा घालण्याचे उपाय करायला पाहिजेत. याचा अर्थ मुस्कटदाबी किंवा दडपशाही असा मात्र होतां कामा नये. स्वेच्छेनें गांवाच्या हितासाठीं स्वतःच्या मताबद्दल अनाग्रह राखणें आणि इतरांच्या मतां-बद्दल आदर राखणें यांत मतस्वातंत्र्याला मुळींच बाध येत नाहीं. कुटुंबांत ज्या-प्रमाणें अनाग्रही वृत्तीनें कामें चालतात त्याच वृत्तीनें ग्रामपंचायतीचें काम चालावें अशी रचना केली पाहिजे. नाहीं तर आगींत तेल ओतल्यासारखे होईल.

पंचायत राज्याच्या किंवा विकेंद्रित लोकशासनाच्या पद्धतीचे बरेंचसें यश खुऱ्याखुऱ्या लोकशिक्षणावर अवलंबून आहे. हें काम सर्वांनीं मिळून करायला पाहिजे. विशेषतः अपक्ष संस्थांनीं व संघटनांनीं याकामीं पुढाकार घेतला पाहिजे. पक्षांनीं ग्रामपंचायतीच्या निवडणुकांत भाग न घेण्याचें ठरविलें पाहिजे. नाहींतर खेड्याच्या कारभाराची व्यवस्था राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील गलक्यांत होऊन जाईल. तसेंच ग्रामपंचायतींना खरेखुरे अधिकार दिले पाहिजेत. नुसत्या देखाव्यानें लोकशाही तत्वाची फसवणूक होईल. खरेखुरे अधिकार द्यायचे म्हणजे कारभार चालविण्यासाठीं लागणारा पैसा, त्यांचा त्यांना कर वसूल करून उभा करतां आला पाहिजे, नाहींतर राज्यसरकारचें भिंधेपण त्यांच्या पदरीं येईल. या-पासून ग्रामपंचायतीचें रक्षण झालें पाहिजे.

भारताच्या भोंवतालीं असणाऱ्या अनेक लोकसत्ताक राज्यांच्या स्वरूपांत झालेला बदल चिंताजनक आहे. लोकशाही लष्करशाहीच्या हातीं गेली किंवा हुकूमशाहीनें नामशेष केली असें दृश्य दिसत आहे. हें फार मोठें संकट आहे. लोक-सत्तेचें रक्षण लोकच करूं शकतील. इतर कोणत्याहि उपायांनीं तें होणार नाहीं आणि म्हणूनच लोकांना खरीखुरी सत्ता चालवितां येईल, आपला अभिक्रम प्रकट करतां येईल, पुरुषार्थ गाजवितां येईल, अशी व्यवस्था निर्माण करणें अनिवार्य व निकडीचें झालें आहे. अशा व्यवस्थेच्या शास्त्राला विनोबाजी "लोकनीति" असें नांव देतात. आजच्या युगाची ही अनिवार्य आवश्यकता आहे.

• • •

तीन निवडणुकांत अस्पृश्य समाजाची विशेषतः आंबेडकर अनुयायांची भूमिका काय होती, तींत कोणता बदल होत गेला आणि निवडणूक निकालांवर तिचा काय परिणाम झाला याचा आढावा त्या समाजांतील एक कार्यकर्ते ॲडव्होकेट शंकरराव खरात यांनीं या लेखांत घेतला आहे.

# तीन निवडणुका आणि आंबेडकर अनुयायी

लेखक : ॲड. शंकरराव खरात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं आपल्या विचार-प्रणालीनें व कार्यानें अस्पृश्य-वर्गांत जागृति, स्वाभिमान व महत्त्वाकांक्षा निर्माण केली. 'स्वतःचा उद्धार स्वतः केला पाहिजे, आपण स्वयंप्रकाशित झालें पाहिजे' ही स्वोद्धाराची जाणीव त्यांनीं अस्पृश्य-वर्गांत निर्माण केली. अस्पृश्यांचा प्रश्न सोडविण्यासाठीं, अस्पृश्यांची उन्नति करण्यासाठीं त्यांनीं घटनात्मक पाऊल टाकलें. अस्पृश्यांची स्वतंत्र पक्ष संघटना स्थापून त्याला त्यांनीं शास्त्रीय विचाराची तात्त्विक बैठक दिली. याच पक्षाच्या आधारानें डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालीं सुरवातीला अस्पृश्यवर्ग महाराष्ट्रांत स्वतंत्रपणें निवडणुकीच्या आखाड्यांत उतरला होता.

१९३६–३७ सालीं डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना मुंबई व मध्यप्रांत (जुना) या प्रांतांत झाली होती. याच पक्षाच्या नेतृत्वाखालीं १९३७ सालची निवडणूक अस्पृश्य वर्गानें लढविली. या निवडणुकीच्या आधारें डॉ. आंबेडकर यांनीं आपल्या स्वतंत्र मजूर-पक्षाची संघटना-शक्ति वाढवून आपला समाज आपल्या पाठीशीं उभा केला.

## • शेड्यूल्ड कास्टस फेडरेशनची स्थापना

डॉ. आंबेडकर यांनीं अस्पृश्यांचा भारतव्यापी प्रश्न पाहून, १९४२ सालीं नागपूर येथील अधिवेशनांत 'शेड्यूल्ड कास्ट्स् फेडरेशन या नांवाचा अखिल भारतीय स्वरूपाचा पक्ष स्थापन केला आणि १९४६ सालची सार्वत्रिक निवडणूक शे. का. फेडरेशनच्या वतीनें लढवून त्यांनीं भारतांतील इतर प्रांतांतहि अस्पृश्य समाज आपल्या पाठीशीं उभा केला आणि भारतीय अस्पृश्यांचे नेते म्हणून डॉ. आंबेडकर मान्यता पावले.

१९३७ व १९४६ या सालांतील दोन्हीहि निवडणुका डॉ. आंबेडकर यांनीं दुसऱ्या कोणत्याच पक्षाशीं सहकार्य न करतां स्वतंत्रपणें आपल्याच पक्षामार्फत लढविल्या होत्या. १९३७ मध्यें निवडणुकींत यश मिळालें, पण १९४६ मध्यें संयुक्त मतदार संघामुळें पूर्ण पराभव पत्करावा लागला.

राजकीय निवडणुकीच्या आखाड्यांत–'आपण (आपल्या पक्षानें) एकाकी निवडणूक न लढवितां ती आपल्या पक्षाचे ध्येय-धोरणाशीं सहमत असलेल्या काँग्रेस विरोधी पक्षाबरोबर सहकार्य करून लढवावी' हा सहकार्याचा विचार डॉ. आंबेडकर यांच्या मनांत व प्रत्यक्ष कृतींतहि १९५२ सालच्या निवडणुकींत प्रथम आला.

शेडयूल्ड कास्टस् फेडरेशनचा १९५२ सालीं प्रसिद्ध झालेला निवडणूक जाहीर-नामा त्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. तो डॉ. आंबेडकरांनीं स्वतः तयार केला होता. त्यांतच निवडणूक सहकार्याची भूमिका त्यांनीं घेतली आहे.

निवडणुकींत काँग्रेसविरुद्ध आपण फक्त आपल्या समाजाच्या मतांवर निवडून येऊं शकत नाहीं. याकरितां आपल्या ध्येय धोरणांशीं सहमत असलेल्या पक्षाशीं, आपलें स्वतंत्र अस्तित्व ठेवून, सहकार्यानें निवडणुकी लढविण्याची भूमिका १९५२ सालच्या निवडणुकींत डॉ. आंबेडकर यांनीं घेतली. आणि याच सहकार्याच्या भूमिकेला अनुसरून मुंबई व मध्य प्रांतांत समाजवादी पक्षाबरोबर शे. का. फेडरेशननें डॉ. आंबेडकरांच्या आदेशाप्रमाणें सहकार्य केलें.

## • शे. का. फे. चा निवडणूक जाहीरनामा

१९५२ सालीं शेडयूल्ड कास्टस् फेडरेशन पक्षानें प्रसिद्ध केलेल्या निवडणूक जाहीरनाम्यांतील महत्त्वाची मार्गदर्शक विचारसरणी पुढीलप्रमाणें होती :—

(१) कायद्यापुढें सर्व भारतीय समान आहेत असें आमचा पक्ष मानील आणि त्याचबरोबर त्यांचा समानतेचा अधिकारहि राहील. जेथें समानता नाहीं, तेथें पक्ष ती स्थापन करील व जेथें समानता नाकारली असेल तेथें ती मान्य करून घेईल.

(२) व्यक्ति ही सर्व दृष्टींनीं केंद्रबिंदु आहे असें पक्ष मानील व त्या दृष्टीनें व्यक्तीला त्याच्या मार्गानें त्याचा उद्धार करण्याचा हक्कहि राहील. व्यक्तीचा सर्वांगीण उद्धार व विकास हें साध्य राहील. या साध्याचें स्टेट (राज्य) हें केवळ साधन म्हणून मानलें जाईल.

(३) प्रत्येक भारतीयाला समान संधीचा हक्क पाहिजे हें पक्ष मान्य करील. परंतु त्याचबरोबर ज्या वर्गांना आजपावेतों स्वउद्धाराची संधीच मिळाली नसेल त्यांना अगोदर संधि मिळावी हेंहि पक्षाचें धोरण राहील.

(४) हा पक्ष स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रस्थापित करण्यासाठीं सारखी धडपड करील आणि त्याचबरोबर एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीची, एका वर्गानें दुसऱ्या वर्गाची आणि एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राची पिळवणूक व दडपशाही या पासून मुक्ति करण्याचा सदैव प्रयत्न करील.

(५) हा प्रक्ष संसदीय लोकशाही ही राज्यपद्धति व्यक्ति व जनता यांच्या हिताच्या दृष्टीनें उत्तम आहे असें मानतो.

याप्रमाणें डॉ. आंबेडकर यांनीं थोडक्यांत आपली विचारसरणी १९५२ सालीं निवडणूक जाहीरनाम्यांत मांडली व ती समाजवादी पक्षाला मान्य झाली. म्हणून १९५२ सालीं निवडणुकींत समाजवादी पक्षाबरोबर मुंबई व मध्य प्रांत या दोन प्रांतांत त्यांनीं सहकार्य केलें.

## • संयुक्त मतदार संघामुळें पराभव

या १९५२ च्या निवडणुकींत एक अपवाद वगळून लोकसभा व विधान सभेच्या सर्व जागांवर शे. का. फे. चा पराभव झाला. स्वत: डॉ. आंबेडकरांचाहि पराभव झाला. अस्पृश्य वर्गाचीं नव्वद टक्के मतें मिळूनहि केवळ संयुक्त मतदार संघ पद्धतीमुळें डॉ. आंबेडकर व त्यांच्या सर्व अनुयायी उमेदवारांचा पराभव झाला. पण निवडणुकींत पराभव झाला असला तरी शेडयूल्ड कास्ट्स् फेडरेशनची संघटना-अस्पृश्य समाजाची संघटना अधिकच बळकट झाली होती.

१९५२ सालच्या निवडणुकींतील दुसरें एक वैशिष्ट्य असें कीं, जरी महाराष्ट्रानें सर्व ठिकाणीं समाजवादी पक्षाबरोबर शे. का. फेडरेशनतर्फें निवडणूक सहकार्य होतें तरीदेखील शेतकरी कामगार पक्षाचे नेते कै. केशवराव जेधे, श्री. शंकरराव मोरे, श्री. भाऊसाहेब राऊत यांना पुणें, सोलापूर व कुलाबा या भागांत शे. का. फेडरेनच्या अनुयायांनीं आपलीं मतें द्यावींत असाहि आदेश डॉ. आंबेडकर यांनीं दिला होता. त्या आदेशाप्रमाणें या शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांना आंबेडकर अनुयायांनीं आपलीं हुकमी मतें दिलीं होतीं.

१९३७ ते १९५२ पर्यंतच्या निवडणुकींतील अनुभवानें डॉ. आंबेडकरांनीं आपल्या समाजांतील हुकमी मत व प्रभावी संघटना आपल्या पाठीशीं उभी केली आणि आपल्या हुकमी मतांचा दराराहि निर्माण केला.

## • समितीशीं १९५७ मध्यें सहकार्य

१९५७ च्या निवडणुका जवळ येऊं लागल्या होत्या. संयुक्त महाराष्ट्र समितीचा लढाहि जोरांत फोफावत होता. समितींत इतर सर्व पक्ष होतेच. निवडणुकीच्या दृष्टीनें आंबेडकर अनुयायांचीं—शे. का. फेडरेशनची हुकमी मतें आपल्याला मिळावींत म्हणूनच डॉ. आंबेडकरांच्याबरोबर भाई डांगे, दत्ता देशमुख, एस्. एम्.

जोशी, आचार्य अत्रे, र. के. खाडिलकर आदि समिति नेत्यांनीं दिल्ली येथें बोलणीं केली आणि त्यांनीं घातलेल्या अटी या नेत्यांनीं मान्य केल्यावर डॉ. आंबेडकर यांनीं आपल्या अनुयायांना व आपला पक्ष शे. का. फेडरेशनला संयुक्त महाराष्ट्र समितीबरोबर निवडणूक सहकार्य करण्याचा आदेश दिला.

दुर्दैवानें ता. ६ डिसेंबर १९५६ ला डॉ. आंबेडकर यांचें महापरिनिर्वाण झालें. तरी देखील त्यांच्या अनुयायांनीं समितीबरोबरचा निवडणूक करार पाळला. व आपलें हुकमी मत समितीला देऊन, समितीच्या यशाचा मोठा वांटा मिळविला. विशेषत: १९५७ सालीं आंबेडकर समाजाच्या हुकमी मतांचा व शे. का. फेडरेशन या संघटनेच्या संघटनात्मक एकजुटीचा दरारा भलताच जाणवला. आणि निवडणुकीच्या राजकारणांत आंबेडकरांचे मतदार हे आपल्या मत सामर्थ्याच्या जोरावर सत्तेचा तराजू खालीं वर करूं शकतात हें त्यांनीं इतरांना जाणवून दिले हेंच या निवडणुकीचें वैशिष्ट्य होय.

## • रिपब्लिकन पक्षाची स्थापना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं ता. १४ ऑक्टोबर १९५६ रोजीं नागपूर येथें बौद्ध धर्मांची दीक्षा घेतली. त्याच सुमारास १३ ऑक्टोबर १९५६ रोजीं रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला होता. डॉ. आंबेडकर अकाली दिवंगत झाल्यानें त्यांच्यामागें त्यांच्या अनुयायांनीं ता. ३ ऑक्टोबर १९५७ रोजीं नागपूर येथें व्यापक अशा रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली आणि त्याचबरोबर अस्पृश्यांसाठीं असलेला शे. का. फेडरेशन हा पक्ष बरखास्त केला.

ता. ३ ऑक्टोबर १९५७ रोजीं रिपब्लिकन पक्षाचा जन्म झाला. एकाच वर्षांत म्हणजे ता. ३ ऑक्टोबर १९५८ नंतर या पक्षांत नेतृत्वाच्या–पक्षपदाधिकारीपणाच्या तांत्रिक मुद्यावर मतभेद पडले, आणि ता. १३ मे १९५९ रोजीं कांबळे गटाचा ‘ दुरुस्त रिपब्लिकन पक्ष ’ ( दुसरा स्वतंत्र पक्ष ) जन्माला आला. त्यावेळेपासून रिपब्लिकन पक्षांत दोन गट मुख्यत्वें महाराष्ट्रांतच पडले व त्याचबरोबर अस्पृश्य समाजांतहि दोन गट पडले.

जसजसा कालावधि जाऊं लागला, तसतसें या दोन गटांचें मोठ्या शहरांतील अस्तित्व जिल्हा तालुका व खेड्यापर्यंत पोहोंचलें. व ते एकमेकांचे राजकीय विरोधक बनले.

## • पक्ष फुटला : रिपब्लिकन मतें फुटलीं

१९६२ च्या निवडणुकींत रिपब्लिकन पक्षांतील कांबळे गटानें प्रजासमाजवादी पक्षाबरोबर सहकार्य केलें, तर भंडारे गट नांवानें ओळखला जाणारा दुसरा रिपब्लिकन पक्ष समितींत राहिला. महाराष्ट्रांत कांबळे गटानें भंडारे–गायकवाड

गटाच्या प्रत्येक उमेदवाराविरुद्ध आपल्या गटाचा उमेद्वार उभा केला होता. अर्थात् यांत आपापल्या गटाची शक्ति अजमविण्याचाहि त्यांचा हेतु असावा असें वाटतें.

डॉ. आंबेडकरांच्या रिपब्लिकन पक्षांत जेव्हां दोन गट निर्माण झाले तेव्हां डॉ. आंबेडकरांनीं गेलीं तीस वर्षें खपून मोठ्या परिश्रमानें बांधलेली दलित, अस्पृस्य वर्गाची संघटना फुटली व त्याचबरोबर रिपब्लिकन पक्षाचीं–आंबेडकर अनुयायांचीं हुकमी मतें दोन गटांत (दोन उमेदवारांत) विभागल्यानें फुटलीं. या दोन्हीहि गटांच्या लोकसभा व विधान सभेच्या उमेद्वारांचा पराभव होण्यास हें एक मोठें कारण घडलें आणि त्याचबरोबर आंबेडकर अनुयायांच्या हुकमी मतांचा दराराहि संपत आल्याचें दृश्य दिसलें. हा या निवडणुकींतील मोठा परिणाम होय.

रिपब्लिकन पक्षांतील या फुटीमुळें या समाजांत मोठें वैफल्य व नैराश्य निर्माण झालें. त्यामुळें आतां आपण कोणास मत द्यावें? याच गोंधळाच्या काळजीनें रिपब्लिकन पक्षांतील बऱ्याच मतदारांनीं आपलीं मतें न नोंदवितां तो अलिप्त राहिलेला दिसत होता.

१९३७ ते १९५७ पर्यंतच्या निवडणुकांत डॉ. आंबेडकर व शेड्यूल्ड कास्टस फेडरेशन पक्षाच्या आदेशाप्रमाणें आंबेडकर अनुयायांनीं आपलीं हुकमी मतें ठरलेल्या आपल्या पक्षाच्या व इतर सहकार्य दिलेल्या उमेदवारांना दिलीं होतीं. परंतु १९६२ च्या निवडणुकींत या दोन गटांच्या नेत्यांचा आदेश तंतोतंत पाळला गेला असें दिसत नाहीं. या समाजांतील अनेक मतदारांनीं आपापलीं मतें आपल्या मनाप्रमाणें ठरवून दिलीं असल्याचें दिसतें.

## ● कांहीं ठिकाणीं कॉंग्रेसला मत

१९३७ ते १९५७ पर्यंतच्या निवडणुकांत आंबेडकर अनुयायांचें मत कधींच कॉंग्रेस उमेदवाराला मिळालें नाहीं. परंतु १९६२ च्या निवडणुकींत अनेक मतदार संघांत आंबेडकर अनुयायांचीं मतें कॉंग्रेस उमेदवारालाहि पडलीं आहेत असें दिसते. या समाजांतील मतदारांवर झालेला हा परिणामहि विशेष वाटतो. याला पक्षांतील दुहीबरोबर दुसरींहि कारणें आहेत.

या समाजांतील एका गटाचीं मतें प्रजासमाजवादी व दुसऱ्या गटाचीं मतें समितींतील इतर पक्षांना मिळालीं. त्याचा फायदा या रिपब्लिकन पक्षांतील दोन गटांना न होतां इतर सहकारी पक्षांनाच अधिक झाला.

या निवडणुकीनें रिपब्लिकन पक्षांतील दोन गटांचा वाद शहरांतून खेडोपाडीं गेला व त्यांतून दोन गटांत अधिकच वैमनस्य व शत्रुत्व वाढीस लागलें. त्यामुळें डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं बांधलेल्या मजबूत संघटनेला मोठा तडा जाऊन, या समाजांत अधिकच वैफल्य व नैराश्य निर्माण झालें.

● ● ●

- काँग्रेस व कम्युनिस्ट जैसे थे
- प्रजासमाजवाद्यांची वाताहत
- उजव्या गटाचा वाढता जोर
- प्रमुख विरोधी मोहरे पडले
- केरळमध्यें कम्युनिष्टांच्या बाजूनें कौल
- ओरिसांत काँग्रेज सुस्थिर

तिन्ही लोकसभा निवडणुकांच्या तुलनात्मक आढावा घेणारा लेख.

# लोकसभा निवडणुकीचा कौल

लेखक : वा. दा. रानडे

लोकसभा निवडणुकीचे निकालांत सबंध देशांतील लोकमतांचें चित्र डोळ्यापुढें एकत्रित उभें राहतें. काँग्रेसला बहुसंख्य जागा मिळणार हें उघडच दिसत होतें. लोकसभेच्या एकूण नियुक्त ४९४ जागापैकीं ४८९ जागांचे निकाल जाहीर झाले. त्यांत काँग्रेसला ३५६ जागा मिळाल्या. १९५१–५२ च्या निवडणुकींत ३५७ व १९५७ च्या निवडणुकींत ३७१ जागा मिळाल्या होत्या. आनिर्णित सर्व जागा काँग्रेसनें मिळविल्या, तरी १९५७ एवढ्या जागा काँग्रेस मिळवूं शकत नाहीं. म्हणजे जागांच्या दृष्टीनें काँग्रेसचें वजन १९५७ पेक्षां थोडें घटलें आहे. मतदानाच्या दृष्टीनें विचार केला तरी काँग्रेसला मिळालेला पाठिंबा थोडा कमी झाल्याचें दिसून येतें. १९५१–५२ च्या निवडणुकींत काँग्रेसला ४५ टक्के, १९५७ मध्यें ४७·७८ टक्के आणि १९६२ साली ४५·२४ टक्के मतें मिळालीं आहेत. म्हणजे १९५७ मेक्षां २·५४ मतें कमी मिळालीं. तिन्ही निवडणुकांत ५० टक्क्यांपेक्षां अधिक मतें काँग्रेसनें एकदांहि मिळवलेली नाहींत. बहुसंख्य लोकमत १९५२ पासून काँग्रेसविरुद्धच आहे पण हें काँग्रेसविरोधी बहुमत निरनिराळ्या पक्षांमध्यें विभागलें गेल्यानें तिन्ही निवडणुकांत बहुसंख्य जागा मिळवून काँग्रेस अधिकारारूढ होऊं शकली. आणि प्रबल विरोधी पक्ष स्थापन होत नाही तोंपर्यंत या परिस्थितींत फरक पडण्याचा संभव दिसत नाहीं.

## • नव्या लोकसभेंतील नवें रक्त

नव्या लोकसभेंतील ३५३ काँग्रेस सभासदांमध्यें १५३ नव्यानें निवडून आलेले आहेत. उमेदवारांची निवड करतानांच काँग्रेसनें विद्यमान खासदारांपैकीं १२५ म्हणजे एक तृतीयांश खासदारांना निवृत्त केलें होतें व आणखी ७५ जणांना लोकांनीं निवडणुकींत पराभव करून निवृत्त केलें. चार जुन्या खासदारांमागें तीन नवे खासदार असें काँग्रेसपक्षांतील नव्या जुन्या खासदारांचें प्रमाण आहे.

लोकसभेंतील विरोधी पक्षांत तर काँग्रेसपेक्षांहि अधिक प्रमाणांत नवें रक्त आलेलें आहे. कम्युनिस्ट पक्षाचे २९ सभासद निवडून आले. शिवाय आणखी पांच सभासदांचा आपणांस पाठिंबा असल्याचा त्या पक्षाचा दावा आहे. पण कम्युनिस्ट गटापैकीं फक्त १२ सभासद जुने आहेत. गणतंत्र परिषद धरून स्वतंत्र पक्षाच्या २२ सभासदांमध्यें रामगडच्या दोन राण्या सोडल्या तर बाकी सर्व नवे आहेत. जनसंघाचे सर्व चौदा सभासद नवीन आहेत. प्रजासमाजवादी पक्षाच्या बारा सभासदांपैकीं फक्त तीन किंवा चार जुने आहेत. द्रवीड मुन्नेत्र कळघमच्या सात सभासदांपैकीं बहुतेक तसेच बाकीच्या ४७ अपक्ष खासदारांपैकी बहुसंख्य नवे आहेत. आणि सर्वांत जाणवणारी गोष्ट म्हणजे श्री. डांगे, अशोक मेहता ना. ग. गोरे, आचार्य कृपलानी, व्रजराजसिंग, प्रो. एन. जी रंगा, अटल बिहारी वाजपेयी हे विरोधी पक्षांचे प्रमुख नेते पराभूत झाले. त्यांचे चेहरे नव्या लोकसभेंत दिसणार नाहींत. त्यामुळें तर विरोधी पक्षाचे नवेंपण अधिक उठावानें जाणवते.

विरोधी पक्ष संख्येनें लहान. त्यांत पुनः डावा गट आणि उजवा गट असे दोन तट स्पष्टपणें पडलेले. त्यामुळें नव्या लोकसभेंत विरोधी पक्षाचा विरोध फारसा प्रभावी वाटणार नाहीं.

## • स्वतंत्र पक्ष व जनसंघास अधिक जागा

लोकसभा निवडणुकीचा राजकीय मतप्रवाहाच्या दृष्टीनें विचार केला तर उजव्या गटांचा जोर वाढत चालल्याचें स्पष्टपणें दिसून येतें. स्वतंत्र पक्षानें निवडणुकींत प्रथमच भाग घेऊन ८.५ टक्के मतें मिळविलीं. जागा व मतें दोन्ही दृष्टींनीं लोकसभेंत तिसऱ्या क्रमांकाचें स्थान या पक्षानें मिळविलें. उजव्या गटांतील दुसरा पक्ष जनसंघ. या पक्षानें १४ जागा आणि ६.११ टक्के मतें मिळविलीं. १९५१–५२ च्या निवडणुकींत जनसंघास ३ जागा व ३.२४ टक्के मतें आणि १९५७ मध्यें ७ जागा व ५.९३ टक्के मतें मिळालीं होतीं. जागा व मतें दोन्ही दृष्टींनीं जनसंघाचें वजन तिन्ही निवडणुकींत हळूहळू कसें वाढत आहे याची कल्पना यावरून येईल. स्वतंत्र पक्ष, गणतंत्र परिषद आणि जनसंघ हा एक गट समजला

तर त्यांना एकूण ४० जागा व १४·९५ टक्के म्हणजे १५ टक्के मतें मिळालेलीं आहेत.

## • प्रजासमाजवादी पक्षाची वाताहत

डाव्या गटांच्या दृष्टीनें तिन्ही निवडणुकींत जाणवणाऱ्या दोन ठळक गोष्टी म्हणजे कम्युनिस्टांना वाढता पाठिंबा आणि प्रजासमाजवाद्यांची वाढती पीछेहाट कम्युनिस्टांना मिळालेल्या जागांत फारशी भर पडलेली नाहीं. १९५१–५२ आणि १९५७ या दोन्ही निवडणुकांत त्यांना २७ च जागा मिळाल्या होत्या आणि १९६२ मध्यें फक्त दोन जास्त म्हणजे २९ जागा मिळाल्या आहेत. त्यांना मिलालेल्या मतांचें प्रमाणांत याच तीन निवडणुकांत दुपटीनें वाढ होत गेली आहे. १९५१–५२ मध्यें ५·५ टक्के, १९५७ मध्यें ८.१२ टक्के आणि १९६२ मध्यें १०·६७ टक्के अशी ही चढती कमान आहे. या उलट परिस्थिति प्रजासमाजवाद्यांची आहे १९५१–५२ चे निवडणुकींत प्रजासमाजवादी पक्ष अस्तित्वांत नव्हता. पण ज्या दोन पक्षांमधून हा पक्ष पुढें निर्माण झाला त्या पक्षांना (समाजवादी पक्ष व किसान मजदूर प्रजा पक्ष मिळून ) २२ जागा आणि १७·३६ टक्के मतें मिळालीं होतीं. दोन्ही पक्षांच्या एकीकरणानें बळ वाढेल अशी अपेक्षा होती पण प्रत्यक्षांत तसें घडलें नाहीं. १९५७ च्या निवडणुकींत प्रजासमाजवादी पक्षास १९ जागा आणि १०·४१ टक्के मतें मिळालीं. म्हणजे ३ जागा व ७ टक्के मतें कमीच मिळाली. १९६२ च्या निवडणुकींत ही घसरगुंडी अधिकच वाढली. प्रजासमाजवादी पक्षास फक्त १२ जागा आणि ७·०८ टक्के मतें मिळालीं. देशांत काँग्रेसला प्रतिस्पर्धी पक्ष आमचाच असा दावा मांडणाऱ्या या पक्षाची तीन निवडणुकांत या प्रमाणें वाताहात झाली.

## • केरळमधील मतदानाचा अर्थ

केरळ आणि ओरिसा या दोन राज्यांत विधानसभा निवडणूक यावेळीं झाली नाहीं. त्यामुळें तेथील बदलत्या लोकमताचा प्रवाह समजण्याचें दृष्टीनें या दोन राज्यांतील लोकसभा निवडणुकीचा अधिक सविस्तर विचार केला पाहिजे. केरळमधील लोकसभेच्या १८ जागांपैकीं काँग्रेस–समाजवादी संयुक्त आघाडीनें सर्व जागा लढविल्या होत्या. पण त्यांना फक्त ६ जागा मिळाल्या या सर्व ६ जागा काँग्रेसला मिळाल्या असून प्रजासमाजवादी पक्षास एकहि मिळाली नाहीं. काँग्रेसनें १४ व प्रजासमाजवादी पक्षानें ४ उमेदवार उभे केले होते. १९५७ च्या निवडणुकींत काँग्रेसनें १७ जागा लढविल्या होत्या. व त्यापैकीं फक्त ६ जिंकल्या होत्या. म्हणजे १९५७ एवढ्याच जागा १९६२ मध्यें काँग्रेसनें मिळविल्या प्रजासमाजवादी पक्षानें १९५७ च्या निवडणुकींत मुस्लीम लीगशीं निवडणूक करार

केला होता. त्यांनीं आठ उमेदवार उभे केले. त्यापैकीं एक विजयी झाला १९६२ मध्यें मात्र काँग्रेसशीं संयुक्त आघाडी असूनहि एकहि जागा ते मिळवूं शकलें नाहींत. १९६० च्या विधानसभा निवडणुकींत काँग्रेस, प्रजासमाजवादी व मुस्लीमलीग यांनीं कम्युनिस्टांविरूद्ध संयुक्त आघाडी केली होती. पुढें या आघाडीतून मुस्लीमलीग बाहेर पडली व १९६२ ची लोकसभा निवडणुक तिनें स्वतंत्रपणें लढविली. १९५७ च्या निवडणुकींत प्रजासमाजवाद्यांशीं निवडणूक करार असतांनाहि लीगनें ४ जागा लढविल्या व फक्त एक जिंकली. यावेळीं लीगनें स्वतंत्रपणें निवडणूक लढवून तीन उमेदवार उभे केले होतें त्यापैकीं दोघे निवडून आले.

काँग्रेसनें केरळमध्यें १९५७ एवढ्या जागा टिकविल्या. तिच्या मतांचें प्रमाण मात्र आणखी घटलें. १९५७ मध्यें काँग्रेसला ३४·७५ टक्के मतें मिळालीं होतीं. यावेळीं ३३·६ टक्के मिळालीं. काँग्रेस आणि प्रजासमाजवादी यांच्या संयुक्त आघाडीला मिळून ४३·३ टक्के मतें यावेळीं मिळालीं. १९६० च्या विधानसभा निवडणुकींत काँग्रेस-प्रजासमाजवादी-मुस्लीम लीग यांच्या संयुक्त आघाडीला ५५ टक्के मतें मिळालीं होतीं. १९६२ च्या लोकसभा निवडणुकींत फक्त ४३·२ टक्के मिळालीं. मुस्लीम लीग आघाडींतून फुटली होती. पण त्या पक्षाचीं मतें जमेस धरलीं तरी हें प्रमाण ४५·७ टक्के होतें. केरळमधील बहुमताचा पाठिंबा आतां कम्युनिस्टविरोधी संयुक्त आघाडीस राहिलेला नाहीं असाच याचा उघड अर्थ आहे.

केरळमध्यें १९५७ व १९६० च्या निवडणुकांचे तुलनेनें कम्युनिस्टांचें सामर्थ्य कितपत वाढलें आहे हें आतां पहावयाचें. १९५७ च्या निवडणुकींत लोकसभेच्या १८ पैकीं ९ म्हणजे निम्म्या जागा कम्युनिस्टांनीं जिंकल्या होत्या व त्यांना ३७·४८ टक्के मतें मिळालीं होतीं. विधानसभा निवडणुकींत कम्युनिस्ट पुरस्कृत स्वतंत्र ५ धरून कम्युनिस्टांना १२६ पैकीं ६५ म्हणजे बहुसंख्य जागा मिळाल्या होत्या व मतें ४० टक्के होतीं. १९६० च्या विधानसभा निवडणुकींत कम्युनिस्टांना १२६ पैकीं फक्त २६ जागा मिळाल्या. कम्युनिस्ट विरोधकांनीं संयुक्त आघाडी केल्यामुळें जागांच्या दृष्टीनें कम्युनिस्टांचा फार मोठा पराभव झाला हें खरें ! पण मतदान हाच लोकमताचा खरा निकष मानला तर कम्युनिस्ट व कम्युनिस्टपुरस्कृत स्वतंत्रांना ४३ टक्के मतें मिळालीं. म्हणजे मतांच्या प्रमाणांत ३ टक्के वाढ झाली. १९६२ च्या लोकसभा निवडणुकींत कम्युनिस्ट ६, कम्युनिस्ट-पुरस्कृत स्वतंत्र ३ व कम्युनिस्टपुरस्कृत क्रांतिकारी समाजवादी पक्ष १ धरून १८ पैकीं १० जागा कम्युनिस्ट गटास मिळाल्या. म्हणजे १९५७ पेक्षां त्यांनीं एक जागा जास्तच मिळविली. मतांचे दृष्टीनेंहि कम्युनिस्टांना असलेल्या पाठिंब्यांत निश्चित वाढ झालेली आहे. १९६२ मध्यें कम्युनिस्ट व कम्युनिस्ट पुरस्कृत स्वतंत्रांना ४९·५ टक्के मतें मिळालीं आहेत. नुसत्या कम्युनिस्टांना पडलेल्या मतांचे प्रमाणांत

मात्र थोडी घट झालेली दिसते. १९५७ मध्यें कम्युनिस्ट पक्षास लोकसभेचे मतदानांत ३७·४८ टक्के मतें मिळालीं होतीं. १९६२ मध्यें हें प्रमाण ३४·७ टक्के आहे. विधानसभेची निवडणूक १९६२ मध्यें झालेली नसली तरी ती झाली असती तर मतदान काय स्वरूपाचें झालें असतें याची कल्पना लोकसभेच्या मतदानावरून येण्यासारखी आहे. विधानसभेच्या १२६ मतदार संघापैकीं ७७ म्हणजे बहुसंख्य मतदार संघांतील मतदानांत कम्युनिस्ट व त्यांच्या पुरस्कृतांना बहुमत मिळालेलें आहे. उलट, कॉंग्रेस–प्रजासमाजवादी संयुक्त आघाडीस फक्त ४० मतदारसंघांत बहुमत मिळालें. या आघाडींतील पूर्वींचा पण नंतर फुटून निघालेला घटक-मुस्लीम-लीगला ९ मतदारसंघांत बहुमत मिळालें. विधानसभेच्या बहुसंख्य मतदारसंघांत मतदारांचा कौल याप्रमाणें स्पष्टपणें कम्युनिस्टांच्या बाजूनें दिसून आला.

## ● ओरिसांत कॉंग्रेस आसन सुस्थिर

ओरिसामध्यें मात्र कॉंग्रेसचें आसन अधिक सुस्थिर झाल्याचें लोकसभा निवडणुकीवरून दिसून येतें. जागा व मतें दोन्हीं दृष्टींनीं कॉंग्रेसला तेथें असलेला मतदारांचा पाठिंबा वाढला. १९५७ च्या निवडणुकींत कॉंग्रेसनें २० पैकीं ८ जागा जिंकल्या होत्या. या वेळीं १४ जागा जिंकल्या. १९५७ मध्यें ४०.०१ टक्के व या वेळीं ५५.५३ टक्के मतें मिळालीं. या उलट कॉंग्रेसची मुख्य प्रतिस्पर्धी जी गण तंत्र परिषद तिचें वजन, जागा आणि मतें दोन्हीं दृष्टींनीं घटलें. १९५७ मध्यें या पक्षास ७ जागा व २९.१० टक्के मतें मिळालीं होतीं. या वेळीं ४ जागा व १७.४२ टक्के मतें मिळालीं १९६१ मधील विधानसभा निवडणुकींत कॉंग्रेसला ४४.४४ टक्के व गणतंत्र परिषदेस २१.८१ टक्के मतें मिळालीं होतीं. म्हणजे त्या नंतरच्या एक वर्षांत कॉंग्रेसचें वजन आणखी वाढलें व गणतंत्र परिषदेचें आणखी घटलें असेंच १९६१ मधील लोकसभा मतदानाचे आकडे दर्शवितात.

## ● समितीस एकहि जागा नाहीं.

निरनिराळ्या राज्यांच्या दृष्टीनें लोकसभा निवडणुकीचा विचार केला तर महाराष्ट्रांत कॉंग्रेसनें मिळविलेला प्रचंड विजय एकदम डोळ्यांत भरतो. एकुण ४४ पैकीं ४१ जागा कॉंग्रेसनें जिंकल्या. प्रमुख विरोधी पक्ष समितीस एकहि जागा मिळाली नाहीं. १९५७ च्या निवडणुकींत समितीनें महाराष्ट्रांत २३ व कॉंग्रेसनें २० जागा मिळविल्या होत्या म्हणजे कॉंग्रेसचें पक्षबळ दुपटीपेक्षांहि अधिक वाढलें. महाराष्ट्राप्रमाणें ओरिसामध्येंही कॉंग्रेसला १९५७ पेक्षां दुप्पट म्हणजे ६७ जागा अधिक मिळाल्या. म्हैसूरमध्यें दोन जागा कॉंग्रेसनें पूर्वींपेक्षां जास्त मिळविल्या. आसाम, केरळ, मद्रास या तीन राज्यांत जागांच्या दृष्टीनें कॉंग्रेसचें बळ पूर्वींचेंच कायम राहिलें. त्यांत वाढ झाली नाहीं. किंवा घटहि झाली नाहीं. राजस्थान,

ग्रा. क्र. 92335

पश्चिम बंगाल, पंजाब, आंध्र, बिहार, गुजरात व मध्यप्रदेश या राज्यांत काँग्रेसला १९५७ पेक्षां कमी जागा मिळाल्या. मध्यप्रदेशांत ३५ वरून २४. पंजाबमध्यें २१ वरून १३ आणि राजस्थानांत १९ वरून १४ याप्रमाणें पक्षबळ घटलें इतर राज्यांतील घट विशेष मोठी नाहीं.

## ● मेनन विरुद्ध कृपलानी सामना

लोकसभा निवडणुकींत सर्वांत गाजलेली निवडणूक म्हणजे उत्तर मुंबईतील संरक्षणमंत्री कृष्ण मेनन विरुद्ध आचार्य कृपलानी यांचा सामना. मेनन यांनीं त्यांत जवळजवळ दीड लाख मतांनीं विजय मिळविला. देशाचें चिनी आक्रमणविषयक धोरण, संरक्षण धोरण व परराष्ट्र धोरण या निवडणुकींत घसास लागलें होतें. मेनन यांच्याविरुद्ध प्रजासमाजवादी पक्ष स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ यांनीं संयुक्त आघाडी केली होती. मेनन छुपे कम्युनिस्ट आहेत हा त्यांच्या प्रचाराचा मुख्य सूर होता. मेनन विरोधकांचा खरा विरोध पंतप्रधान पंडित नेहरूंच्याच धोरणाला होता तसा उघड विरोध करण्याचें धैर्य त्यांच्यांत नव्हतें. म्हणून मेनन यांचा पराभव करण्यासाठीं त्यांनीं सर्व शक्ति एकवटल्या होत्या. त्यांचें हें स्वरूप उघड करतांना नेहरूंनीं अनेक भाषणांत सांगितलें कीं, कृपलानींच्या मागें जमा झालेले गट प्रतिगामी आहेत. कम्युनिस्ट विरोधाच्या नांवाखालीं समाजवादालाच ते विरोध करीत आहेत. कोणत्याहि सत्तागटांत सामील न होण्याचें आपलें परराष्ट्रीय धोरण सोडून देऊन देशाने चिनी आक्रमणास विरोध करण्यासाठीं पाश्चात्यांची मदत घ्यावी असा त्यांचा प्रयत्न आहे. नियोजनाला, राष्ट्रीयकरणाला थोडक्यांत म्हणजे समाजवादालाच त्यांचा विरोध आहे. मेनन कम्युनिस्ट नसून समाजवादी आहेत. त्यांना कम्युनिस्ट ठरविण्यासाठीं मॅकार्थी छाप प्रचारतंत्र हे गट अवलंबीत आहेत. मुंबईच्या वृत्तपत्रांनींहि वस्तुस्थिति निदर्शक बातम्या न देतां आपल्या प्रचारानें असा आभास निर्माण केला कीं, मुंबईची बहुसंख्य जनता मेननविरोधी असून ते निश्चित पडणार ! पण खरी परिस्थिति काय आहे हें प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशींच उघड झालें. आणि मोजणीचे आंकडे येऊं लागले तसतसे मेनन यांना किती मोठ्या प्रमाणावर पाठिंबा आहे हें स्पष्ट झालें. मेनन यांच्या विजयानें आपलें संरक्षण धोरण, परराष्ट्र धोरण विशेषतः चिनी आक्रमणासंबंधीं धोरण योग्य आहे असाच कौल जनतेनें दिलेला आहे. हा कौल मेननविरोधी पक्षांनीं आतां खुल्या दिलानें मान्य केला पाहिजे.

लोकसभा निवडणुकींत डांगे, अशोक मेहता, गोरे, एन् जी रंगा, बाजपाय आणि विरोधी पक्षांचें सर्व मोहरे पराभूत झाले. लोकसभेंत संख्येच्या दृष्टीनें विरोधी पक्षाचें बळ पूर्वीपेक्षां थोडें वाढलें पण नेत्यांच्या अभावी त्यांचा विरोध परिणामकारक वाटणार नाहीं.

## • महिलांचें प्रतिनिधित्व

निवडणुकींत स्त्रियांसाठीं आतां राखीव जागा नाहींत. पण त्यामुळें स्त्रियांचें प्रतिनिधत्व कमी न होता उलट वाढलें आहे. नव्या लोकसभेंत ३४ महिला निवडून आल्या. ही संख्या पूर्वीच्या दोन्हीं निवणुकांपेक्षां जास्त आहे. १९५२ च्या निवडणुकींत १९ व १९५७ च्या निवडणुकींत २८ महिला निवडून आल्या होत्या. पक्षावर विचार केला तर नव्या लोकसभेंत निवडून आलेल्या ३४ महिला खासदारांमध्यें २८ काँग्रेस पक्षाच्या ४ स्वतंत्र आणि २ कम्युनिस्ट आहेत. यांत दोन महाराण्या असून एक काँग्रेसतर्फे व एक स्वतंत्र पक्षातर्फे निवडून आलेली आहे. मध्यप्रदेशांतून ग्वाल्हेरच्या महाराणी विजयाराजे शिंदे काँग्रेसतर्फे निवडून आल्या तर जयपूरच्या महाराणी गायत्रीदेवी स्वतंत्र पक्षातर्फे निवडून आल्या आहेत.

यंदाच्या निवडणुकींत कांहीं प्रमुख महिला पराभूत झाल्या. सरदार पटेलांच्या कन्या श्रीमती मणिबेन पटेल ( गुजरात ), श्रीमती इला चौधरी ( पश्चिम बंगाल ) आणि केरळमधील कम्युनिस्ट कार्यकर्त्या श्रीमती पार्वती कृष्णन् निवडून येऊं शकल्या नाहींत. नव्या महिला खासदारांमध्यें महाराष्ट्रांत एअर मार्शल मुकर्जी यांच्या पत्नी श्रीमती शारदा मुकर्जी निवडून आल्या आहेत.

१९५२ च्या निवडणुकींत १९ महिला खासदारांपैकीं १३ काँग्रेसच्या होत्या. १९५७ मध्यें २८ महिला निवडून आल्या, त्यापैकीं २४ काँग्रेसच्या होत्या. १९६२ मध्यें एकूण ३४ महिला विजयी झाल्या, त्यापैकीं २८ काँग्रेस पक्षाच्या आहेत. शेंकडा प्रमाण पाहिलें तर एकूण महिला खासदारांत १९५२ मध्यें ६५ टक्के जागा काँग्रेसला मिळाल्या होत्या. १९५७ मध्यें हें प्रमाण ८५·७१ टक्के आणि १९६२ मध्यें ८० टक्के आहे. म्हणजे काँग्रेसच्या महिला खासदारांची संख्या १९५७ पेक्षां चारनें वाढली असली तरी एकुण महिला खासदारांत त्यांचें शेंकडा प्रमाण थोडें घटलें आहे.

लोकसभा निवडणुकीचा साकल्यानें विचार करतां काँग्रेसला थोड्या जागा व मतें १९५७ पेक्षां कमी मिळालीं असलीं तरी प्रत्यक्षांत त्याचा कांहींच परिणाम जाणवण्यासारखा नाहीं. विरोधी पक्षाच्या आमदारांची संख्या थोडी वाढली. पण त्यांचे प्रमुख मोहरे पराभूत झाल्यानें प्रत्यक्षांत विरोधी पक्ष कमकुवत झाल्यासारखाच वाटेल. प्रमुख विरोधी पक्ष म्हणून कम्युनिस्टांनीं आपलें स्थान कायम टिकविलें. प्रजासमाजवाद्यांची घसरगुंडी वाढून जागांचे दृष्टीनें तो पांचव्या क्रमांकाचा पक्ष झाला. स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ या उजव्या गटाच्या पक्षांचा जोर वाढला. काँग्रेसला तुल्यबल प्रतिस्पर्धी पक्ष बनण्याइतकी त्यांची शक्ति वाढली नसली तरी देशांतील लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीनें त्यांचें वजन वाढणें अनिष्ट आहे.

## लोकसभेच्या तीन निवडणुका

### पक्षवार जागा व मतें

| पक्ष | १९५१–५२ | | १९५७ | | १९६२[3] | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जागा | शें. मतें | जागा | शें. मतें | जागा | शें. मतें |
| काँग्रेस | ३५७ | ४५ | ३७१ | ४७·७८ | ३५३ | ४५·२४ |
| कम्युनिस्ट | २७ | ५५ | २७ | ८·९२ | २९ | १०·६७ |
| समाजवादी[1] | १२ | ११·२१ | — | — | — | — |
| कि. म. प्र. प. | १० | ६·१५ | — | — | — | — |
| प्रजा समाजवादी[2] | — | — | १९ | १०·४१ | १२ | ७·०८ |
| जनसंघ | ३ | ३·२४ | ४ | ५·९३ | १४ | ६·११ |
| स्वतंत्र पक्ष | — | — | — | — | १८ | ८· ५ |
| इतर पक्ष व स्वतंत्र | ७२ | ३१·९७ | ७३ | २६·९६ | ५९ | २२·३३ |
| एकूण मतदान | — | — | — | ५९·३२ | — | ४७·६८ |

## • नव्या लोकसभेंतील पक्षबल

### जाहीर ४८९ जागांची विभागणी

| | | | |
|---|---|---|---|
| काँग्रेस | ३५६ | रिपब्लिकन | ३ |
| कम्युनिस्ट | २९ | झार खंड | ३ |
| स्वतंत्र | २६ | रामराज्य परिषद | २ |
| जनसंघ | १४ | मुस्लीम लीग | २ |
| प्रजासमाजवादी | १२ | पुरोगामी गट | १ |
| द्रवीड मुन्नेत्र कळघम | ७ | हिंदु सभा | १ |
| समाजवादी | ६ | इतर | २७ |

एकूण....४८९

१, हा समाजवादी पक्ष म्हणजे लोहियांचा समाजवादी पक्ष नव्हे, काँग्रेस-समाजवादी पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडल्यावर त्यानें हें नांव घेतलें होतें.

२. समाजवादी व किसान मजदूर प्रजापक्ष एकत्र येऊन प्रजासमाजवादी पक्ष स्थापन झाला.

३. १९६२ च्या निवडणुकींतल फक्त ४८५ जागांचे निकाल जमेस धरले पाहिजेत.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 33405 दि: 1-12-65
क्रमांक 2072 नों. दि: 24-12-65

महाराष्ट्रात काँग्रेसला मिळालेला प्रचंड विजय आणि सर्वच विरोधी पक्षांची झालेली वाताहत याचें तपशीलवार विश्लेषण व विवेचन निःपक्षपाती आणि वस्तुनिष्ठ भूमिकेवरून या लेखांत केलें आहे.

# महाराष्ट्रांतील निवडणूक

महाराष्ट्रांतील निवडणुकींत काँग्रेसला, दुसऱ्या कोणत्याहि राज्यांत मिळालें नाहीं एवढें प्रचंड यश मिळालें. विधानसभेंत ८० टक्के जागा काँग्रेसनें मिळविल्या. प्रमुख विरोधी पक्ष समितीची वाताहत होऊन तिला अवघ्या ३२ जागा मिळाल्या. १९५७ च्या निवडणुकींत याच समितीनें १२८ जागा मिळविल्या होत्या. लोकसभेवर तर समितीचा एकहि प्रतिनिधि निवडून येऊं शकला नाहीं. समितीप्रमाणेंच इतर विरोधी पक्षांचीहि वाताहत झाली. विरोधी पक्षांचे सर्व प्रमुख नेते पराभूत झाले. १९५७ च्या निवडणुकींत गमावलेलें स्थान काँग्रेसनें पुनः मिळविलें एवढेंच नव्हे तर अधिक बळकट केलें.

निवडणुकींत कोणत्या पक्षाला किती जागा मिळाल्या यावरच त्याचें यशापयश मोजण्याची प्रथा आपल्याकडे सर्वसामान्यपणें आहे. पण नुसत्या जागांचे विचारावरून खरी कल्पना येत नाहीं. त्यासाठीं कोणत्या पक्षास किती मतें मिळालीं हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. जागा व मतें दोन्हीं दृष्टींनीं दिसणारें महाराष्ट्रांतील निवडणुकीचें चित्र अधिक वस्तुस्थिति निदर्शक आहे. कारण केवळ जागांचे दृष्टीनें काँग्रेसचा विजय जेवढा प्रचंड वाटतो तेवढा मतांचे दृष्टीनें वाटत नाहीं.

## • जागा व मतें यांतील तफावत

महाराष्ट्रांत काँग्रेसला ८० टक्के जागा मिळाल्या, पण मतें मात्र फक्त ४८.६३ टक्के मिळालीं. बहुसंख्य जागा काँग्रेसनें मिळविल्या. पण खऱ्या अर्थानें बहुमत ती मिळवूं शकली नाहीं. राज्यांतील बहुमत अजूनहि काँग्रेसविरुद्धच आहे. राज्यपुनर्रचना होऊन मतदार संघांत बराच बदल झाल्यामुळें तिन्ही निवडणुकांची तुलना करणे शक्य नाहीं. १९५२ च्या निवडणुकीचे वेळीं, मुंबई राज्यांत पश्चिम महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटकचे चार जिल्हे होते. विदर्भ मध्यप्रदेशांत आणि मराठवाडा हैदराबादेंत होता. त्यावेळीं सर्व मराठी भाषिक विभागांत काँग्रेसला

४६·९५ टक्के मतें मिळालीं होतीं. १९५७ च्या निवडणुकींत विशाल द्विभाषिकाच्या मराठी भाषिक विभागांत काँग्रेसनें ४७·२ टक्के मतें मिळविलीं. हाच प्रदेश एकत्र येऊन महाराष्ट्र राज्य अस्तित्वांत आल्यावर १९६२ च्या निवडणुकींत काँग्रेसला ४८·६३ टक्के मतें मिळालीं. काँग्रेसच्या मतांमध्यें वाढ झाली आहे; पण ती फार थोड्या प्रमाणांत झाली आहे, असें या तिन्ही निवडणुकांतील आंकड्यांवरून दिसून येईल. एकाहि निवडणुकींत ५० टक्क्यांपेक्षां अधिक मतें काँग्रेस मिळवूं शकलेली नाहीं.

## • काँग्रेसचें मुंबईतील मतदान

संबंध महाराष्ट्र राज्याचा एकच विचार केल्यानंतर आतां विभागवार काँग्रेसच्या मतदानाचें स्वरूप काय होतें तें पाहूं. मुंबई शहरांत १९५२ च्या निवडणुकींत काँग्रेसला ३९·७ टक्के मतें मिळालीं होतीं. मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या चार भागांचा विचार करतां काँग्रेसला मतांचें सर्वांत कमी प्रमाण मुंबईतच होतें. १९५७ च्या निवडणुकींत हें प्रमाण ३९·७ टक्क्यां-वरून ४६·५ टक्क्यांपर्यंत वाढलें आणि १९६२ मध्यें ४७·९ टक्क्यांपर्यंत गेलें. पहिल्या दोन निवडणुकांचे दरम्यान मुंबईत काँग्रेसला झालेल्या मतदानांत ७ टक्के वाढ झाली, पण त्या मानानें १९५७ ते १९६२ या पांच वर्षांत फारच थोडी १·४ टक्के वाढ झाली. १९५७ च्या निवडणुकीचे वेळीं संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा जोर असतांना काँग्रेसला मतदान कमी व्हावयास हवें होतें, पण उलट, १९५२ पेक्षां तें ७ टक्क्यांनीं वाढलें. मुंबई शहरांतील १९५७ व १९६२ च्या निवडणुकांचे आंकडे पाहिले तर जागा आणि शेंकडा मतें यांतील तफावत प्रकर्षानें दिसून येते. काँग्रेसला १९५७ मध्यें २४ पैकीं १३ जागा व ४६·५ टक्के मतें मिळालीं. १९६२ मध्यें काँग्रेसला २४ पैकीं २१ जागा आणि ४७·९ टक्के मतें मिळालीं म्हणजे या दोन निवडणुकांत काँग्रेसच्या मतदानांत दीड टक्काहि वाढ झाली नाहीं. पण आठ जागा मात्र तिनें जास्त मिळविल्या.

## • पश्चिम महाराष्ट्रांतील मतदान

मुंबई व्यतिरिक्त बाकीच्या पश्चिम महाराष्ट्रांत काँग्रेसला १९५२ मध्यें ५५·९ टक्के म्हणजे मराठी भाषिक विभागांत सर्वांत जास्त मतें पडलीं होतीं. हें प्रमाण १९५७ मध्यें ३८·९ टक्क्यापर्यंत खालीं आलें, पण १९६२ मध्यें तें पुनः ५३·९ टक्क्यापर्यंत वाढलें. गेल्या पांच वर्षांत काँग्रेसच्या मतदानांत १५ टक्के वाढ झाली तरीहि या भागांत १९५२ एवढ्या प्रमाणांत मतें काँग्रेस मिळवूं शकली नाहीं, हें लक्षांत घेतलें पाहिजे. जागांच्या दृष्टीनें काँग्रेसचा विजय विशेषच डोळ्यांत भरतो. या भागांत १९५७ मध्यें काँग्रेसला १३४ पैकीं फक्त ३३ जागा मिळाल्या

होत्या. यावेळीं ही संख्या ११५ पर्यंत वाढली म्हणजे १९५७ मध्यें या भागांत समितीनें काँग्रेसचा जेवढा प्रचंड धुव्वा उडविला होता, त्यापेक्षांहि मोठा धुव्वा १९६२ मध्यें काँग्रेसनें समितीचा उडविला. काँग्रेसनें १९५७ मध्यें ३३ जागा मिळविल्या होत्या; त्यापेक्षांहि कमी म्हणजे फक्त १२ जागा समितीस या भागांत यावेळीं मिळाल्या. पश्चिम महाराष्ट्रांत काँग्रेसचा एकहि मंत्री पराभूत झाला नाहीं. उलट, मोठ्या बहुमतानें ते निवडून आले. मुख्य मंत्री चव्हाणांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षां पंचवीस हजार मतें अधिक मिळविलीं. १९५७ च्या निवडणुकींत दोघांच्या मतांतील तफावत १६०० मतांची व १९५२ मध्यें त्यांपेक्षांहि कमी होती.

## • मराठवाड्यांत काँग्रेसचा विजय पण मंत्री पडले

मराठवाडा भागांत तिन्ही निवडणुकांत काँग्रेसला अनुक्रमें ४३.५ टक्के, ५१.९ टक्के व ५३.६ टक्के याप्रमाणें मतदान झालें म्हणजे काँग्रेसचें मतदान तीन निवडणुकांत दहा टक्यांनीं वाढलें. पण ही वाढ पहिल्या दोन निवडणुकांचे दरम्यान जेवढया प्रमाणांत झाली, तेवढया प्रमाणांत १९५७ ते १९६२ या पांच वर्षांत झालेली नाहीं. मराठवाडयांत काँग्रेस कारभाराविरुद्ध फार असंतोष आहे अशी टीका केली जात होती, पण या असंतोषाचें प्रतिबिंब मतदानांत तरी पडलेलें दिसत नाहीं असें असलें तरी एका निराळ्या स्वरूपांत म्हणजे मंत्र्यांच्या पराभवाचे रूपानें हा असंतोष व्यक्त झाला. जंगलमंत्री श्री. भगवंतराव गाढे आणि उपमंत्री श्री. देवीसिंग चौहान पराभूत झाले. पण त्याचबरोबर मराठवाडयावरील अन्याय चव्हाटयावर मांडणें हा एकच विषय घेऊन काँग्रेसविरुद्ध निवडणुकीस उभे राहिलेले काँग्रेसचेच एका काळचे कार्यकर्ते श्री. गोविंददास श्रॉफ आणि श्री: बाबासाहेब परांजपे निवडून येऊ शकले नाहींत, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. मराठवाडयांत काँग्रेस राजवटीविरुद्ध असंतोष आहे. पण तो पाहिजे तेवढ्या संघटित स्वरूपांत व्यक्त होऊं शकला नाहीं, असाच मराठवाडयांतील मतदानाचा अर्थ लावावा लागेल.

## • विदर्भांत काँग्रेसच्या मतांत घट

विदर्भांत यावेळीं काँगेसला तिन्ही निवडणुकांत सर्वांत कमी मतदान झालें. १९५२ मध्यें काँग्रेसला ४८.७ टक्के मतें मिळालीं होतीं. हें प्रमाण १९५७ मध्यें ५२.३ टक्यांपर्यंत वाढलें आणि १९६२ मध्यें ४१.८ टक्केपर्यंत खालीं आलें. म्हणजे गेल्या पांच वर्षांत विदर्भांत काँग्रेसला मिळालेल्या मतांचें प्रमाण साडेदहा टक्यांनीं घटलें. १९५२ पेक्षांहि तें सात टक्के घटलें. तिन्ही निवडणुकांत फक्त १९५७ मध्यें काँग्रेसला ५० टक्यांपेक्षां जास्त मतें मिळालीं होतीं. गेल्या पांच वर्षांत

काँग्रेसला मिळालेल्या मतदानाचें प्रमाण घटलें त्याप्रमाणें जागाहि कमी मिळाल्या. १९५७ मध्यें विदर्भांत काँग्रेसला त्या भागांतील एकूण ६३ पैकीं ५५ जागा मिळाल्या होत्या १९६२ मध्यें ४५ मिळाल्या. श्री. एस् बी. काझी, मदनगोपाल अग्रवाल आणि श्री. एन् यू. देशमुख हे मंत्री व उपमंत्री पराभूत झाले. विदर्भांत काँग्रेसचें वजन घटत आहे असें तिन्ही निवडणुकांतील मतदानांवरून दिसून येतें.

महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागांत तीन निवडणुकांत काँग्रेसच्या पक्षबळांत कसा बदल होत गेला याचा तुलनात्मक आढावा आपण घेतला. त्यासंबंधीं साकल्यानें विचार केला तर असें दिसते कीं, मुंबईव्यतिरिक्त पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडयांत काँग्रेसला ५० टक्यांपेक्षां अधिक मतें मिळालीं. मराठवाडयामध्यें काँग्रेसचें मतदान तिन्ही निवडणुकांत वाढत गेलें. मुंबईव्यतिरिक्त पश्चिम महाराष्ट्रांत १९५७ पेक्षां तें वाढलें पण १९५२ एवढें वाढलें नाहीं. मुंबई शहरांत तिन्ही निवडणुकांत तें वाढलें तरी ५० टक्यांवर कधीं गेलें नाहीं. विदर्भांत काँग्रेसचें मतदान घटलें एवढेंच नव्हे तर टक्केवारींत तें १९५२ पेक्षांहि खालीं गेलें.

## • मतें विभागल्यानें पराभव

काँग्रेसच्या मतदानाचें एवढें सविस्तार विवेचन केल्यानंतर आतां विरोधी पक्षांच्या मतदानाचा विचार करावयाचा. संयुक्त महाराष्ट्र समिति हाच प्रमुख विरोधी पक्ष. १९५२ च्या निवडणुकीचे वेळीं समिति अस्तित्वांतच नव्हती आणि १९६२ मध्यें अस्तित्वांत असली तरी प्रजासमाजवादी पक्ष, जनसंघ, रिपब्लिकन पक्ष कांबळे गट, आणि काँग्रेसजन परिषद हे पक्ष किंवा गट तिच्यांतून बाहेर पडले होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनें समितीचें मुख्य ध्येय साध्य झालें होतें व तिच्या अस्तित्वाची आतां आवश्यकता नाहीं असें वाटून कांहीं गट व पक्ष बाहेर पडले होते. १९५७ च्या निवडणुकींत बहुतेक ठिकाणीं काँग्रेस विरुद्ध समिति असा सरळ दुरंगी सामना झाला होता. काँग्रेसविरोधकांची मतें आपसांत विभागलीं न गेल्यामुळें त्यावेळीं समितीला मोठें यश मिळालें पण १९६२ च्या निवडणुकीचे वेळीं समिति दुभंगली होती. १९५७ प्रमाणें दुरंगी सामने न होतां अनेक मतदारसंघांत तिरंगी, चौरंगी सामने झाले. विरोधी पक्षांचीं मतें विभागलीं गेलीं. समितीच्या पराभवाचें हें एक कारण आहे खरें पण तेवढयानें समितीच्या पराभवाची पुरेशी मीमांसा होऊं शकत नाहीं. कारण अनेक मतदारसंघांत विरोधी उमेदवारांच्या एकत्रित मतांपेक्षां काँग्रेस उमेदवारानें जास्त मतें मिळविलीं आहेत. लोकसभेच्या ४४ पैकीं १० आणि विधानसभेच्या २६५ पैकीं फक्त २२ मतदारसंघांत विरोधी पक्षांचीं एकत्रित मतें काँग्रेसपेक्षां जास्त

आहेत. म्हणजे विरोधी पक्षांनीं संयुक्त आघाडी किंवा निवडणूक करार केला असतां तर एवढ्या जागा ते जास्त मिळवूं शकले असते व संयुक्त आघाडीचा परिणाम होऊन फार तर आणखी थोड्या जास्त जागा त्यांना मिळाल्या असत्या. कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी, समाजवादी, जनसंघ व स्वतंत्र या साऱ्याच विरोधी पक्षांची एकत्रित आघाडी असती तर एवढ्या जागा ते मिळवूं शकले असते, पण या पक्षांचा कार्यक्रम आणि दृष्टिकोनांतच एवढी तफावत आहे कीं, ते एकत्र येणें शक्य नव्हतें. त्यांची एकजूट होण्यास संयुक्त महाराष्ट्रासारखें जबरदस्त कारणहि यावेळीं नव्हतें. तेव्हां एकजुटीची आशा बाळगणें म्हणजे मृगजळाच्याच मागें लागणें होतें. विरोधी पक्षांचीं मतें एकत्रित करतांना कॉंग्रेसविरोधी अपक्ष उमेदवारांचीं मतें त्यांत जमेस धरलेलीं नाहींत. कारण विरोधी पक्षांची संयुक्त आघाडी झाली असती तरी हे उमेदवार स्वतंत्रपणें उभे राहिले असतेच. कॉंग्रेसला एकूण मतदान ५० टक्क्यांपेक्षां कमी झालें असलें तरी बहुसंख्य मतदारसंघांत विरोधी पक्षांच्या एकत्रित मतांपेक्षां अधिक मतें मिळालीं आहेत. लोकमताचा कल मोठ्या प्रमाणांत कॉंग्रेसकडे झुकला आहे याचेंच हें निदर्शक आहे. ही गोष्ट कितीहि कटु असली तरी विरोधी पक्षांनीं मोकळेपणानें मान्य केली पाहिजे. तेव्हां केवळ विरोधी पक्षांचीं मतें विभागलीं गेलीं म्हणून कॉंग्रेसचा विजय झाला. हें म्हणणें फारच थोड्या प्रमाणांत खरें आहे.

## • समितीच्या पराभवाचें स्वरूप

जागांच्या दृष्टीनें समितीचा प्रचंड पराभव झाला. १९५७ सालीं १२८ जागा मिळविणाऱ्या समितीस १९६२ च्या विवडणुकीत फक्त ३२ जागा मिळाल्या समितीचा बालेकिल्ला असलेल्या पश्चिम महाराष्ट्रांत तर हा पराभव विशेष डोळयांत भरतो. मुंबई व पश्चिम महाराष्ट्रातील एकुण १५९ जागांत १९५७ सालीं समिमीस ११३ जागा मिळाल्या होत्या या वेळीं हा आकडा १२ पर्यंत खालीं आला. मुंबई शहरांत १९५७ मध्यें २४ पैकीं ११ जागा मिळविणाऱ्या समितीस यावेळीं फक्त २ जागा मिळाल्या. जागांच्या दृष्टीनें पश्चिम महाराष्ट्रांत याप्रमाणें समितीची वाताहत झाली असली तरी विदर्भ आणि मराठवाड्यांत समितीला १९५७ पेक्षा थोडें अधिक यश मिळाल्याचें दिसतें. समितीच्या जागांची संख्या मराठवाडयांत ७ पासून ९ वर आणि विदर्भात ८ वरून ११ पर्यंत वाढली.

मतदानाच्या दृष्टीनें विचार केला तर समितीचा पराभव जेवढा मोठा भासविण्यांत येतो तेवढा मोठा प्रत्यक्षांत नाहीं असें दिसून येईल. समितीस १९५७ च्या निवडणुकींत ४६·९ टक्के मतें मिळालीं होतीं हे प्रमाण १९६२ मध्यें २१·३६ टक्यांपर्यंत खालीं आलें म्हणजे निम्यापेक्षांहि अधिक घटलें. पण जागांच्या घसरगुंडीच्या मानानें ही घसरगुंडी कमी आहे. आणि समितीतील आजच्या घटक-

पक्षांच्या दृष्टीनेंच विचार केला तर ही घसरगुंडी विशेष जाणवण्या सारखीहि नाहीं. कारण समितीतील आजच्या घटकपक्षांना १९५७ मध्यें २२.९२ टक्के मतें मिळालीं होतीं. त्यांत फक्त १.५६ टक्के घट १९६२ मध्यें झालेली आहे.

## • पश्चिम महाराष्ट्रांत जास्त पीछेहाट

समितीच्या मतदानाचा विभागवार विचार केला तर जागांप्रमाणेंच मतदानाचे दृष्टीनेंहि पश्चिम महाराष्ट्रांत समितीची सर्वांत जास्त पीछेहाट दिसते. १९५७ सालीं या भागांत ५३ टक्के मतें मिळविणाऱ्या समितीस या वेळीं फक्त १९.३ टक्के मतें मिळालीं. मुंबई शहरांतील समितीचें मतदान ५१.५ टक्क्यांवरून २३.१ टक्क्यांवर आलें. मराठवाड्यांत समितीची घसरगुंडी त्यामानानें कमी आहे. १९५७ सालीं समितीस या भागांत ४० टक्के मतें मिळालीं होतीं या वेळीं ३४.९ टक्के मिळालीं. विदर्भांत मात्र समितीचें वजन कमी न होतां थोडें वाढलेलेंच दिसतें. १९५७ सालीं समितीला तेथें १९ टक्के मतें मिळालीं होतीं तें प्रमाण १९६२ मध्यें २३.१५ टक्क्यांपर्यंत वाढलें. हीं वाढलेलीं मतें समितींत नव्यानें सामील झालेले स्वतंत्र आणि आदिवासी संघटना यांचीं आहेत. समितीमध्यें पूर्वीपासून असलेल्या कोणत्याहि घटक पक्षास जास्त मतें पडलीं नाहींत. उलट तीं कमी झालीं आहेत. विदर्भांतील समितीच्या २३.१५ टक्के मतांत ८.८० टक्के मतें स्वतंत्र आणि आदिवासी संघटना यांचीं आहेत.

## • शेतकरी कामगार पक्षाची परिस्थिति

समितींतील प्रमुख घटक पक्षांना मिळालेल्या जागा व मतें यांचा आतां विचार करूं या. समितींतील सर्वांत मोठा घटक म्हणजे शेतकरी कामगार पक्ष. समितीस मिळालेल्या एकूण ३२ जागांपैकीं सर्वांत जास्त १५ म्हणजे जवळजवळ निम्म्या जागा या पक्षानें मिळविल्या. १९५७ च्या निवडणुकींत त्यास २५ जागा मिळाल्या होत्या. म्हणजे यावेळीं दहा जागा कमी मिळाल्या. मतांच्या दृष्टीनें पाहिलें तर या पक्षास १९५७ मध्यें ७.६५ टक्के व १९५२ मध्यें ७.०९ टक्के मतें मिळालीं. म्हणजे जागा कमी मिळाल्या असल्या तरी जनतेंत या पक्षास असलेल्या पाठिंब्यांत फारसा फरक पडलेला नाहीं. हें झालें सबंध महाराष्ट्र राज्यांतील परिस्थितीसंबंधीं पण विभागवार विचार केला तर असें दिसतें कीं, शे. का. पक्षाचें वजन मराठवाड्यांत वाढलें, पश्चिम महाराष्ट्रांत कमी झालें आणि मुंबई शहर व विदर्भांत आहे तसेंच आहे. मराठवाड्यांत १९५७ मध्यें शे. का. पक्षास ३ जागा मिळाल्या होत्या. यावेळीं ७ मिळाल्या. पश्चिम महाराष्ट्रांतील जागांची संख्या २१ वरून ७ पर्यंत खालीं आली. मुंबई शहरांत दोन्ही निवडणुकांत पक्षास एकहि जागा मिळाली नाहीं. आणि विदर्भांत दोन्ही निवडणुकांत फक्त एकेक जागा मिळाली.

## ● कम्युनिस्ट पक्षाचें मतदान

समितींतील दुसरा मोठा घटक पक्ष कम्युनिस्ट. १९५७ च्या निवडणुकींत १९ कम्युनिस्ट निवडून आले होते. १९६२ मध्यें ही संख्या ६ पर्यंत खालीं आली म्हणजे दोन तृतीयांशापेक्षांहि अधिक घटली. पण मतदानाच्या प्रमाणांत मात्र विशेष फरक पडलेला नाहीं. १९५७ मध्यें कम्युनिस्टांना ६·३० टक्के मतें पडलीं होतीं यावेळीं ६ टक्के पडलीं म्हणजे मतदानाचे दृष्टीनें कम्युनिस्टांचें वजन घटलें आहे असें म्हणतां येणार नाहीं विभागवार विचार केला तर मराठवाडा सोडल्यास कम्युनिस्टांचें वजन जागांचे दृष्टीनें सगळीकडेच घटलें आहे. मराठवाड्यांत दोन्ही निवडणुकांत त्यांना दोन दोन जागा मिळाल्या. पश्चिम महाराष्ट्रांत १९५७ मध्यें १४ जागा व यावेळीं फक्त ३ मिळाल्या. मुंबई शहरांत १९५७ मध्यें २ व यावेळीं एकच जागा मिळाली विदर्भांत १९५७ मध्यें कम्युनिस्टांचे दोन उमेदवार निवडून आले होते. १९६२ मध्यें एकहि निवडून येऊं शकला नाहीं.

## ● रिपब्लिकन पक्षाची परिस्थिति

समितींतील तिसरा घटक पक्ष रिपब्लिकन म्हणजेच पूर्वींची शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन, १९५७ सालीं या पक्षास कम्युनिस्टांइतक्याच १९ जागा मिळाल्या होत्या. पण १९६२ मध्यें ही संख्या एकदम ३ पर्यंत खालीं आली. या घसरगुंडीचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे रिपब्लिकन पक्षांतच फूट पडून कांबळे गट व भंडारे गट असे दोन गट निर्माण झाले. कांबळे गट समितींतून फुटला व प्रजासमाजवाद्यांशीं सहकार्य करून त्यानें निवडणूक लढविली. या गटास एकहि जागा मिळाली नाहीं. भंडारे गट समितींत राहिला. रिपब्लिकन पक्षास मिळालेल्या तीन जागा या गटासच मिळालेल्या आहेत. मतदानाच्या दृष्टीनें पाहिलें तर तीन निवडणुकांत २·५२ टक्के, ८·५७ टक्के आणि ४·९६ टक्के अशीं मतें या पक्षास मिळालेलीं आहेत. समिती-बरोबर राहिल्यामुळें या पक्षाच्या मतदानांत १९५७ मध्यें फार मोठी म्हणजे ६ टक्के वाढ झालेली दिसते. १९६२ च्या निवडणुकींत या पक्षास ३·६१ टक्के मतें कमी मिळालीं असलीं तरी १९५२ पेक्षां हें मतदान जवळजवळ अडीच टक्क्यांनीं जास्त आहे. म्हणजे आपसांतील फुटीमुळें या पक्षास कमी मतें मिळालीं असलीं तरीहि १९५२ पेक्षां त्यांचें वजन वाढलेलेंच आहे. व समितीबरोबर राहिल्यामुळेंच वाढलें आहे. कारण याच पक्षांतील दुसरा कांबळे गट समितींतून बाहेर पडला. निवडणुकींत प्रजासमाजवादी पक्षाशीं त्यानें सहकार्य केलें. पण त्यास मतें फार कमी मिळालीं. ८ ( स्वतंत्र उमेदवारांना मिळालेल्या मतांतच हीं मतें समाविष्ट केलीं गेल्यानें या गटास मिळालेल्या शेंकडा मतांचा वेगळा आंकडा मिळूं शकला नाहीं. ) व जागा तर एकहि मिळूं शकली नाहीं.

रिपब्लिकन पक्षाच्या मतदानाचा विभागवार विचार केला तर आणखी

कांहीं गोष्टी निदर्शनास येतात. १९५७ च्या निवडणुकींत या पक्षास लोकसभेच्या ६ जागा मिळाल्या त्यांपैकीं ५ मुंबई व पश्चिम महाराष्ट्रांत आणि १ मराठवाड्यांत मिळाली. विदर्भांत एकहि जागा मिळाली नाहीं. १९६२ मध्यें लोकसभेची एकहि जागा हा पक्ष कोठेंच मिळवूं शकला नाहीं. विधानसभेच्या जागाचे दृष्टीनें पाहिलें तर १९५७ मध्यें रिपब्लिकन पक्षास मिळालेल्या एकूण १९ जागांमध्यें मुंबई शहरांत ३, पश्चिम महाराष्ट्रांत १२ मराठवाड्यांत १ व विदर्भांत ३ जागा मिळाल्या होत्या, १९६२ मध्यें मिळालेल्या तिन्ही जागा विदर्भांतच मिळालेल्या आहेत. म्हणजे जागांचे दृष्टीनें रिपब्लिकन पक्षानें विदर्भांत आपलें वजन कायम राखलें पण मुंबई, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यांत मात्र तें गमावलें. १९५२ च्या निवडणुकींत विदर्भांत या पक्षास फक्त एक जागा मिळाली होती. त्यादृष्टीनें १९५७ च्या निवडणुकींत त्या भागांत त्याचें वजन थोडें वाढलें व १९६२ च्या निवडणुकींत तें वाढलें नसलें तरी टिकून आहे.

## • हिंदुसभेचें मतदान

समितींतील इतर घटक पक्ष छोटे असल्यानें त्यांचा स्वतंत्रपणें विचार करण्याची आवश्यकता नाहीं. पण हिंदुसभेचा विचार करणें मात्र आवश्यक आहे. केरळमध्यें कॉंग्रेस व प्रजासमाजवाद्यांनीं मुस्लीम लीगला जवळ करून मुस्लीम जातीयवाद पोसण्यास मदत केली. अशी टीका डावे गट करतात. पण समितींत हिंदुसभेसारख्या जातीय पक्षांना स्थान देऊन समितींतील डावे गट हिंदु जातीयवाद टिकविण्यासच मदत करीत नाहींत काय ? अशीहि टीका केली जाते. निवडणूक निकालावरून या टीकेस कितपत आधार मिळतो ? १९५७ च्या निवडणुकींत लोकसभेसाठीं समितीतर्फे उभे असलेल्या १०१ उमेदवारांत हिंदुसभेचा फक्त एकच उमेदवार विदर्भांतून उभा होता व तो पडला. विधानसभेसाठीं समितीचा एकच उमेदवार पश्चिम महाराष्ट्रांत निवडून आला. विदर्भ व मराठवाड्यांत एकहि उमेदवार निवडून आला नाहीं. १९६२ च्या निवडणुकींत हिंदुसभेचे सात उमेदवार उभे होते. पण विधानसभेंत एकहि जागा मिळाली नाहीं. १९५२ च्या निवडणुकींत हिंदुसभेनें त्यावेळच्या मुंबई राज्यांत एकहि जागा मिळविली नव्हती. म्हणजे समितींत सामील झाल्यानें हिंदुसभेचें वजन वाढलें असें निवडणूक निकालांवरून तरी म्हणतां येणार नाहीं. असें असलें तरी हिंदुसभा राजकारणांतून नामशेष झाली असती. तिच्या रूपानें हिंदु जातीयवाद जगविण्यास समितीनें मदत केली हें कोणाहि निःपक्षपती निरीक्षकास मान्य करावें लागेल.

## • जनसंघाचें मतदान

हिंदु जातीयवादाच्याच संदर्भात जनसंघाचाहि येथें विचार केला पाहिजे. जनसंघाचा खरोखर भाषावार प्रांतरचनेला विरोध असून भारताची घटना संघ-

राज्यात्मक ( फेडरल ) नको तर एकमुखी ( युनिटरी ) हवी अशी त्याची भूमिका. पण स्वतःच्याच भूमिकेशीं तत्त्वद्रोह करून हा पक्ष १९५७ च्या निवडणुकीचे वेळीं समितींत सामील झाला. व समितीनेंहि त्यास सामील करून घेतले. लोकसभेच्या पश्चिम महाराष्ट्रांत तीन व विदर्भांत तीन अशा सहा जागा त्यानें लढविल्या. त्यांपैकीं पश्चिम महाराष्ट्रांतील दोन जागा जिंकल्या. मराठवाड्यांत त्यानें एकहि जागा लढविली नव्हती. विधानसभेच्या पांच जागा पश्चिम महाराष्ट्रांत त्यानें जिंकल्या मराठवाडा व विदर्भांत एकहि जागा जिंकली नाहीं. १९५२ च्या निवडणुकींत त्यावेळच्या मुंबई राज्यांत जनसंघास एकहि जागा मिळाली नव्हती. जागांच्या दृष्टीनें १९५२ पेक्षां १९५७ मध्यें जनसंघाचें वजन निश्चित वाढलें. जनसंघाच्या रूपानें हिंदु जातीयवाद वाढण्यास समितीची मदत झाली. १९६२ च्या निवडणुकीचे वेळीं जनसंघ समितींतून बाहेर पडला होता. एकहि जागा तो मिळवूं शकला नाहीं. पण मतांच्या दृष्टिनें पाहिलें तर १९५२ मध्यें १ टक्का, १९५७ मध्यें १.३२ टक्के आणि १९६२ मध्यें ४.७७ टक्के असें मतदान तिन्ही निवडणुकांत त्यास झालें असून मतदानाच्या दृष्टिनें त्याचें वजन वाढतच आहे असें दिसून येईल.

## ● प्रजासमाजवादी पक्षाची परवड

महाराष्ट्राच्या निवडणुकींतील आणखी दोन पक्षांचा विचार आतां राहिला ते म्हणजे प्रजासमाजवादी पक्ष व स्वतंत्र पक्ष. प्रजासमाजवादी पक्ष १९५७ साली समितींत होता व समितीच्या घटक पक्षांत सर्वांत जास्त ३२ जागा त्यानें १९५७ च्या निवडणुकींत मिळविल्या. प्रजासमाजवादी पक्ष ज्यांतून परिणत झाला त्या समाजवादी पक्षास १९५२ सालीं त्या वेळच्या मुंबई राज्यांत नऊ जागा मिळाल्या होत्या. प्रजासमाजवाद्यांचें वजन १९५७ च्या निवडणुकींत जें एवढें वाढलें तें समितींत राहिल्यामुळेंच यांत शंका नाहीं समितिबाहेर पडलेल्या लोहिया गटास एकहि जागा मिळाली नाहीं. प्रजासमाजवादी पक्ष त्याचवेळीं समितींतून बाहेर पडला असता तर त्याचीहि गत तीच झाली असती. १९६२ च्या निवडणुकीचे वेळीं प्रजासमाजवादी पक्ष समितींतून बाहेर पडलेला होता. या निवडणुकींत त्या पक्षाचा फार मोठा पराभव झाला. १९५७ मध्यें ३२ जागा जिंकणाऱ्या या पक्षास १९६२ मध्यें फक्त ९ जागा मिळाल्या. मतदानाचें दृष्टीनें पाहिलें तर तिन्ही निवडणुकांत पक्षाची घसरगुंडी वाढतच असल्याचें दिसतें १९५२ मध्यें १६·३७ टक्के, १९५७ मध्ये १०·३२ टक्के आणि १९६२ मध्यें ६·६२ टक्के याप्रमाणें मतें प्रजासमाजवाद्यांना मिळालेलीं आहेत. म्हणजे १९५७ सालीं समितींत असूनसुद्धां या पक्षाच्या मतदानाचें प्रमाणांत वाढ झाली नव्हती. समितीच्या एकजुटीचा फायदा त्यास फक्त जागा जास्त मिळविण्यासाठीं

कांहीं गोष्टी निदर्शनास येतात. १९५७ च्या निवडणुकींत या पक्षास लोकसभेच्या ६ जागा मिळाल्या त्यांपैकीं ५ मुंबई व पश्चिम महाराष्ट्रांत आणि १ मराठवाड्यांत मिळालीं. विदर्भांत एकहि जागा मिळाली नाहीं. १९६२ मध्यें लोकसभेची एकहि जागा हा पक्ष कोठेंच मिळवूं शकला नाहीं. विधानसभेच्या जागाचे दृष्टीनें पाहिलें तर १९५७ मध्यें रिपब्लिकन पक्षास मिळालेल्या एकूण १९ जागांमध्यें मुंबई शहरांत ३, पश्चिम महाराष्ट्रांत १२ मराठवाड्यांत १ व विदर्भांत ३ जागा मिळाल्या होत्या, १९६२ मध्यें मिळालेल्या तिन्ही जागा विदर्भांतच मिळालेल्या आहेत. म्हणजे जागांचे दृष्टीनें रिपब्लिकन पक्षानें विदर्भांत आपलें वजन कायम राखलें पण मुंबई, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यांत मात्र तें गमावलें. १९५२ च्या निवडणुकींत विदर्भांत या पक्षास फक्त एक जागा मिळाली होती. त्यादृष्टीनें १९५७ च्या निवडणुकींत त्या भागांत त्याचें वजन थोडें वाढलें व १९६२ च्या निवडणुकींत तें वाढलें नसलें तरी टिकून आहे.

## • हिंदुसभेचें मतदान

समितींतील इतर घटक पक्ष छोटे असल्यानें त्यांचा स्वतंत्रपणें विचार करण्याची आवश्यकता नाहीं. पण हिंदुसभेचा विचार करणें मात्र आवश्यक आहे. केरळमध्यें काँग्रेस व प्रजासमाजवाद्यांनीं मुस्लीम लीगला जवळ करून मुस्लीम जातीयवाद पोसण्यास मदत केली. अशी टीका डावे गट करतात. पण समितींत हिंदुसभेसारख्या जातीय पक्षांना स्थान देऊन समितींतील डावे गट हिंदु जातीयवाद टिकविण्यासच मदत करीत नाहींत काय? अशीहि टीका केली जाते. निवडणूक निकालावरून या टीकेस कितपत आधार मिळतो? १९५७ च्या निवडणुकींत लोकसभेसाठीं समितीतर्फे उभे असलेल्या १०१ उमेदवारांत हिंदुसभेचा फक्त एकच उमेदवार विदर्भांतून उभा होता व तो पडला. विधानसभेसाठीं समितीचा एकच उमेदवार पश्चिम महाराष्ट्रांत निवडून आला. विदर्भ व मराठवाड्यांत एकहि उमेदवार निवडून आला नाहीं. १९६२ च्या निवडणुकींत हिंदुसभेचे सात उमेदवार उभे होते. पण विधानसभेंत एकहि जागा मिळाली नाहीं. १९५२ च्या निवडणुकींत हिंदुसभेनें त्यावेळच्या मुंबई राज्यांत एकहि जागा मिळविली नव्हती. म्हणजे समितींत सामील झाल्यानें हिंदुसभेचें वजन वाढलें असें निवडणूक निकालांवरून तरी म्हणतां येणार नाहीं. असें असलें तरी हिंदुसभा राजकारणांतून नामशेष झाली असती. तिच्या रूपानें हिंदु जातीयवाद जगविण्यास समितीनें मदत केली हें कोणाहि निःपक्षपती निरीक्षकास मान्य करावें लागेल.

## • जनसंघाचें मतदान

हिंदु जातीयवादाच्याच संदर्भांत जनसंघाचाहि येथें विचार केला पाहिजे. जनसंघाचा खरोखर भाषावार प्रांतरचनेला विरोध असून भारताची घटना संघ-

राज्यात्मक ( फेडरल ) नको तर एकमुखी ( युनिटरी ) हवी अशी त्याची भूमिका. पण स्वतःच्याच भूमिकेशीं तत्त्वद्रोह करून हा पक्ष १९५७ च्या निवडणुकीचे वेळीं समितींत सामील झाला. व समितीनेंहि त्यास सामील करून घेतले. लोकसभेच्या पश्चिम महाराष्ट्रांत तीन व विदर्भांत तीन अशा सहा जागा त्यानें लढविल्या. त्यांपैकीं पश्चिम महाराष्ट्रांतील दोन जागा जिंकल्या. मराठवाड्यांत त्यानें एकहि जागा लढविली नव्हती. विधानसभेच्या पांच जागा पश्चिम महाराष्ट्रांत त्यानें जिंकल्या मराठवाडा व विदर्भांत एकहि जागा जिंकली नाहीं. १९५२ च्या निवडणुकींत त्यावेळच्या मुंबई राज्यांत जनसंघास एकहि जागा मिळाली नव्हती. जागांच्या दृष्टीनें १९५२ पेक्षां १९५७ मध्यें जनसंघाचें वजन निश्चित वाढलें. जनसंघाच्या रूपानें हिंदु जातीयवाद वाढण्यास समितीची मदत झाली. १९६२ च्या निवडणुकीचे वेळीं जनसंघ समितींतून बाहेर पडला होता. एकहि जागा तो मिळवूं शकला नाहीं. पण मतांच्या दृष्टिनें पाहिलें तर १९५२ मध्यें १ टक्का, १९५७ मध्यें १.३२ टक्के आणि १९६२ मध्यें ४.७७ टक्के असें मतदान तिन्ही निवडणुकांत त्यास झालें असून मतदानाच्या दृष्टिनें त्याचें वजन वाढतच आहे असें दिसून येईल.

## • प्रजासमाजवादी पक्षाची परवड

महाराष्ट्राच्या निवडणुकींतील आणखी दोन पक्षांचा विचार आतां राहिला ते म्हणजे प्रजासमाजवादी पक्ष व स्वतंत्र पक्ष. प्रजासमाजवादी पक्ष १९५७ सालीं समितींत होता व समितीच्या घटक पक्षांत सर्वांत जास्त ३२ जागा त्यानें १९५७ च्या निवडणुकींत मिळविल्या. प्रजासमाजवादी पक्ष ज्यांतून परिणत झाला त्या समाजवादी पक्षास १९५२ सालीं त्या वेळच्या मुंबई राज्यांत नऊ जागा मिळाल्या होत्या. प्रजासमाजवाद्यांचें वजन १९५७ च्या निवडणुकींत जें एवढें वाढलें तें समितींत राहिल्यामुळेंच यांत शंका नाहीं समितिबाहेर पडलेल्या लोहिया गटास एकहि जागा मिळाली नाहीं. प्रजासमाजवादी पक्ष त्याचवेळीं समितीतून बाहेर पडला असता तर त्याचीहि गत तीच झाली असती. १९६२ च्या निवडणुकीचे वेळीं प्रजासमाजवादी पक्ष समितींतून बाहेर पडलेला होता. या निवडणुकींत त्या पक्षाचा फार मोठा पराभव झाला. १९५७ मध्यें ३२ जागा जिंकणाऱ्या या पक्षास १९६२ मध्यें फक्त ९ जागा मिळाल्या. मतदानाचें दृष्टीनें पाहिलें तर तिन्ही निवडणुकांत पक्षाची घसरगुंडी वाढतच असल्याचें दिसतें १९५२ मध्यें १६·३७ टक्के, १९५७ मध्ये १०·३२ टक्के आणि १९६२ मध्यें ६·६२ टक्के याप्रमाणें मतें प्रजासमाजवाद्यांना मिळालेलीं आहेत. म्हणजे १९५७ सालीं समितींत असूनसुद्धां या पक्षाच्या मतदानाचें प्रमाणांत वाढ झाली नव्हती. समितीच्या एकजुटीचा फायदा त्यास फक्त जागा जास्त मिळविण्यासाठीं

झाला. आणि समितीबाहेर पडल्यानंतर १९६२ चे निवडणुकींत जागा व मतें दोन्हीं दृष्टींनी या पक्षाची घसरगुंडी वाढली आणि ही घसरगुंडी विशेषतः पश्चिम महाराष्ट्रांतच दिसते. १९५७ मध्यें मुंबई शहरांत प्रजासमाजवाद्यांना तीन जागा मिळाल्या होत्या. १९६२ मध्यें फक्त एक मिळाली. पश्चिम महाराष्ट्रांतील जागांची संख्या २६ वरून ६पर्यंत घटली. फक्त रत्नागिरी जिल्ह्यांत दोन्ही निवडणुकांत पांच जागा मिळवून पक्षानें आपलें तेथील स्थान टिकविलें. पुणें जिल्ह्यांतील जागांची संख्या सहा वरून एक पर्यंत घटली आणि बाकीच्या जिल्ह्यांत एकहि जागा मिळाली नाहीं. मराठवाडयांत १९५७ मध्यें एक जागा मिळाली होती. यावेळीं तीहि गमावली. विदर्भांत मात्र १९५७ प्रमाणेंच दोन जागा मिळवून पक्षानें आपलें तेथील वजन वाढविलें नाही तरी टिकविलें.

## • स्वतंत्र पक्षाचा बोजवारा

स्वतंत्र पक्षानें १९६२ च्या निवडणुकींत प्रथमच भाग घेतला. महाराष्ट्रांत त्याला एकहि जागा मिळाली नाहीं. महाराष्ट्राच्या राजकारणांत हा पक्ष स्थान मिळवूं शकला नाहीं असाच याचा अर्थ आहे. इतर कांहीं राज्यांतून प्रमुख विरोधी पक्ष बनण्याएवढ्या जागा स्वतंत्र पक्ष व जनसंघ या उजव्या गटाच्या पक्षांनीं मिळविल्या. महाराष्ट्रांत समिति व प्रजासमाजवादी पक्ष यांचा फार मोठा पराभव झाला. पण त्याचा फायदा काँग्रेसपेक्षांहि अधिक प्रतिगामि अशा उजव्या व जातीयवादी पक्षांना मिळालेला नाहीं. त्यांचें वजन वाढलेलें नाहीं.

## • स्वतंत्र विदर्भाविरुद्ध कौल

निवडणुकीचा आणखी एका दृष्टीनें विचार करावयाचा राहिला. तो म्हणजे स्वतंत्र विदर्भाच्या मागणीस विदर्भांत कितपत पाठिंबा मिळाला? नागविदर्भ आंदोलन समितीनें २१ उमेदवार उभे केले होते. त्यापैकीं फक्त ४ निवडून आले व त्यांना १.९२ टक्के मतें मिळालीं. म्हणजे विदर्भांतील जनतेनें स्पष्टपणें स्वतंत्र विदर्भाच्या मागणीविरुद्ध कौल दिला.

असें हें महाराष्ट्रांतील निवडणुकांचें चित्र आहे. काँग्रेसनें आपलें गेलेलें वजन परत मिळवून विधान सभेंत ८० टक्के जागा मिळविल्या. समिति व सर्वच विरोधी पक्षांची वाताहत झाली. पण इतर कांहीं राज्यांत उजव्या व जातीयवादी पक्षांचा जोर वाढला तसा महाराष्ट्रांत वाढला नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यांना महाराष्ट्राचे राजकारणांत स्थान मिळवितां आलें नाहीं. एकही जागा ते जिंकूं शकले नाहींत. हाच येथील निवडणुकांचा निष्कर्ष आहे. विरोधी पक्षांच्या वाताहतीमुळें प्रबल विरोधी पक्षाचा अभाव नव्या विधान सभेंत तीव्रतेनें जाणवणार आहे.

• • •

# विधानसभा निवडणुकांचा कौल

## दोन राज्यांत हुकमी बहुमत गेलें

काँग्रेसला प्रभावी विरोधी पक्ष अखिल भारतीय प्रमाणांत स्थापन होताना आज दिसत नसला तरी काही राज्यांतून विरोधी पक्षाचे वजन वाढत असल्याचे राज्य विधानसभांच्या निवडणुकात स्पष्टपणे दिसून आले. राज्य विधानसभांच्या निवडणुकीचा विचार करताना प्रथमच लक्षात येणारी गोष्ट म्हणजे मध्यप्रदेश आणि राजस्थान या दोन राज्यात काँग्रेस हुकमी बहुमत मिळवू शकली नाही. काही स्वतंत्र सभासदांचा पाठिंबा मिळवून तेथे काँग्रेस मंत्रिमंडळे अधिकारावर आली हे खरे. पण केवळ स्वतःच्या पक्ष बळावर काँग्रेसला तेथे हुकमी बहुमत मिळविता आले नाही ही गोष्ट काँग्रेसचे वजन तेथे घटल्याचीच निदर्शक आहे.

### • अंतर्गत गटबाजीमुळे मध्यप्रदेशांत अपयश

या दोन राज्यातील काँग्रेसच्या पराभवाचा विचार करताना विरोधी पक्षांचे बळ खरोखरच वाढल्यामुळे काँग्रेसचा पराभव झाला की, काँग्रेसमधील अंतर्गत फाटाफूट व गटबाजीमुळे हा पराभव झाला याचाहि विचार केला पाहिजे. मध्य-प्रदेशात काँग्रेसला मिळालेल्या जागांची संख्या २३२ वरून १४२ पर्यंत खाली आली म्हणजे ९० ने घटली. मुख्य मंत्री श्री. कैलासनाथ काटजू आणि इतर चार मंत्री पडले. काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजीमुळेच मुख्यतः हुकमी बहुमत गमावण्याचा प्रसंग काँग्रेसवर आला. पंडित रविशंकर शुक्ल यांच्या निधनानंतर काँग्रेस संघटनेतील सर्व गटांना एकत्र ठेवू शकेल असा नेता राज्यात राहिला नाही. डॉ. काटजूंना मुख्य मंत्री करण्यात आले, पण प्रदेश काँग्रेसमधील एका गटास प्रथमपासूनच त्यांचे नेतृत्व मान्य नव्हते. काटजू व त्यांचा गट निवडून येऊ नये म्हणून या गटाने अंतर्गत विरोधी प्रचार केल्याच्या तक्रारी आहेत. या तक्रारींची चौकशी करून डॉ. बी. रामकृष्णराव यांनी एक अहवाल सादर केला. त्याचा विचार काँग्रेसच्या शिस्तभंग शासन समितीने केल्यानंतर मध्यप्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. देशलहारा यांना राजिनामा देण्यास सांगण्यात आले व त्यांनी राजिनामा दिला. त्यांच्या गटाविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपात बरेच तथ्य होते असे यावरून म्हणण्यास हरकत नाही. डॉ. काटजूंविरुद्ध जनसंघाचा उमेदवार जेओरा मतदारसंघातून

निवडून आला. काँग्रेस आणि जनसंघ अशा दोनच पक्षात सामना असता तर काटजू निवडून येण्याची बरीच शक्यता होती, पण शमसुद्दिनखान हे तिसरे मुस्लीम उमेदवार या मतदारसंघात उभे राहिले. ते उभे राहण्यास तयार नव्हते पण मुस्लीम मते विभागली जाऊन जनसंघाचा उमेदवार निवडून यावा यासाठी शमसुद्दिन यांना काटजूविरोधी गटाने उभे केले अशा तक्रारी आहेत. निवडणुकीपूर्वी ३१ जानेवारीस जनसंघ कार्यकर्त्यांच्या एका बैठकीस काही काँग्रेस कार्यकर्ते व प्रदेश काँग्रेसमधील काटजू विरोधी गटाने पाठविलेले दोन प्रतिनिधि उपस्थित होते. याच प्रतिनिधींनी इतर ठिकाणी जनसंघाच्या सभेत भाषणे करून काटजू गटाच्या इतर मंत्र्यांचेविरुद्धहि प्रचार केला. प्रदेश काँग्रेसच्याच एका प्रमुख कार्यकर्त्यांचे गाडीतून त्यांनी हा प्रवास केला असे सांगण्यात येते. काटजू गटाचे काही मंत्री उभे असलेल्या मतदारसंघात काटजूविरोधी गटाने प्रजासाजवादी उमेदवारांच्या बाजूनेहि प्रचार केला अशा तक्रारी या गटाविरुद्ध करण्यात आलेल्या आहेत. काँग्रेसमधील ही अंतर्गत फाटाफूट व गटबाजींमुळे टिकमगड, नरसिंगपूर, होशंगाबाद व बस्तर या चार जिल्ह्यात काँग्रेसला एकहि जागा मिळाली नाही.

मध्यप्रदेशात काँग्रेसचे हुकमी बहुमत गेले तरी सत्ता हाती घेण्याएवढ्या जागा कोणत्याच विरोधी पक्षास मिळाल्या नाहींत. पण जातीय गटांचा जोर स्पष्टपणे वाढल्याचे दिसून आले. गेल्या वेळीं प्रजासमाजवादी पक्ष हा प्रमुख विरोधी पक्ष होता पण यावेळी जनसंघाने ते स्थान मिळविले. त्यास ४१ जागा मिळाल्या. हिंदुसभेला १० आणि रामराज्यपरिषदेस ५ जागा मिळाल्या. म्हणजे या तिन्ही जातीयवादी गटांनी मिळून ५६ जागा मिळविल्या. प्रजासमाजवादी पक्षास ३३ जागा मिळाल्या. कम्युनिस्ट उमेदवार फक्त एकच निवडून आला.

## • राजस्थानमधील चित्र

काँग्रेसने हुकमी बहुमत गमावलेले दुसरे राज्य म्हणजे राजस्थान. पण तेथेहि सत्ता हाती घेण्याएवढा कोणताच विरोधी पक्ष जोरदार नसल्याने काही स्वतंत्रांच्या मदतीने काँग्रेसने सत्ता हाती राखली. या राज्यातील काँग्रेस संघटना अंतर्गत गटबाजीने फार पूर्वीपासून पोखरलेली आहे. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकींत राजस्थानात काँग्रेसला १६० पैकीं ८२ जागा म्हणजे जेमतेम बहुमतच मिळाले होते. काँग्रेस मंत्रिमंडळात फेरफार, वाढ किंवा बदल या राज्यात जितक्या वेळा झाला तितका दुसऱ्या कोणत्याहि राज्यांत झाला नसेल. काँग्रेसला १९६२ च्या निवडणुकींत एकूण १७६ जागांपैकीं ८८ म्हणजे १९५७ पेक्षा ३१ जागा कमी मिळाल्या. प्रमुख विरोधी पक्ष १९५७ मध्ये रामराज्य परिषद होती. यावेळीं ते स्थान स्वतंत्र पक्षाने मिळविले. त्यास ३६ जागा मिळाल्या. जनसंघाचे

१५ उमेदवार निवडून आले. १९५७ च्या निवडणुकीत त्यास ६ जागा मिळाल्या होत्या. रामराज्य परिषद व जनसंघ मिळून उजव्या गटास १९५७ मध्ये ३० जागा होत्या. स्वतंत्र व जनसंघ मिळून या गटास १९६२ मध्यें ५१ म्हणजे २१ जागा जास्त मिळाल्या. कम्यूनिस्ट व प्रजासमाजवादी यांना १९५७ मध्ये प्रत्येकी एकेकच जागा मिळाली होती. १९६२ मध्ये कम्युनिस्ट ५, प्रजासमाजवादी २ व समाजवादी पक्ष ५ मिळून अवघ्या १२ सभासदांचे डाव्या गटाचे बळ आहे. विरोधी पक्षांमध्ये उजव्या गटाचाच जोर या राज्यांत जास्त आहे हे यावरून स्पष्ट दिसते.

## • काँग्रेसला कमी जागा मिळालेली राज्ये

हुकमी बहुमत गमावण्याएवढा काँग्रेसचा मोठा पराभव जेथे झाला नाही पण काँग्रेसला जागा १९५७ पेक्षां कमी मिळाल्या अशी इतर राज्ये म्हणजे उत्तरप्रदेश, बिहार, मद्रास व म्हैसूर. उत्तरप्रदेशांत २८६ वरून २४८, बिहारमध्यें २१० वरून १८५, मद्रासमध्यें १५१ वरून १३९, म्हैसूरमध्यें १५२ वरून १३९ आणि पंजाबमध्यें ११८ वरून ९० याप्रमाणें काँग्रेसचे पक्षबळ घटले. या चारहि राज्यात म्हैसूर सोडल्यास इतरत्र काँग्रेसप्रमाणेच प्रजासमाजवाद्यांचेहि पक्षबळ घटले. उत्तरप्रदेशात ४४ वरून ३८, बिहारमध्ये ३१ वरून २९ मद्रासमध्ये २ वरून ० याप्रमाणे प्रजासमाजवाद्यांच्या जागा घटल्या. पंजाबमध्यें एकहि जागा प्रजासमाजवाद्यांना मिळाली नाही. म्हैसूरमध्ये मात्र प्रजासमाजवादी आमदारांची संख्या १८ ची २० झाली. व तोच प्रमुख विरोधी पक्ष झाला. उत्तरप्रदेश व बिहारमध्ये मात्र प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान प्रजासमाजवाद्यांनी गमावलें. उत्तरप्रदेशात ते जनसंघाने तर बिहारमध्ये स्वतंत्र पक्षाने मिळविले. जनसंघाच्या जागा उत्तरप्रदेशांत १७ वरून ४८ पर्यंत वाढल्या. बिहारमध्ये स्वतंत्र पक्षाने ५० जागा मिळविल्या. मद्रासमध्ये द्रवीड मुन्नेत्र कळघमने ५० जागा मिळवून प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान मिळविलें. पंजाबमध्ये अकाली दलाने १९ जागा मिळविल्या व तो प्रमुख विरोधी पक्ष झाला.

## • द्रवीड मुन्नेत्र कळघमचें यश

हिंदमधून फुटून स्वतंत्र द्रविडीस्तानची मागणी करणाऱ्या द्रवीड मुन्नेत्र कळघम पक्षास मद्रासमध्ये ५० जागा कशा मिळाल्या याचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे. द्रवीड मुन्नेच कळघम एवढ्या मोठ्या संख्येने निवडून येईल याची काँग्रेस नेत्यांनाहि कल्पना नव्हती. या पक्षाचे बळ वाढत असल्याची काँग्रेसला जाणीव होती व गेल्यावेळी गमावलेल्या सर्व जागा मिळविण्याकडे काँग्रेसने आपले सामर्थ्य एकवटले. त्यात काँग्रेसला बरेच यशहि आले, पण हेच निवडणूक तंत्र इतर मतदारसंघात काँग्रेसला मारक ठरले. या मतदारसंघाकडे दुर्लक्ष झाल्याने तेथे

काँग्रेसला बऱ्याच जागा गमवाव्या लागल्या. द्रवीड मुन्नेच कळघमला ५० जाग मिळाल्या खऱ्या पण १९५७ मध्ये त्यांचे जे पंधरा उमेदवार विजयी झाले होते त्यापैकी १४ जणांचा यावेळी पराभव झाला. मद्रासच्या नऊ जिल्ह्यात द्र. मु. क (द्रवीड मुन्नेत्र कळघम) ने १४२ उमेदवार उभे केले होते. त्यांना ३५ लाख म्हणजे २७·१३ टक्के मते मिळाली. १९५७ च्या निवडणुकीत मद्रास शहर उत्तर अर्काट, दक्षिण अर्काट व सालेम या उत्तरेकडील जिल्ह्यांमध्येच द्र. मु. क.ल विजय मिळाला होता. पण नंतरच्या पाच वर्षांत बाकीच्या जिल्ह्यातहि या पक्षाचे वजन वाढल्याचे १९६२ च्या निवडणूक निकालांवरून दिसते. उत्तर अर्काटमध्ये ११, सालेममध्ये ९, तिरुचीमध्ये ८, दक्षिण अर्काटमध्ये ६, मदुरामध्ये २, मद्रास शहरात ४ आणि तिरुनवेली व कल्याणकुमारी सोडून बाकी सर्व जिल्ह्यात या पक्षा एकेक जागा मिळाली. द्र. मु. क. ने काँग्रेसच्या ४७ जागा मिळविल्या आणि ज्य मतदारसंघांत या पक्षाचा पराभव झाला तेथेहि त्यास मतदान चांगले झालेले आहे पंधरा मतदारसंघात त्यांच्या उमेदवारांचा एक हजार किंवा त्यापेक्षा कमी मतां अंतरानेच पराभव झाला आणि बाकीच्या मतदारसंघात चार जागा सोडल्यास बाक सर्व ठिकाणी दुसऱ्या क्रमांकाची मते या पक्षाच्या उमेदवारांना मिळाली.

द्र. मु. क. ला एवढा मोठा विजय कसा मिळाला याबाबत आपले म व्यक्त करताना मद्रासचे मुख्यमंत्री श्री. कामराज यांनी सांगितले की, "स्वतंत्र प व मुस्लीम लीग यांचा पाठिंबा नसता तर द्र. मु. क. ला एवढी मते मिळाल नसती. काही मतदारसंघात मुस्लीम मतांचा फायदा त्यांना मिळाला तर त्यांच्य निवडणूक प्रचार मोहिमेत स्वतंत्र पक्षाच्या निधीची मदत झाली."

मद्रासच्या मुख्यमंत्र्यांनी द्र. मु. क. च्या विजयाची केलेली ही मीमांस पुरेशी नाही. हिंदमधून फुटून द्रवीडीस्तान स्थापन करण्याची द्र. मु. क. च मागणी देशाच्या ऐक्यास विघातक आहे. तिला विरोध केला पाहिजे. पण नुसती मागणी अमान्य केल्याने द्र. मु. क. चे वजन कमी होणार नाही किंवा त्यांच चळवळहि मोडणार नाही. उत्तरेकडील वर्चस्वाबद्दल विशेषतः हिंदी वर्चस्वाबद्द त्यांना वाटणाऱ्या भीतीमागील भावना समजावून घेतली पाहिजे. हजारो वर्षांपास द्रवीड लोक कमी लेखले गेलेले आहेत. भारताच्या विकासांत द्रवीडसंस्कृतीचा मोठा वाटा आहे हे मान्य करून त्या संस्कृतीबद्दल आदर बाळगला पाहिजे. आर संस्कृतीच्या बरोबरीने या संस्कृतीच्या संशोधनास उत्तेजन दिले पाहिजे. आपणा कमी लेखले जाते असे या लोकांना वाटतां कामा नये. घटनेने सर्व नागरिकांना समा हक्क दिले असले तरी दैनंदिन जीवनात त्याची प्रचीति त्यांना आली पाहिजे. आम कार्यकर्ते व राजकीय विचारवंत या दृष्टीनें द्रविडीस्तानच्या चळवळीकडे पाह नाहींत तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही व द्र. मु. क. चे वजनहि कमी होणार नाही.

## • पंजाबी भाषिक राज्याविरुद्ध कौल

अकाली दलाच्या पंजाबी भाषिक राज्याच्या मागणीस बहुसंख्य जनतेचा पाठिंबा नाही असाच कौल पंजाबमधील विधानसभा निवडणुकीने दिला. अकालींना पंजाबी विभागात १७·३ टक्के व हिंदी विभागात १३ टक्के मते मिळाली. विधानसभेच्या एकूण १५४ जागापैकी फक्त १९ जागा ते मिळवू शकले. १९५७ मधील निवडणुकीशी १९६२ च्या निवडणुकीची तुलना करतां येण्यासारखी नाही. कारण त्यावेळी कॉंग्रेस व अकाली दल यांची युति होऊन अकालींनी कॉंग्रेसच्या तिकिटावर निवडणुका लढविल्या होत्या. कॉंग्रेसला १९५७ मध्ये ४७·६ टक्के व १९६२ मध्ये ४७ टक्के मते मिळाली. पण १९५७ च्या कॉंग्रेसच्या मतात अकालींची मतेहि समाविष्ट होती हे लक्षांत घेता पाच वर्षांत कॉंग्रेसचे मतदान निश्चित् वाढले आहे. १९५७ च्या निवडणुकीत २३ अकालींना कॉंग्रेसचे तिकीट मिळालेले होते व त्यापैकी २२ निवडून आले होते. १९६२ मध्ये स्वतंत्रपणे निवडणुका लढवून अकाली फक्त १९ जागा मिळवू शकले. १९५२ च्या निवडणुकीत अकालींना २३ जागा व १५ टक्के मते मिळाली होती, १९६२ मध्ये १९ जागा व १२·६ टक्के मते मिळाली आहेत म्हणजे दहा वर्षांत जागा व मते दोन्ही दृष्टींनी अकालींना असलेला पाठिंबा कमी झालेला आहे असे दिसून येते.

अकालींशिवाय पंजाबातील दुसरा जातीय पक्ष जनसंघाचे वजन जवळजवळ आहे तसेच कायम आहे. १९५७ च्या निवडणुकीत जनसंघास ९ जागा मिळाल्या होत्या, १९६२ मध्ये ८ मिळाल्या. १९५२ च्या निवडणुकीत पंजाबात जनसंघास एकहि जागा मिळाली नव्हती. पेप्सूत मात्र दोन जागा त्याने जिंकल्या होत्या.

उजव्या गटाच्या पक्षांपैकी स्वतंत्र पक्षास फक्त तीन जागा मिळाल्या. पंजाबच्या राजकारणात हा पक्ष काही स्थान मिळवू शकला नाही हे यावरून स्पष्ट होते. अकाली, जनसंघ व स्वतंत्र मिळून उजव्या गटास एकूण ३० जागा मिळाल्या. पण यापैकी जनसंघ बाकीच्या दोन पक्षांशी फारसे सहकार्य करण्याचा संभव नाही. कारण पंजाबी भाषिक राज्याच्या मागणीस जनसंघाचा विरोध आहे. स्वतंत्र पक्षाचा मात्र या मागणीस पाठिंबा असून निवडणुकींत त्यांनी अकाली पक्षाशी सहकार्य केले होते.

डाव्या गटांपैकी प्रजासमाजवादी पक्षास एकहि जागा मिळाली नाही. १९५७ मध्ये त्यास दोन जागा मिळाल्या होत्या. त्यापूर्वीच्या म्हणजे १९५२ च्या निवडणुकींत या पक्षाचा एकहि उमेदवार निवडून आला नव्हता. यावरून म्हणजे जागांचे दृष्टीने प्रजासमाजवादी पक्ष पंजाबांत काहीहि स्थान दहा वर्षांत मिळवू शकलेला नाही. समाजवादी पक्षानें मात्र १९६२ च्या निवडणुकीत ४ जागा मिळविल्या, कम्युनिस्टांनी ९ जागा जिंकल्या. अकालीशीं त्यांनी निवडणूक करार

केलेला होता. डाव्या गटांना एकूण १३ जागा मिळाल्या असून त्यांच्यापेक्षां उजव्या गटाचा आणि त्यातहि अकाली दलासारख्या भाषिक पक्षाचा जोर विरोधी पक्षांमध्ये जास्त आहे.

## ● काँग्रेसला अधिक जागा मिळालेली राज्ये

काँग्रेसला पूर्वीपेक्षा कमी जागा जेथें मिळाल्या त्या राज्यांमधील विधान-सभा निवडणुकीचा विचार आतापर्यंत केला. आता काँग्रेसला १९५७ पेक्षा अधिक जागा जेथें मिळाल्या त्या राज्यांतील निवडणुकीचा विचार करावयाचा. गुजरात, आसाम, पश्चिम बंगाल, या राज्यांत काँग्रेसचे पक्षबळ पूर्वीपेक्षा वाढले. गुजरातेत ९८ वरून ११३, आसाममध्ये ७१ वरून ७९, पश्चिम बंगालमध्यें १५२ वरून १५७ याप्रमाणे ही वाढ झाली. प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान गुजरातेत स्वतंत्र पक्षाने मिळविले. त्यास २६ जागा मिळाल्या. १९५७ च्या निवडणुकीत महागुजरात जनता परिषद हा विरोधी पक्ष होता. व त्यास ३० जागा मिळाल्या होत्या. आसाममध्यें टेकड्यांच्या राज्याची मागणी करणाऱ्या हिल लीडर्स कॉन्फरन्सने प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान मिळविले. पश्चिम बंगालमध्यें कम्युनिस्ट पक्षाने प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान टिकविले. त्यांना ५० म्हणजे १९५७ पेक्षा ४ जागा जास्त मिळाल्या. विरोधी पक्षामध्ये डाव्या गटापेक्षा उजव्या गटाचा जोर गुजरातेत जास्त दिसून आला. तेथे उजव्या गटाच्या स्वतंत्र पक्षास २६ जागा मिळाल्या तर डाव्या गटामध्ये फक्त प्रजासमाजवादी पक्षास ७ जागा मिळाल्या. कम्युनिस्ट उमेदवार एकहि निवडून आला नाहीं. जनसंघाला एकहि जागा मिळाली नाही. यावरून जातीयवादी पक्षांना गुजरातेत जनतेचे पाठबळ मिळू शकलेले नाहीं हे स्पष्ट होते. आसाममधील प्रमुख विरोधी पक्ष हिल लीडर्स कॉन्फरन्स हा मुख्यतः भाषिक गट आहे. उजव्या किंवा डाव्या कोणत्याच गटांत त्याला घालता येणार नाहीं. या राज्यांत डाव्या गटाचे वजन आधींच कमी होते. ते १९६२ मध्ये आणखी कमी झाले. प्रजासमाजवादी आमदारांची संख्या ८ वरून ६ वर आली. कम्युनिष्ठाना पूर्वी ४ जागा होत्या यावेळीं एकहि मिळाली नाही. चिनी आक्रमणाबाबत कम्यु-निस्टांनी स्वीकारलेल्या भूमिकेचाच हा परिणाम आहे, हे उघड आहे. गुजरात-प्रमाणेंच आसाममध्येहि जातीय पक्षांना स्थान नाही जनसंघाला तेथे एकहि जागा मिळाली नाही. पश्चिम बंगालमध्ये कम्युनिस्टांची संख्या ४६ वरून ५० वर गेली. प्रजासमाजवाद्यांची २१ वरून ५ पर्यंत खालीं आली. पण डाव्या गटांच्या आमदारांची एकूण संख्या १९५७ मध्ये ८२ होती ती १९६२ मध्ये ८७ पर्यंत वाढली. प्रजासमाजवाद्यांची जागेच्या दृष्टीनें घसरगुंडी झाली तशीच मतांच्या दृष्टीनेहि झाली. १९५२ मध्ये ८·३० टक्के, १९५७ मध्ये ९·८५ टक्के आणि १९६२ मध्ये ४·६ याप्रमाणें मते त्यांना मिळाली. उलट कम्युनिस्टांच्या मतदानांत ९·७१.

१७·८२ व २४.१० अशी वाढ तिन्ही निवडणुकींत झालेली आहे. जातीयवादी पक्षांना मात्र पश्चिम बंगालमध्ये कांहीं वजन राहिलेले नाही. जनसंघास १९५२ सालीं ९ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतरच्या दोन्ही निवडणुकात मात्र तो पक्ष एकहि जागा मिळवूं शकलेला नाही. नव्या स्वतंत्र पक्षास एकहि जागा मिळालेली नाहीं. पश्चिम बंगालच्या राजकारणांत उजवा गट जवळजवळ नामशेष झाल्यासारखाच असून काँग्रेसला विरोध मुख्यतः डाव्या गटाचाच आहे.

## • आंध्रमधील परिस्थिति

आंध्रमधील १९६२ च्या निवडणुकीची तुलना १९५२व १९५७ च्या निवडणुकांशी करता येण्यासारखी नाही. कारण १९५२ मध्ये आंध्रराज्यच अस्तित्वात नव्हते आणि १९५७मध्ये आंध्रच्या फक्त तेलंगण भागातच निवडणूक झाली होती. राज्यपुनर्रचनेनंतर सबंध आंध्रमध्ये एकाच वेळी झालेली १९६२ ची निवडणूक हीच पहिली निवडणूक. तेथे काँग्रेसला ३०० पैकी १७३ जागा मिळाल्या. प्रमुख विरोधी पक्ष कम्युनिस्ट असून त्यास ५१ जागा मिळाल्या. प्रजासमाजवाद्यांचा एकहि उमेदवार निवडून आला नाही. उजव्या गटापैकी स्वतंत्र पक्षास १९ जागा मिळाल्या. जनसंघाचा एकहि उमेदवार निवडून आला नाहीं. कम्युनिस्टांना पूर्वींच्या विधानसभेतील जागापेक्षा १३ जागा अधिक मिळाल्या याशिवाय १८ कम्युनिस्ट पुरस्कृत, ८ स्वतंत्र निवडून आले असून एकुन कम्युनिस्ट गटाचे पक्षबळ ६९ आहे. डाव्या गटापैकी समाजवादी पक्षास २ जागा मिळाल्या म्हणजे एकुण डाव्या गटाचे पक्षबळ ७१ झाले आहे. बाकीच्या विजयी उमेदवारांमध्ये २० बंडखोर काँग्रेसजन, १ मजलिस इत्तेहादुल मुसलमान आणि १ प्रजापक्षाचा आहे. स्वतंत्र पक्षाचा पराभव विशेष जाणवण्यासारखा आहे या पक्षाने १४० उमेदवार उभे केले होते त्यापैकी फक्त १९ विजयी झाले ३० जणांचे डिपॉझिट जप्त झाले. पक्षाचे अध्यक्ष प्रो. एन. जी. रंगा स्वतःच्या मतदारसंघात पडले एवढेच नव्हे तर त्यांना तिसऱ्या क्रमाकांची मते मिळाली. गुंटूर हा या पक्षाचा बालेकिल्ला तेथे त्यास एकहि जागा मिळाली नाही

तेलंगण हा एके काळचा कम्युनिस्टांचा बालेकिल्ला तेथील १०६ जागांपैकी त्यांना फक्त १८ मिळाल्या. काँग्रेसने ६३ मिळविल्या. बंडखोर काँग्रेसजन १९, समाजवादी २ व स्वतंत्र पक्ष ३ अशी इतर जागांची विभागणी आहे. नळगोंडा जिल्हयातील पूर्वींच्या सर्व ९ जागा कम्युनिस्टांनी कायम राखल्या. करीमनगर जिल्हयात मात्र त्यांचे सध्याचे पाचहि आमदार पराभूत झाले. चार जागा कम्युनिस्टांनी फार थोडया मतांनी शंभराच्याहि आत अंतराने गमावल्या. गंजम मतदार संघात तर काँग्रेस उमेदवारापेक्षा कम्युनिस्टास फक्त ११ मते कमी पडली.

सहा मंत्री पराभूत झाले. संजीवय्या गट व एन्. संजीवरेड्डी गट यांच्यातील अंतर्गत गटबाजीमुळेंच मुख्यतः ते पराभूत झाले. संजीवय्या गटाने हरिजनात आणि संजीव रेड्डीच्या गटाने रेड्डी जमातीत जातीय प्रचार केल्याच्या तक्रारी आहेत. दोन्ही गटांच्या स्पर्धेत मुख्यतः संजीवय्या गटाचेच अधिक उमेदवार पडले. भावी मंत्रिमंडळात जागा मिळविण्यासाठीच ही स्पर्धा होती त्यात अखेर संजीवय्या गटाचा पराभव झाला

मुस्लीम जातीयवाद आणि हिंदु जातीयवाद दोहोंचाहि प्रभाव जनमतावर राहिलेला नाही हे निवडणुकीत स्पष्टपणे दिसून आले. मजालिस इत्तेहादुल मुसलमीनला फक्त एक जागा मिळाली. जनसंघाचा एकहि उमेदवार निवडून आला नाही एवढेच नव्हे तर सर्वांचे डिपॉझिट जप्त झाले.

## • तुल्यबळ विरोधी पक्षाचा अभाव

केरळ व ओरिसात यावेळी विधानसभेची निवडणूक झाली नाही. महाराष्ट्रातील निवडणुकीचा विचार या पुस्तिकेतील एका स्वतंत्र लेखात केला असल्याने त्याचे विवेचन येथे केलेले नाही. सर्व विधानसभा निवडणुकांचा एकत्रित विचार करता असे दिसते कीं, बहुसंख्य राज्यात काँग्रेसचे पक्षबळ पूर्वीपेक्षा घटले आहे. पण काँग्रेसला तुल्यबळ विरोधी पक्ष कोठेच निर्माण झालेला नाही. विधानसभांच्या २८७८ जागांच्या निकालात काँग्रेस १७८१, कम्युनिस्ट १६६, स्वतंत्र १६६, प्रजासमाजवादी १४९, जनसंघ ११५ असे पाच प्रमुख पक्षांचे बळ आहे. प्रजासमाजवाद्यांची वाताहत यात स्पष्टपणे जाणवते. त्यांना दुसऱ्या क्रमांकाचे तर स्थान राहिले नाहीच पण स्वतंत्र पक्षाच्याहि मागे पडून तो चौथ्या क्रमांकाचा पक्ष झाला. निवडणुकीत प्रथमच भाग घेऊन स्वतंत्र पक्षाने बिहार, राजस्थान व गुजरात या तीन राज्यात प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान मिळविले. उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशात जनसंघाला हे स्थान मिळाले. उजव्या गटाच्या या दोन पक्षांना पाच राज्यात एवढे स्थान मिळाले ही घटना त्यांचा जोर वाढत असल्याचीच निदर्शक आहे. पण सर्वच ठिकाणी काँग्रेसच्या तुलनेने विरोधी पक्ष संख्येने एवढा कमी आहे की त्याचा विरोध परिणामकारक वाटणार नाही.

सर्वच राज्यात काँग्रेसची सत्ता आणखी काही वर्षे अबाधित राहणार हाच निवडणुकीचा निष्कर्ष आहे. सध्याच्या निवडणूक पद्धतीत लोकमताचे खरे प्रतिबिंब पडत नाही. अल्पसंख्य मते पडूनहि काँग्रेस बहुसंख्य जागा मिळवू शकते. उलट विरोधी पक्षांना त्यांच्या मताच्या प्रमाणात जागा मिळत नाहीत. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती स्वीकारल्याशिवाय जागा व मतांचे व्यस्त प्रमाण नाहीसे होणार नाही. आणि विधानसभेत निरनिराळ्या विरोधी पक्षांना त्यांच्या खऱ्या बळांचे प्रमाणात प्रतिनिधित्व मिळणार नाही.

---

# तीन निवडणुका : तुलनात्मक आकडेवारी

## आसाम ( विधान सभा )

मतदार : ४९,३४,३०२; प्रत्यक्ष मतदान : २४,४१,३९२; टक्केवारी : ४९·४७ ( १९५७ : ४७·०१ )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस ... | १०,७५,३३१ | ३६·४७ | १३,२१,३६७ | ५२·३५ | ७१ | ११,७९,६२९ | ४८·३२ | ७९ |
| प्र. स. प. ... | ४,७२,४८२ | १६·०२ | ३,२१,५६९ | १२·७५ | ८ | ३,०८,७२७ | १२·६५ | ६ |
| कम्युनिस्ट ... | ६९,४३१ | २·३५ | २,०४,३४२ | ८·१० | ४ | १,५३,५०४ | ६·२९ | — |
| पहाडी नेते परिषद | — | — | — | — | — | १,२७,२६६ | ५·२१ | ११ |
| इतर ... | १३,३१,६४६ | ४५·१६ | ६,७६,६९२ | २६·८० | २५ | ६,७२,२६६ | २७·५३ | ९ |
| एकूण... | २९,४८,८९० | १०० | २५,२३,९७० | १०० | १०८ | २४,४१,३९२ | १०० | १०५ |

काँग्रेसला बऱ्याच जागा गमवाव्या लागल्या. द्रवीड मुन्नेत्र कळघमला ५० जागा मिळाल्या खऱ्या पण १९५७ मध्ये त्यांचे जे पंधरा उमेदवार विजयी झाले होते, त्यापैकी १४ जणांचा यावेळी पराभव झाला. मद्रासच्या नऊ जिल्ह्यात द्र. मु. क. (द्रवीड मुन्नेत्र कळघम) ने १४२ उमेदवार उभे केले होते. त्यांना ३५ लाख म्हणजे २७·१३ टक्के मते मिळाली. १९५७ च्या निवडणुकीत मद्रास शहर, उत्तर अर्काट, दक्षिण अर्काट व सालेम या उत्तरेकडील जिल्ह्यांमध्येच द्र. मु. क.ला विजय मिळाला होता. पण नंतरच्या पाच वर्षांत बाकीच्या जिल्ह्यातहि या पक्षाचे वजन वाढल्याचे १९६२ च्या निवडणूक निकालांवरून दिसते. उत्तर अर्काटमध्ये ११, सालेममध्ये ९, तिरुचीमध्ये ८, दक्षिण अर्काटमध्ये ६, मदुरामध्ये ३, मद्रास शहरात ४ आणि तिरुनवेल्ली व कन्याणकुमारी सोडून बाकी सर्व जिल्ह्यात या पक्षास एकेक जागा मिळाली. द्र. मु. क. ने काँग्रेसच्या ४७ जागा मिळविल्या आणि ज्या मतदारसंघांत या पक्षाचा पराभव झाला तेथेहि त्यास मतदान चांगले झालेले आहे. पंधरा मतदारसंघात त्यांच्या उमेदवारांचा एक हजार किंवा त्यापेक्षा कमी मतांचे अंतरानेच पराभव झाला आणि बाकीच्या मतदारसंघात चार जागा सोडल्यास बाकी सर्व ठिकाणी दुसऱ्या क्रमांकाची मते या पक्षाच्या उमेदवारांना मिळाली.

द्र. मु. क. ला एवढा मोठा विजय कसा मिळाला याबाबत आपले मत व्यक्त करताना मद्रासचे मुख्यमंत्री श्री. कामराज यांनी सांगितले की, "स्वतंत्र पक्ष व मुस्लीम लीग यांचा पाठिंबा नसता तर द्र. मु. क. ला एवढी मते मिळाली नसती. काही मतदारसंघात मुस्लीम मतांचा फायदा त्यांना मिळाला तर त्यांच्या निवडणूक प्रचार मोहिमेत स्वतंत्र पक्षाच्या निधीची मदत झाली."

मद्रासच्या मुख्यमंत्र्यांनी द्र. मु. क. च्या विजयाची केलेली ही मीमांसा पुरेशी नाही. हिंदमधून फुटून द्रवीडीस्तान स्थापन करण्याची द्र. मु. क. ची मागणी देशाच्या ऐक्यास विघातक आहे. तिला विरोध केला पाहिजे. पण नुसती ही मागणी अमान्य केल्याने द्र. मु. क. चे वजन कमी होणार नाही किंवा त्यांची चळवळहि मोडणार नाही. उत्तरेकडील वर्चस्वाबद्दल विशेषतः हिंदी वर्चस्वाबद्दल त्यांना वाटणाऱ्या भीतीमागील भावना समजावून घेतली पाहिजे. हजारो वर्षांपासून द्रवीड लोक कमी लेखले गेलेले आहेत. भारताच्या विकासांत द्रवीडसंस्कृतीचाहि मोठा वाटा आहे हे मान्य करून त्या संस्कृतीबद्दल आदर बाळगला पाहिजे. आर्य-संस्कृतीच्या बरोबरीने या संस्कृतीच्या संशोधनास उत्तेजन दिले पाहिजे. आपणास कमी लेखले जाते असे या लोकांना वाटतां कामा नये. घटनेने सर्व नागरिकांना समान हक्क दिले असले तरी दैनंदिन जीवनात त्याची प्रचीति त्यांना आली पाहिजे. आमचे कार्यकर्ते व राजकीय विचारवंत या दृष्टीनें द्रविडीस्तानच्या चळवळीकडे पाहात नाहींत तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही व द्र. मु. क. चे वजनहि कमी होणार नाही.

## • पंजाबी भाषिक राज्याविरुद्ध कौल

अकाली दलाच्या पंजाबी भाषिक राज्याच्या मागणीस बहुसंख्य जनतेचा पाठिंबा नाही असाच कौल पंजाबमधील विधानसभा निवडणुकीने दिला. अकालींना पंजाबी विभागात १७·३ टक्के व हिंदी विभागात १३ टक्के मते मिळाली. विधान-सभेच्या एकूण १५४ जागापैकी फक्त १९ जागा ते मिळवू शकले. १९५७ मधील निवडणुकीशी १९६२ च्या निवडणुकीची तुलना करतां येण्यासारखी नाही. कारण त्यावेळी काँग्रेस व अकाली दल यांची युति होऊन अकालींनी काँग्रेसच्या तिकिटा-वर निवडणुका लढविल्या होत्या. काँग्रेसला १९५७ मध्ये ४७·६ टक्के व १९६२ मध्ये ४७ टक्के मते मिळाली. पण १९५७ च्या काँग्रेसच्या मतात अकालींची मतेहि समाविष्ट होती हे लक्षांत घेता पाच वर्षांत काँग्रेसचे मतदान निश्चित् वाढले आहे. १९५७ च्या निवडणुकीत २३ अकालींना काँग्रेसचे तिकीट मिळालेले होते व त्यापैकी २२ निवडून आले होते. १९६२ मध्ये स्वतंत्रपणे निवडणुका लढवून अकाली फक्त १९ जागा मिळवू शकले. १९५२ च्या निवडणुकीत अकालींना २३ जागा व १५ टक्के मते मिळाली होती, १९६२ मध्ये १९ जागा व १२·६ टक्के मते मिळाली आहेत म्हणजे दहा वर्षांत जागा व मते दोन्ही दृष्टींनी अकालींना असलेला पाठिंबा कमी झालेला आहे असे दिसून येते.

अकालींशिवाय पंजाबातील दुसरा जातीय पक्ष जनसंघाचे वजन जवळजवळ आहे तसेच कायम आहे. १९५७ च्या निवडणुकीत जनसंघास ९ जागा मिळाल्या होत्या, १९६२ मध्ये ८ मिळाल्या. १९५२ च्या निवडणुकीत पंजाबात जनसंघास एकहि जागा मिळाली नव्हती. पेप्सूत मात्र दोन जागा त्याने जिंकल्या होत्या.

उजव्या गटाच्या पक्षांपैकी स्वतंत्र पक्षास फक्त तीन जागा मिळाल्या. पंजाबच्या राजकारणात हा पक्ष काही स्थान मिळवू शकला नाही हे यावरून स्पष्ट होते. अकाली, जनसंघ व स्वतंत्र मिळून उजव्या गटास एकूण ३० जागा मिळाल्या. पण यापैकी जनसंघ बाकीच्या दोन पक्षांशी फारसे सहकार्य करण्याचा संभव नाही. कारण पंजाबी भाषिक राज्याच्या मागणीस जनसंघाचा विरोध आहे. स्वतंत्र पक्षाचा मात्र या मागणीस पाठिंबा असून निवडणुकींत त्यांनी अकाली पक्षाशी सहकार्य केले होते.

डाव्या गटांपैकी प्रजासमाजवादी पक्षास एकहि जागा मिळाली नाही. १९५७ मध्ये त्यास दोन जागा मिळाल्या होत्या. त्यापूर्वीच्या म्हणजे १९५२ च्या निवडणुकींत या पक्षाचा एकहि उमेदवार निवडून आला नव्हता. यावरून म्हणजे जागांचे दृष्टीने प्रजासमाजवादी पक्ष पंजाबांत काहीहि स्थान दहा वर्षांत मिळवू शकलेला नाही. समाजवादी पक्षानें मात्र १९६२ च्या निवडणुकीत ४ जागा मिळविल्या, कम्युनिस्टांनी ९ जागा जिंकल्या. अकालीशीं त्यांनी निवडणूक करार

केलेला होता. डाव्या गटांना एकूण १३ जागा मिळाल्या असून त्यांच्यापेक्षां उजव्या गटाचा आणि त्यातहि अकाली दलासारख्या भाषिक पक्षाचा जोर विरोधी पक्षांमध्ये जास्त आहे.

## • काँग्रेसला अधिक जागा मिळालेली राज्ये

काँग्रेसला पूर्वीपेक्षा कमी जागा जेथें मिळाल्या त्या राज्यांमधील विधानसभा निवडणुकीचा विचार आतापर्यंत केला. आता काँग्रेसला १९५७ पेक्षा अधिक जागा जेथें मिळाल्या त्या राज्यांतील निवडणुकीचा विचार करावयाचा. गुजरात, आसाम, पश्चिम बंगाल, या राज्यांत काँग्रेसचे पक्षबळ पूर्वीपेक्षा वाढले. गुजरातेत ९८ वरून ११३, आसाममध्ये ७१ वरून ७९, पश्चिम बंगालमध्यें १५२ वरून १५७ याप्रमाणे ही वाढ झाली. प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान गुजरातेत स्वतंत्र पक्षाने मिळविले. त्यास २६ जागा मिळाल्या. १९५७ च्या निवडणुकीत महागुजरात जनता परिषद हा विरोधी पक्ष होता. व त्यास ३० जागा मिळाल्या होत्या. आसाममध्यें टेकड्यांच्या राज्याची मागणी करणाऱ्या हिल लीडर्स कॉन्फरन्सने प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान मिळविले. पश्चिम बंगालमध्यें कम्युनिस्ट पक्षाने प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान टिकविले. त्यांना ५० म्हणजे १९५७ पेक्षा ४ जागा जास्त मिळाल्या. विरोधी पक्षामध्ये डाव्या गटापेक्षा उजव्या गटाचा जोर गुजरातेत जास्त दिसून आला. तेथे उजव्या गटाच्या स्वतंत्र पक्षास २६ जागा मिळाल्या तर डाव्या गटामध्ये फक्त प्रजासमाजवादी पक्षास ७ जागा मिळाल्या. कम्युनिस्ट उमेदवार एकहि निवडून आला नाहीं. जनसंघाला एकहि जागा मिळाली नाही. यावरून जातीयवादी पक्षांना गुजरातेत जनतेचे पाठबळ मिळू शकलेले नाहीं हे स्पष्ट होते. आसाममधील प्रमुख विरोधी पक्ष हिल लीडर्स कॉन्फरन्स हा मुख्यतः भाषिक गट आहे. उजव्या किंवा डाव्या कोणत्याच गटांत त्याला घालता येणार नाहीं. या राज्यांत डाव्या गटाचे वजन आधींच कमी होते. ते १९६२ मध्ये आणखी कमी झाले. प्रजासमाजवादी आमदारांची संख्या ८ वरून ६ वर आली. कम्युनिष्टाना पूर्वी ४ जागा होत्या यावेळीं एकहि मिळाली नाही. चिनी आक्रमणाबाबत कम्युनिस्टांनी स्वीकारलेल्या भूमिकेचाच हा परिणाम आहे, हे उघड आहे. गुजरातप्रमाणेंच आसाममध्येहि जातीय पक्षांना स्थान नाही जनसंघाला तेथे एकहि जागा मिळाली नाही. पश्चिम बंगालमध्ये कम्युनिस्टांची संख्या ४६ वरून ५० वर गेली. प्रजासमाजवाद्यांची २१ वरून ५ पर्यंत खालीं आली. पण डाव्या गटांच्या आमदारांची एकूण संख्या १९५७ मध्ये ८२ होती ती १९६२ मध्ये ८७ पर्यंत वाढली. प्रजासमाजवाद्यांची जागेच्या दृष्टीनें घसरगुंडी झाली तशीच मतांच्या दृष्टीनेंहि झाली. १९५२ मध्ये ८·३० टक्के, १९५७ मध्ये ९·८५ टक्के आणि १९६२ मध्ये ४·६ याप्रमाणें मते त्यांना मिळाली. उलट कम्युनिस्टांच्या मतदानांत ९·७१.

१७·८२ व २४.१० अशी वाढ तिन्ही निवडणुकींत झालेली आहे. जातीयवादी पक्षांना मात्र पश्चिम बंगालमध्ये कांहीं वजन राहिलेले नाही. जनसंघास १९५२ सालीं ९ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतरच्या दोन्ही निवडणुकात मात्र तो पक्ष एकहि जागा मिळवूं शकलेला नाही. नव्या स्वतंत्र पक्षास एकहि जागा मिळालेली नाहीं. पश्चिय बंगालच्या राजकारणांत उजवा गट जवळजवळ नामशेष झाल्यासारखाच असून कॉंग्रेसला विरोध मुख्यतः डाव्या गटाचाच आहे.

## • आंध्रमधील परिस्थिति

आंध्रमधील १९६२ च्या निवडणुकीची तुलना १९५२व १९५७ च्या निवडणुकांशी करता येण्यासारखो नाही. कारण १९५२ मध्यें आंध्रराज्यच आस्तित्वात नव्हते आणि १९५७मध्यें आंध्रच्या फक्त तेलंगण भागातच निवडणूक झाली होती. राज्यपुनर्रचनेनंतर सबंध आंध्रमध्यें एकाच वेळी झालेली १९६२ ची निवडणूक हीच पहिली निवडणूक. तेथे कॉंग्रेसला ३०० पैकी १७३ जागा मिळाल्या. प्रमुख विरोधी पक्ष कम्युनिस्ट असून त्यास ५१ जागा मिळाल्या. प्रजासमाजवाद्यांचा एकहि उमेदवार निवडून आला नाही. उजव्या गटापैकी स्वतंत्र पक्षास १९ जागा मिळाल्या. जनसंघाचा एकहि उमेदवार निवडून आला नाहीं. कम्युनिस्टांना पूर्वींच्या विधानसभेतील जागापेक्षा १३ जागा अधिक मिळाल्या याशिवाय १८ कम्युनिस्ट पुरस्कृत, ८ स्वतंत्र निवडून आले असून एकुन कम्युनिस्ट गटाचे पक्षबळ ६९ आहे. डाव्या गटापैकी समाजवादी पक्षास २ जागा मिळाल्या म्हणजे एकूण डाव्या गटाचे पक्षबळ ७१ झाले आहे. बाकीच्या विजयी उमेदवारांमध्यें २० बंडखोर कॉंग्रेसजन, १ मजलिस इत्तेहादुल मुसलमान आणि १ प्रजापक्षाचा आहे. स्वतंत्र पक्षाचा पराभव विशेष जाणवण्यासारखा आहे या पक्षाने १४० उमेदवार उभे केले होते त्यापैकी फक्त १९ विजयी झाले ३० जणांचे डिपॉझिट जप्त झालें. पक्षाचे अध्यक्ष प्रो. एन. जी. रंगा स्वतःच्या मतदारसंघात पडले एवढेच नव्हे तर त्यांना तिसऱ्या क्रमाकांची मते मिळाली. गुंटूर हा या पक्षाचा बालेकिल्ला तेथे त्यास एकहि जागा मिळाली नाही.

तेलंगण हा एके काळचा कम्युनिस्टांचा बालेकिल्ला तेथील १०६ जागांपैकी त्यांना फक्त १८ मिळाल्या. कॉंग्रेसने ६३ मिळविल्या. बंडखोर कॉंग्रेसजन १९, समाजवादी २ व स्वतंत्र पक्ष ३ अशी इतर जागांची विभागणी आहे. नळगोंडा जिल्ह्यातील पूर्वींच्या सर्व ९ जागा कम्युनिस्टांनी कायम राखल्या. करीमनगर जिल्ह्यात मात्र त्यांचे सध्याचे पाचहि आमदार पराभूत झाले. चार जागा कम्युनिस्टांनी फार थोडया मतांनी शंभराच्याहि आत अंतराने गमावल्या. गंजम मतदार संघात तर कॉंग्रेस उमेदवारापेक्षा कम्युनिस्टास फक्त ११ मते कमी पडली.

# पश्चिम बंगाल ( विधान सभा )

मतदार : १,७९,७०,०००; प्रत्यक्ष मतदान : ९५,११,३००; टक्केवारी : ५२·९३ ( १९५७ : ४७·७३ )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस ... | २९,९६,३७२ | ३८·२४ | ४८,३०,९९८ | ४६·१४ | १५२ | ४४,८८,५१५ | ४७·१९ | १५७ |
| कम्युनिस्ट ... | ८,०९,८०३ | १०·३५ | १८,६५,१०६ | १७·८२ | ४६ | २३,७९,९५३ | २५·०२ | ५० |
| प्र. स. प. ... | ८,८४,८६७ | ११·२९ | १०,३१,३९२ | ९·८५ | २१ | ४,७७,४०९ | ५·०३ | ५ |
| जनसंघ ... | ४,१७,८१९ | ५·३३ | १,०२,४७७ | ०·९८ | — | ४७,७५० | ०·५० | — |
| महासभा ... | १,७६,७६२ | २·२६ | २,२१,६१४ | २·०९ | — | ७६,१३८ | ०·८० | — |
| फॉरवर्ड ब्लॉक ... | ३,९४,६०५ | ५·०४ | ४,०५,९१० | ३·९१ | ८ | ४,१९,०८६ | ४·४१ | १३ |
| रेव्होल्युशनरी स. प. | ६३,९२७ | ०·८२ | १,८५,६५८ | १·८० | ३ | २,१०,६०६ | २·२१ | ७ |
| समाजवादी ... | — | — | — | — | — | २,६१० | ०·०३ | — |
| स्वतंत्र ... | — | — | — | — | — | ५७,४५९ | ०·६० | — |
| इतर ... | २०,९०,७७८ | २६·६७ | १८,२६,६४८ | १७·४१ | २२ | १३,५१,७७४ | १४·२१ | २० |
| एकूण... | ७८,३४,९३३ | १०० | १,०४,६९,८०३ | १०० | २५२ | ९५,११,३०० | १०० | २५२ |

# ओरिसा लोकसभा

मतदार : ७९,९७,६८४; प्रत्यक्ष मतदार : १९,६९,९६५; टक्केवारी : २४·६२ (१९६१ विधान सभा ३४.५)

| पक्ष | १९५२ मतदान टक्के | १९५७ मतदान टक्के | १९६१ (विधानसभा) | | | १९६२ (लोकसभा) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के |
| काँग्रेस ... | ३८·८४ | ३८·२१ | १३,०९,६०७ | ४४·४४ | ८२ | १०,९३,२९७ | ५५·५३ |
| स्वतंत्र ... | २०·५१ | २८·३७ | ६,४२,८२२ | २१·८१ | ३७ | ३,४२,९७० | १७·४२ |
| प्र. स. प. ... | १२·२२ | १०·३९ | ३,०[illegible],५१४ | १०·२३ | १० | ३,०५,११६ | १५·५० |
| कम्युनिस्ट ... | ५·६८ | ८·९३ | २,४६,४६५ | ८·३७ | ४ | १,००,५७७ | ५·११ |
| समाजवादी ... | — | — | — | — | — | ५२,६३३ | २·६७ |
| इतर ... | २२·७५ | १४·१० | ४,४६,५७६ | १५·१५ | ७ | ७४,४७२ | ३·७८ |
| एकूण... | १०० | १०० | २९,४६,९८४ | १०० | १४० | १९,६९,९६५ | १०० |

## आंध्र प्रदेश ( विधान सभा )

मतदार : १,९०,११,४१७; प्रत्यक्ष मतदान : १,१६,९६,३८८; टक्केवारी : ६१·५२

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | ३३,९६,२९२ | ३१·६४ | ५१,१४,६१६ | ४१·५४ | १८७ | ५५,२६,६८७ | ४७·२५ | १७७ |
| कम्युनिस्ट | २४,४३,७९४ | २२·७७ | ३६,२६,५६० | २९·४५ | ३७ | २२,५७,७४८ | १९·३० | ५१ |
| समाजवादी | ... | ... | — | ... | — | ७२,१३१ | ०·६२ | २ |
| प्रजासमाजवादी | १९,२३,०३१ | १७·९२ | ६,९३,२५३ | ५·६३ | १४ | ३४,७३८ | ०·३० | — |
| जनसंघ | — | — | ८,२१८ | ०·०७ | — | १,१७,०२९ | १·०० | — |
| स्वतंत्र | — | — | ६,२५,८२७ | ५·०८ | — | १२,४०,३९२ | १०·६१ | १९ |
| रिपब्लिकन | — | — | — | ... | — | ४५,११५ | ०·३८ | — |
| इतर | २९,६९,८०४ | २७·६७ | २२,४५,०९७ | १८·२३ | ६३ | २४,०२,५४८ | २०·५४ | ५१ |
| एकूण... | १,०७,३२,९२१ | १०० | १,२३,१३,५७१ | १०० | ३०१ | १,१६,९६,३८८ | १०० | ३०० |

# मद्रास ( विधान सभा )

मतदार : १,८६,६९,०८०; प्रत्यक्ष मतदान : १,२६,२०,९९५; टक्केवारी : ६७·६० ( १९५७ : ४६·९४ )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | ३३,३६,०५४ | ३५·९ | ५०,४६,५७६ | ४५·३ | १५१ | ५८,१७,१३८ | ४६·०९ | १३९ |
| कम्युनिस्ट | ९,०९,०२२ | ९·८ | ८,२३,५८६ | ७·४ | ४ | ९,७८,०४५ | ७·७५ | २ |
| प्र. स. प. | १०,८८,१७३ | ११·८ | २,९३,७७८ | २·६ | २ | १,६०,७६४ | १·२७ | — |
| द्रविड मुन्नेत्र कळघम | — | — | १५,८४,७०६ | १३·८ | १५ | ३४,०६,८०४ | २७·०० | ५० |
| स्वतंत्र | — | — | — | — | — | ९,९१.७६२ | ७·८६ | ६ |
| फॉरवर्ड ब्लॉक | — | — | — | — | — | १,७२,२६१ | १·३६ | ३ |
| इतर | ३९,४१,९६७ | ४२·५ | ३३,८२,३५४ | ३०·१ | ३३ | १०,९४,२२१ | ८· ७ | ६ |
| एकूण... | ९२,७५,२१६ | १०० | १,११,३०,९९६ | १०० | २०५ | १,२६,२०,९९५ | १०० | २०६ |

## म्हैसूर ( विधान सभा )

मतदार : १,१३,५१,५२९; प्रत्यक्ष मतदान : ६३,०१,७७८; टक्केवारी : ५५·९९ ( १९५७ : ५२·३३ )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | २४,३६,९६१ | ४९·४५ | ३३,४३,८३९ | ५२·०८ | १५० | ३१,४०,३१२ | ४९·३ | १३८ |
| प्रजासमाजवादी | ११,११,३२० | २२·५४ | ९,०२,३७३ | १४·० | १८ | ८,६०,०४८ | १३·५ | २० |
| कम्युनिस्ट | ६७,३०० | १·३७ | १,२३,४०३ | १·९२ | १ | १,४३,८४५ | २·२८ | ३ |
| जनसंघ | ७४,८०१ | १·५२ | ८६,०८४ | १·३७ | — | १,४४,८२८ | २·३० | — |
| समाजवादी | — | — | — | — | — | ६४,८२९ | १·०३ | १ |
| स्वतंत्र | — | — | — | — | — | ४,५४,२९० | ७·२१ | ९ |
| इतर | ९२,३७,९१५ | २५·१२ | १९,६४,४६० | ३०·५८ | ३९ | १४,९३,६२६ | २३·७० | ३७ |
| एकूण... | ४९,२८,२९७ | १०० | ६४,२०,१५९ | १०० | २०८ | ६३,०१,७७८ | १०० | २०८ |

## केरळ (लोकसभा)

मतदार : ७९,९६,३६३; प्रत्यक्ष मतदान ५५,२८,९८३; टक्के ६९·१४; (१९६० विधान सभा : ८४·४१)

| पक्ष | १९५२ टक्के | १९५७ टक्के | १९६० (विधानसभा) | | | १९६२ (लोकसभा) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के |
| काँग्रेस | ४२·३ | ३७·८७ | २७,९९,२९४ | ३४·४४ | ६३ | १८,९५,२२६ | ३४·२८ |
| प्र. स. प. | २०·३ | १०·७६ | ११,४६,०२९ | १४·१४ | २० | ५,४६,६२१ | ९·८९ |
| मुस्लीम लीग | ३·२ | ४·०० | ३,९९,९२५ | ४·९४ | ११ | २,४८,०३८ | ४·४९ |
| कम्युनिस्ट | १७·५ | ३५·२८ | ३५,५०,१३६ | ४३·८१ | २९ | १९.६०,६८३ | ३५·४६ |
| आर. एस. पी. | ४·० | ३·०० | १,०६,१३७ | १·३१ | १ | १,९९,३३७ | ३·६० |
| स्वतंत्र | ... | ... | ... | ... | ... | ९,६७५ | ०·१८ |
| जनसंघ | ... | ... | ५,२७७ | ०·०७ | ... | ३७,४८५ | ०·६८ |
| इतर | १२·७ | ९·०९ | १,०४,९६० | १·२९ | २ | ६,३१,८८८ | ११·४२ |
| एकूण.... | १०० | १०० | ८१,०३,७५८ | १०० | १२६ | ५५,२८,९५३ | १०० |

## बिहार ( विधानसभा )

मतदार २,२०५८,१६८, प्रत्यक्ष मतदान : ९७१७५७०, टक्के ४४·०६ ( १९५७ : ४०·५९ )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | ३८,५२,६५७ | ४२·१ | ४४,३६,१४५ | ४१·९१ | २१० | ४०,४५,७३३ | ४१·६३ | १८५ |
| प्रजासमा० व दी | २०,०१,३४० | २१·९ | १७,१८,४१३ | १६·२३ | ३१ | १३,९६,६६९ | १४·३७ | २९ |
| स्वतंत्र* | ३,०१,६९१ | ३·३ | ८,६९,२२८ | ८·२१ | २३ | १७,००,११५ | १७·५० | ५० |
| झारखंड | ७,६५,०३२ | ८·४ | ७,३७,७०५ | ६·९६ | ३० | ४,३५,६६० | ४·४८ | २० |
| कम्युनिस्ट | ९९,८१९ | १·१ | ५,४५,५७७ | ५·१५ | ७ | ६,१६,४५८ | ६·३४ | १२ |
| समाजवादी | — | — | ३,१६,२२५ | ३·०१ | २ | ५,०५,०८३ | ५·२० | ७ |
| जनसंघ | १,१३,२३४ | १·२ | १,०८,१८८ | १·०२ | — | २,५६,१५५ | २·६४ | ३ |
| इतर | २०,१३,६९९ | २२·० | १८,५३,९४० | १७·५१ | १५ | ७,६१,६९७ | ७·८४ | १२ |
| एकूण... | ९१,५५,४७२ | १०० | १,०५,८५,४२१ | १०० | ३१८ | ९७,१७,५७० | १०० | ३१८ |

* जनता पक्ष पुढें स्वतंत्र पक्षांत सामील झाला. १९५२ व १९५७ ची मतें जनता पक्षाची आहेत.

सं. ११]

## उत्तर प्रदेश ( विधानसभा )

मतदार : ३,६६,६२,७१०; प्रत्यक्ष मतदान : १,७०,७०,९१६; टक्केवारी : ४६·६६ ( १९५७ : ४४·९२ )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | ८०,३२,४४५ | ४७·९ | ९२,९८,३८२ | ४२·४२ | २८६ | ५९,६४,३२४ | ३४·९३ | २४९ |
| प्र. स. प. | २९,८६,७९० | १७·८ | ३१,७०,८६५ | १४·४७ | ४४ | २०,३८,४३८ | ११·८९ | ३८ |
| समाजवादी | — | — | — | — | — | १४,४९,००१ | ८·५१ | २४ |
| कम्युनिस्ट | १,५५,८६९ | ०·९ | ८,४०,३४८ | ३·८३ | ९ | ९,१९,२८६ | ५·४० | १४ |
| जनसंघ | १०,६६,७१४ | ६·४ | २१,५७,८८३ | ९·८४ | १७ | २६,०६,९४६ | १५·२९ | ४९ |
| हिंदुमहासभा | २,३४,८५९ | १·४ | १३,८८० | — | — | १,८७,३१५ | १·१० | २ |
| रामराज्य | २,९१,७५४ | १·७ | १,७०,०१५ | ०·८० | — | ५३,४४७ | ०·३१ | — |
| स्वतंत्र | — | — | — | — | — | ८,२२,४१३ | ४·८३ | १५ |
| रिपब्लिकन | — | — | — | — | — | ६,५२,७६७ | ३·८३ | ८ |
| इतर | ३९,८९,६८१ | २३·९ | ६२,६७,२३३ | २८·६४ | ७४ | २३,७६,९७९ | १३·९१ | ३१ |
| एकुण... | १,६७,५८,११२ | १०० | २,१९,१८,६०६ | १०० | ४३० | १,७०,७०,९१६ | १०० | ४३० |

## मध्यप्रदेश ( विधानसभा )

मतदार : १,५८,५६,४०४; प्रत्यक्ष मतदान : ६५,३.८,५८६; टक्केवारी : ४१·२४ ( १९५७ : ३६·९० )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | ३१,४४,४२४ | ४५·८५ | ३६,९१,९९९ | ४९·८३ | २३२ | २५,२७.२९० | ३८·६५ | १४१ |
| प्र. स. प. | ९,५२,३३९ | १३·८९ | ९,७६,०२० | १३·१८ | १२ | ७,२४,३६५ | ११·०८ | ३३ |
| जनसंघ | ४,०३,२४३ | ५·८८ | ७,३३,३१५ | ९·८९ | १० | १०,८७,४९१ | १६·६३ | ४१ |
| रामराज्य प. | ३,४४,५६० | ५·०२ | २,१७,४१२ | २·८० | ५ | २.४७,८०७ | ३·७८ | १० |
| हिंदूमहासभा | २,८१,०९० | ४·१० | ३,१७,६९७ | ४·०० | ७ | २,११,५८९ | ३·२४ | ६ |
| स्वतंत्र | — | — | — | — | — | ८०,४७३ | १·२३ | २ |
| कम्युनिस्ट | ४४,२८६ | ०·६५ | १.२०,५४९ | १·६३ | २ | १,३२,४४० | २·०३ | १ |
| समाजवादी | — | — | — | — | — | ३,१०,१८१ | ४·७४ | १४ |
| इतर | १६,८७,७१२ | २४·६१ | १३,५१,७८६ | १८·६७ | २० | १२,१७,७५० | १८·६२ | ३९ |
| एकूण... | ६८५७,६५४ | १०० | ७४,०८,७७८ | १०० | २८८ | ६५,३८,५८६ | १०० | २८८ |

# पंजाब ( विधानसभा )

मतदार : १,०५, ६९, ५४३; प्रत्यक्ष मतदान : ६७,०१, १८१, टक्के : ६२·६०; ( १९५७ : ५८·०२ )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | २५,२७,५८० | ३८·३६ | ३६,१२,७०९ | ४७·५१ | ११८ | २९,३५,३५२ | ४३·८० | ९० |
| कम्युनिस्ट | ४,०७,१४२ | ६·१८ | १०,३०,८८९ | १३·५६ | ६ | ४,७८,३१५ | ७·१४ | ९ |
| जनसंघ | २,९५,१२१ | ४·४८ | ६,५४,३९५ | ८·६१ | ९ | ६,४०,८९४ | ९·५६ | ८ |
| प्र. स. प. | २,२६,८३२ | ३·४४ | ९४,५६४ | १·२४ | १ | ६०,३९० | ०·९० | — |
| रिपब्लिकन | १,५०,००० | २·२८ | ४,१८,७३३ | ५·५१ | ५ | १,४३ ८४३ | २·१७ | — |
| अकाली | १०,७३,९९९ | १६·२९ | — | — | — | ७,९८,९२५ | ११·९२ | १९ |
| स्वतंत्र | -- | — | — | — | — | २,६१,२७६ | ३·९० | ३ |
| समाजवादी | -- | — | — | — | — | ९३,७९१ | १·४० | ४ |
| इतर | १९,०८८४१ | २८·९७ | १७,९२,५५१ | २३·५७ | १३ | १२,८८,३९५ | १९·२१ | १९ |
| एकूण... | ६५,८९,५१५ | १०० | ७६.०३,८५० | १०० | १५२ | ६७,०१,१४१ | १०० | १५२ |

## राजस्थान ( विधानसभा )

मतदार : १,२,६७,००६; प्रत्यक्ष मतदार : ५१,०७,११५; टक्के : ४९.७५ ( १९५७ : ३८.६८ )

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | १३,८८,३९४ | ४०.०८ | २१;४१,९२४ | ४५.१३ | ११९ | २०,४२,१२२ | ४०.० | ८८ |
| जनसंघ | २,२२,१४४ | ६.४१ | २,६३,४४३ | ५.५५ | ६ | ४,६९,५०७ | ९.२ | १५ |
| रामराज्य प. | ३,९९,९५८ | ११.५५ | ४,५५,५८८ | ९.६० | १७ | १,०२,९८७ | २.० | ३ |
| प्र. स. प. | १,५२,९६९ | ४.४२ | १,१७,५३२ | २.४७ | १ | ७४,९४९ | १.५ | २ |
| कम्युनिस्ट | २०,६७५ | ०.६० | १,४३,५४७ | ३.०२ | १ | २,७६,९७२ | ५.४ | ५ |
| स्वतंत्र | — | — | — | — | — | ८,७७,३४५ | १७.२ | ३६ |
| समाजवादी | — | — | — | — | — | १,९२,५७० | ३.८ | ५ |
| इतर | १२,७९,५३५ | ३६.९४ | १६,२४,४२७ | ३४.२३ | ३२ | १०,७०,६६३ | २०.९ | २२ |
| एकूण... | ३४,६३,६७४ | १०० | ४७,४६,४६१ | १०० | १७६ | ५१,०७,११५ | १०० | १७६ |

## गुजरात ( विधानसभा )

मतदार : ९५,४०,९४६; प्रत्यक्ष मतदान : ५३,३१४,१८; टक्के : ५५·८८

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | १२,३५,८५७ | ३५·८४ | २७,१५,९८१ | ५५ ९२ | ९७ | २६,४५,५७० | ४९·६२ | ११३ |
| प्र. स. प. | ७,११,१९५ | २०·६३ | ३,३४०.३६ | ६·८८ | ४ | ४,१८,८५४ | ७·८६ | ७ |
| कम्युनिस्ट | — | — | ३७,८६२ | ०·७८ | — | ९३९० | ०·१८ | — |
| जनसंघ | — | — | २४,२५२ | ०·५० | — | ८६,२६७ | १·२४ | — |
| स्वतंत्र | — | — | — | — | — | १२,९२,५०८ | २४·२४ | २६ |
| इतर | १५,०१,१४४ | ४३·५३ | १७,४५,१८६ | ३५·९२ | २९ | ८,९८,८२९ | १६·८६ | ८ |
| एकूण... | ३४,४८,१९६ | १०० | ४८,५७,३१७ | १०० | १३० | ५३,३१,४१८ | १०० | १५४ |

## महाराष्ट्र ( विधानसभा )

मतदार : १,९२,०३,९८५; प्रत्यक्ष मतदान : १०८,१५,६०९; टक्के : ५६·३२

| पक्ष | १९५२ | | १९५७ | | | १९६२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदान | टक्के | मतदान | टक्के | जागा | मतदान | टक्के | जागा |
| काँग्रेस | ६१,४७,९०० | ६३·९० | ५१,८१,०६९ | ४५·०६ | १३६ | ५६,१८,१३८ | ५१·९४ | २१५ |
| प्र. स. प. | १४,१६,७४५ | १४·७५ | ११,७३,००४ | १०·२० | ३२ | ७,६१,३९९ | ७·०४ | ९ |
| कम्युनिस्ट | — | — | ७,२४,८७० | ६·३० | १८ | ६,४८,३२६ | ६·०० | ६ |
| जनसंघ | — | — | २,६७,४४० | २.३३ | ४ | ५,४७,८४७ | ५·०७ | — |
| शे. का. प. | ७,४५,३४५ | ७·७५ | ११,४७,३०३ | ९·९८ | ३१ | ८,१४,९६३ | ७·५४ | १५ |
| रिपब्लिकन | ३,२०,३४५ | ३·३३ | १०,८६,४७९ | ९·४५ | ९ | ५,७०,७१७ | ५·२७ | ३ |
| इतर | ९९०३४८ | १०·२७ | १९,१८,१२१ | १६·६८ | ३२ | १८,५४,२१९ | १७·१४ | १६ |
| एकूण... | ९६,२०;६८३ | १०० | १,१४,९८,२८६ | १०० | २६२ | १०८,१५,६०९ | १०० | २६४ |

[ पान १६ वरून चालू ]

फोंफावणार असेल तर गरीब, व गांजलेल्या जनतेचे स्पृश्यास्पृश्य विभाग एकमेकांशीं समरस झाल्याशिवाय तें स्वप्न कधींही साकार होणार नाहीं. या दिशेनें महाराष्ट्रांत कांहीं थोडे पावले टाकण्यांतही समिति यशस्वी झाली असेल तर संयुक्त महाराष्ट्राच्या प्रस्थापनेच्या कामगिरीपेक्षां तें कार्य तसूभरही कमी नाहीं. उलटपक्षीं दूरदृष्टीनें अधिक मोलाचे आहे असाच निर्वाळा भारताचे भावी इतिहासकार देतील.

## ● काँग्रेसच्या अपप्रवृत्ति समितीतहि आल्या

गेल्या पांच वर्षांत म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्ड यांतही समितीनें काम केलें. विशेषतः मुंबई कार्पोरेशनमध्यें काँग्रेसच्या अठरा वर्षांच्या कारकीर्दींत न झालेल्या सुधारणा समितीनें करून दाखविल्या, परंतु प्रांतव्यापी दृष्टीनें विचार करतां स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यापलिकडे समितीनें त्या कार्यांत लक्ष घातलें नाहीं. काँग्रेसमधील परंपरागत अपप्रवृत्ति कांहीं अंशानें समितीच्या नियुक्त प्रतिनिधींत आल्या याचा परिणामही या सार्वत्रिक निवडणुकींतील मतदानावर झालेला आहे.

डाव्या पक्षांतील वैचारिक संघर्ष एकजुटीच्या मर्यादा ठेवून होऊं शकतात. व व्हावे. त्यांतून व दैनंदिन कार्यांतील एकजुटींतून खरा समाजवाद कोणाचा हे अखेर जनता व इतिहास ठरवील. तो प्रश्न जनतेच्या प्रत्यक्ष अनुभवावर सोपवावा परंतु मध्यंतरी तात्विक पावित्र्याच्या नांवावर डाव्या व पुरोगामी शक्तींनीं व पक्षांनीं एकमेकांत झुंजत रहावयाचे व त्यांतून काँग्रेसनें व आत्यंतिक प्रतिगामी पक्षांनीं आपले घोडे पुढें दामटावयाचे ही ऐतिहासिक शोकांतिका मात्र देशांत घडूं देऊं नये.

* * *

# जागा आणि मतें यांत मेळ नाहीं

मधु लिमये

स्वतंत्र हिंदुस्थानांत आतांपर्यंत ज्या तीन निवडणुका झाल्या त्यावरून एक गोष्ट प्रकर्षानें पुढें आली आहे. ती म्हणजे एखाद्या पक्षाला कायदेमंडळांत मिळणारें प्रतिनिधित्व व त्याला मिळालेलीं एकूण मतें यांत कांहींहि मेळ राहिलेला नाहीं. या व्यस्त प्रमाणामुळें संघटित, जुन्या व त्यांतल्या त्यांत सत्तारूढ पक्षाला विशेष फायदा मिळत असून काँग्रेस विरोधी पक्ष अजिबात खुरटून जाण्याची भीति त्यामुळें बळावली आहे. धोरण, कार्यक्रम व पक्षनिष्ठा यापेक्षां व्यक्तिमहात्म्याला या पद्धतीमुळें महत्व आलें असून, पराभूत मनोवृत्तीनें ग्रस्त झालेल्या पक्षांना संधिसाधु आघाड्या-कडे आकृष्ट करण्यास व तत्वशुद्ध राजकारणापासून त्यांना परावृत्त करण्यासहि ही निवडणूक पद्धत कारणीभूत होत आहे. प्रमाणशीर प्रतिनिधित्वावर आधारलेली कोणती तरी पद्धत स्वीकारल्यावाचून ही परिस्थिति बदलणार नाहीं. राज्यव्यवस्थेचें स्थैर्य यामुळें ढासळणार नाहीं काय असें कांहीं लोक विचारतील. सकृतदर्शनीं असें वाटत असलें तरी राजकारणाला वास्तववादाचा आधार मिळाल्यानें एकूण परिस्थितींत अनुकूल बदल होईल असें वाटतें.

## ● जुन्या सरंजामी निष्ठांचा प्रभाव

केवळ बाह्यांगाचाच विचार केला तर गेल्या निवडणुकींतील मतदान मोकळेपणानें झालें असें म्हणावें लागेल. सरकारतर्फे विरोधी पक्षांवर, त्यांच्या प्रचार सभांवर व वृत्तपत्रीय लिखाणावर कोणतेही बंधन घालण्यांत आलें नव्हते. निवड-णुकीला कोणीहि उमेदवार म्हणून उभा राहूं शकत होता. सरकारच्या निवडणूक यंत्रणेलाहि तटस्थबुद्धीनें आपलें काम करण्याचा आदेश मिळाला होता. हें सर्व जरी खरें असलें व कायद्यानें मतदान "मोकळेपणा"नें व्हावें अशी तरतूद असली तरी प्रत्यक्षांत मतदारांवर दडपणें आलीं यांत कांहीं शंका नाहीं. सत्ता, पैसा व जात यापैकी एखादें दडपणच प्रभावी होतें असें म्हणतां येणार नाहीं. महाराष्ट्र काँग्रेसच्या व महाराष्ट्र सरकारच्या नेतृत्वांत झालेल्या खांदेपालटानें महाराष्ट्रांतील बहुजनांच्या एका मोठ्या विभागाला आतां "आपलें राज्य" आलें असें वाटूं लागलें असून महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेमुळें जनतेमधील काँग्रेसबद्दलची चीडहि कमी झाली आहे. साहजिकच या वर्गानें काँग्रेसला मोठ्या प्रमाणांत पाठिंबा दिला. पण त्याचा अर्थ प्रत्येक उमेदवाराची जात पाहून त्यानें मतें दिली असा होत नाहीं. पुढारलेल्या व अल्पसंख्य जमातींचे प्रतिनिधि एरवी काँग्रेस तिकीटावर निवडून आलेच नसते. सत्तेचे दडपण जबरदस्त असते यांत शंकाच नाहीं. एखाद्या ज्वलंत प्रश्नामुळें निर्माण

झालेला भावनावेग, सत्तारूढ पक्षाच्या उमेदवाराबद्दल अप्रीति, विरोधी उमेदवारांची जनसेवा व कार्य, विरोधकांचीं मतें विभागलीं न जाणें, विरोधी उमेदवाराला पुरेसें साधनबळ व मनुष्यबळ उपलब्ध होणें इ० अनेक गोष्टी जेथें जुळून आल्या तेथेंच सत्ता आणि पैसा यांच्या संयुक्त दडपणाला तोंड देणें विरोधी पक्षांना शक्य झालें. पण केवळ पैसा वा जात यांच्या जोरावर विरोधी पक्ष निवडणूक जिंकू शकलेला नाहीं. या सर्व दडपणापेक्षांहि मतदारावर जुन्या सरंजामी व धार्मिक निष्टा अधिक प्रभाव पडूं शकल्या. हें विभिन्न पक्षांच्या तिकीटावर जे राजे-जागीरदार विजयी झाले आहेत त्यावरून स्पष्ट होतें.

सत्ताधारी पक्षानें सत्तेचा व सत्तेमुळें मिळणाऱ्या पैशाचा उपयोग करूं नये, असा उपदेश त्याला करणें व्यर्थ आहे. विरोधी पक्षांनीं जन आंदोलन, जनसंघटना, लोकसेवा आणि तत्त्वनिष्ठ व्यवहार यांवर अविचल श्रद्धा ठेवून व तात्कालिक यशाची आशा सोडून कार्य केलें तरच त्यांचा टिकाव लागेल असें वाटतें.

## • जागरूकता वाढलेली नाहीं

गेल्या १० वर्षांत मतदारांची जागरूकता वाढली आहे असें मानायला कांहीं आधार आहे असें वाटत नाहीं. क्षणिक भावनात्मक प्रक्षोभामुळें सत्ताधारी पक्षाविरुद्ध मत देण्याचा उत्साह दाखविणें व प्रक्षोभाचें तात्कालिक कारण दूर होतांच परत सत्ताधारी पक्षाच्या गळ्यांत माळ घालणें हें कांहीं मूलभूत जागरुकतेचें लक्षण नाहीं. परंपरागत निष्ठाहि गेल्या कांहीं वर्षांत पुनश्च उफाळून वर आल्या आहेत. याचें कारण स्वातंत्र्य क्रान्तीमुळें आपल्या देशांत मूलभूत परिवर्तन न होतां जुन्या समाज व्यवस्थेला फक्त ठिगळें जोडण्याचें, तिला नवा रंग देण्याचें काम झालें हें आहे. अपूर्ण क्रांतीमुळें लोकांत असंतोष माजतो व त्याचा फायदा नेहमीं परंपरागत निष्ठांच्या आधारें उभ्या राहणाऱ्या गटांना मिळतो. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीं आपल्या सार्वजनिक जीवनावर ध्येयवादाची झिलई होती. गेल्या कांहीं वर्षांत ती साफ उडून गेली असून आपल्या राष्ट्रीय चारित्र्यांतील दोष स्पष्टपणें पुढें आले आहेत. म्हणूनच मतदारांचीं मतें उघड उघड खरीदणें, वा मतदारांना, "तुम्हांला मंदिर बांधून देतों, शाळा देतों, विहीर देतों" अशी सामुदायिक लांच देणें, तसेंच त्यांच्या परंपरागत धार्मिक व सरंजामी निष्ठांना आवाहन करणें हे प्रकार आलिकडे वाढत्या प्रमाणावर चालले आहेत, राजकीय पक्षांचा संधिसाधूपणा हाहि मतदारांमधील ध्येय व कार्यक्रमनिष्ठा कमी करण्यास कारणीभूत झालेला आहे. असे मतदार वैयक्तिक लायकीकडेहि डोळेझांक करूं लागले तर त्यांत नवल नाहीं.

## • सत्ताधारी पक्षास धनिकांची मदत

अधिकारारूढ पक्षाला मिळणारे फायदे जेवढे बहुविध आहेत तितकेच स्पष्टहि आहेत. व्यापारी-उद्योगपतींवरील सरकारी नियंत्रणाचें क्षेत्र इतकें व्यापक आहे व त्यांना निरनिराळ्या मार्गांनें मदत करण्याचे इतके अधिकार सरकारकडे आहेत कीं, निवडणूक निधीसाठीं त्यांच्याकडून सत्ताधारी पक्षाला जेवढी मदत मिळूं शकते तिचा अंशमात्रहि विरोधी पक्षांना विशेषतः क्रांतिकारक कार्यक्रमावर आधारलेल्या पक्षांना मिळूं शकत नाहीं. ह्याच धनिक मंडळीच्या हातांत वृत्तपत्रादि साधनें असल्यामुळें सत्तधारी पक्षाचा प्रचार ती मोठ्या प्रमाणावर करतात. या वृत्तपत्रांची सहानुभूति स्वतंत्र पक्षाकडे असूनहि गेल्या निवडणुकींत काँग्रेस पक्षाला त्यांनीं कांहीं थोडें थोडकें साहाय्य केलें नाहीं. सत्ताधारी पक्ष सरकारी अधिकारी व सरकारी यंत्रणा यांचाहि आपल्या प्रचारासाठीं उपयोग करतो. विशेषत: ग्रामीण भागांत हें मोठ्या प्रमाणावर घडत असतें. विरोधी पक्षाच्या उमेदवाराला ( उजव्या गटाच्या ) सरकारी अधिकाऱ्यांनीं मदत केल्याचीं उदाहरणें आहेत. पण तीं अपवादात्मक. याचा मुख्य फायदा सत्ताधारी पक्षानेंच घेतला आहे. आकाशवाणी तर अहोरात्र सरकारचा अन् सत्ताधारी प्रचार करीत आहे.

## • विरोधी पक्ष हतबल होण्याची भीति

ब्रिटिश पद्धतीच्या संसदीय लोकशाहींत दोन तुल्यबल पक्ष असल्याचें दृश्य दिसतें. अमेरिकेंत अध्यक्षीय पद्धत असूनहि तेथें दोनच मोठे पक्ष आहेत. ( अर्थात् तेथील पक्ष पद्धतीचे स्वरुप भिन्न आहे. ) परंतु इंग्रजी भाषिक देशांव्यतिरिक्त इतर देशांत ही द्विपक्षीय पद्धत अस्तित्वांत आहे असें दिसत नाहीं. प्रत्येक देशांतली लोकशाही व्यवस्था व पक्षपद्धति हा तेथील ऐतिहासिक विकासक्रमाचा परिपाक आहे. राज्यशास्त्राच्या प्राध्यापकांनीं एखाद्या देशांत तिची आवश्यकता प्रतिपादल्यानें ती निर्माण होईलच असें नाहीं. आपल्या देशांत काँग्रेसला तुल्यबल असा पक्ष गेल्या १०–१५ वर्षांत निर्माण झालेला नाहीं. काँग्रेसचें स्थान घेऊन पर्यायी सरकार बनण्याची गोष्टच राहो पण राष्ट्रीय पातळीवर केवळ–कांहीं राज्यांत नव्हे—काँग्रेसला जोरदार विरोध करील असा पक्षहि अजून पैदा झालेला नाहीं. प्रजा-समाजवादी पक्षाला उतरती कळा लागली असून तीन राज्यें सोडलीं तर इतरत्र व राष्ट्रीय पातळीवर कम्युनिस्ट पक्षाची वाढ खुंटल्यासारखीच आहे. स्वतंत्र पक्षाचा "उदय"हि कांहीं भागांतच झाला असून खऱ्या अर्थानें त्याला पक्ष म्हणतांच येणार नाहीं. जनसंघाचें प्राबल्य विशिष्ट टापूंत आढळून येते; पण पूर्वेला व दक्षिणेला तो नाममात्रच आहे. समाजवादी पक्षाची वर्तमान परिस्थितीहि फारशी चांगली नाहीं. तरीहि त्यामुळें एकपक्षीय हुकूमशाही निर्माण होण्याची परिस्थिति उत्पन्न झाली आहे असे म्हणतां येणार नाहीं. खरी भीति काँग्रेस पक्ष विरोधी पक्षावर

आपल्या उलटसुलट घोषणांची मोहिनी घालून त्यांना कायमचें हतबल करील ही आहे.

कॉंग्रेस पक्ष विरोधी पक्षाची वाढ होऊं देत नाहीं, त्याबाबतींत त्यांना साहाय्य करीत नाहीं ही तक्रार निरर्थक आहे. वस्तुतः कॅाँग्रेस पक्ष विरोधी पक्षांना अनंत-काळपर्यंत पंगु अवस्थेंत जिवंत ठेवूं इच्छितो. आमचे विरोधी पक्ष जर भिन्न भिन्न कारणांसाठीं या स्थितींत संतोष मानत असतील तर त्याबद्दल सत्ताधारी पक्षाला दोष देऊन काय लाभणार आहे ? आदर्श लोकशाही संकेत निर्माण करण्याचा व त्या संकेतांनुसार आपलें आचरण ठेवण्याचा प्रयत्न जरी कॅाँग्रेसनें केला तरी पुरे आहे. सत्ताधारी पक्ष या नात्यानें या बाबतींत कॅाँग्रेसवर विशेष जबाबदारी येते. अर्थात् तेथेंहि विरोधी पक्षांच्या कणखरपणावर, ध्येयनिष्ठेवर व प्रामाणिकपणावर मदार ठेवणेंच इष्ट होणार आहे

## • विरोधी पक्षाला खरीदण्याचा प्रयत्न

राज्यकर्ता पक्ष व विरोधी पक्ष यांच्यातील आजचे संबंध साफ व निरोगी आहेस असें वाटत नाहीं. त्यांचा विरोध हा बव्हंशी नकली व गौण प्रश्नांपुरता मर्यादित आहे. विरोधी पक्षाला खरीदण्याचा, त्यांच्या प्रमुख सभासदांना भ्रष्ट करण्याचा राज्यकर्त्या पक्षाचा नेहमी प्रयत्न असतो. कधीं कधीं ह्या पक्षांतून आपल्या पक्षांत रंगरूट भरती करण्याचें कामहि सत्ताधारी पक्ष करतो. या मोडतोडीच्या भेदनीतीला आळा बसावा म्हणूनच आचार संहितेची चर्चा निघाली. परंतु विरोधी पक्षांची पडझड अद्याप चालूच आहे. बरेंच विरोधी पक्ष हे कार्यक्रम–धोरणाच्या भिन्नतेपेक्षां वैयक्तिक प्रतिष्ठेवर आधारलेले असल्यामुळें, तात्कालिक यशाची आशा दुरावताच ते वितळून जाऊं लागले. सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यांच्यांतील संबंध जेवढे उघड व लोकशाही संकेतांशीं सुसंवादी होतील तेवढें आपलें सार्वजनिक जीवन निकोप होईल. आज निरनिराळ्या परिषदा–कमिट्यांचे सभासदांना तनखे, प्रवास-खर्च व भत्ते यांच्या जोरावर विरोधी पक्षाला मिंधे बनविण्यांत सत्ताधारी पक्ष यशस्वी झाला आहे. या बाबतींत सुस्पष्ट नियम जोपर्यंत बनत नाहींत व त्यांचें कठोरपणें पालन होत नाहीं तोपर्यंत हा भ्रष्टाचार थांबणार नाहीं.

## • पक्षहीन लोकशाही अव्यवहार्य

या मर्त्य दुनियेंत निर्दोष पद्धति शोधून काढणें अशक्य आहे. लोकशाही पद्धतींतहि कांहीं उणीवा आहेतच. विशेषतः ज्या देशांत हजारों वर्षांची सांचलेलीं जळमटें दूर करण्याचें काम करावयाचें आहे तेथें कधीं कधीं लोकशाही प्रक्रियांच्या उपयुक्ततेबद्दल शंका निर्माण होते. उलट हुकूमशाही मार्ग हा वरवर जरी परिणाम कारक व तात्काळ यश देणारा वाटला तरी अंतिम यशाच्या दृष्टीनें तो त्याज्यच

ठरतो. पक्षाधिष्ठित लोकशाहींतहि वरवर दिसणारे अनेक ढोबळ दोष आहेत. तथापि सद्य:स्थितींत तिला कांहीं पर्याय सांपडलेला आहे असें वाटत नाहीं. पक्षहीन लोकशाही ही एक अव्यवहार्य कल्पना असून तिच्यापुढें विरोधी पक्षांची उमेद व सत्ता हस्तगत करण्याची ईर्षा ह्यांवर थंड पाणी पडून, प्रस्थापित राजवटीला बळकटी आणण्याचें कार्यच अभावितपणें होत राहतें.

तात्त्विकदृष्ट्या एकपक्षीय लोकशाही हा एक विरोधाभासाचाच प्रकार म्हटला पाहिजे. ज्या देशांत गृहयुद्ध, हिंसा व हुकूमशाही या नागमोडी मार्गानें समाजक्रांतीचा विकास होत गेलेला आहे, त्या देशांत एकपक्षीय सत्तेचें बहुपक्षीय लोकशाहींत रूपांतर तत्काल होणें संभवनीय नसतें तेथें पक्षान्तर्गत लोकशाहीची चौकट विस्तृत होणें हें देखील प्रगतीचें लक्षण समजलें पाहिजे. पण ज्या देशांत बहुपक्षीय लोकशाही अस्तित्वांत आहे तेथें एकपक्षीय लोकशाही हें प्रगतीचें गमक ठरणार नाहीं. ती हुकूमशाहीची नांदीच ठरेल. विशिष्ट परिस्थितींत व इतिहास क्रमांत ज्या घटना घडून आल्या त्यांना तात्त्विक पेहराव देऊन त्यांतून कांहीं सर्वसाधारण निष्कर्ष काढणें व त्यांची अगदी निराळ्या परिस्थितींत अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करणें केव्हांहि युक्त होणार नाहीं. एकपक्षीय लोकशाहीच्या तत्त्वांबाबत हेंच घडत आहे.

समान हिताच्या व राष्ट्रीय स्वरूपाच्या प्रश्नांवर सत्ताधारी व विरोधी पक्षांत सहकार्य व्हावें हा विचार गेलीं कित्येक वर्षें प्रसृत केला जात आहे. त्यांतून खऱ्या अर्थानें राष्ट्रीय एकवाक्यता महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्माण झाल्याचें दृष्टोत्पतीस येत नाहीं. या सर्व प्रचाराचा एक अनिष्ट परिणाम मात्र जरूर झाला आहे आणि तो म्हणजे विरोधकांच्या तत्त्वशुद्ध विरोधाची धार कमी होणें. राष्ट्रीय एकात्मता परिषदेचें ताजें उदाहरण घेतलें तर ही गोष्ट स्पष्ट होते. या परिषदेचें निर्णय सर्वानुमतें घेतले गेले आहेत. [ समाजवादी पक्ष अशा वरपांगी एकवाक्यतेला किंमत न देतां फूटीरपणाची मूलभूत चिकित्सा करूं इच्छित असल्यामुळें त्याला या मेळाव्यांतून वगळण्यांत आलें ] परंतु वस्तुतः या सर्वसंमत निर्णयांचें कांहीं महत्त्व आहे काय ?

धोरणाचे प्रश्न जरी सोडून दिले तरी आचारसंहितेसारख्या प्रश्नांवरहि ठरलेले निर्णय अंमलांत येऊं शकत नाहींत याबद्दल खेद वाटतो.

## • एकमत होऊं शकणारे प्रश्न

याचा अर्थ आपसांतले मतभेद बाजूला ठेवून कोणत्याच प्रश्नावर सहकार्य होऊं शकत नाहीं असा करायचा काय ? महाराष्ट्राच्या दृष्टीनें विचार केला तर भाषा माध्यमाचा व सामाजिक समानतेचा प्रश्न मी अत्यंत महत्त्वाचा समजतो. महाराष्ट्रांत आतां पांच विद्यापीठें ( शिवाजी विद्यापीठासह ) आहेत. या सर्वांच्या माध्यमाचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. मराठी माध्यम सर्व पातळींवर सुरू करण्याच्या

दृष्टीनें सर्व पक्षीय अथवा अपक्षीय भूमिकेवर एकमत होऊं शकतें का याचा शोध केला पाहिजे. तसेंच स्वातंत्र्याची स्फूर्ति शिवछत्रपतीपासून आपणास निरंतर मिळत राहिली तरी आजच्या जमान्यांत जातिव्यवस्थेवर व सामाजिक विषमतेवर आघात करणारी महात्मा फुले, महर्षि शिंदे यांची परंपरा पुढें कशी चालवितां येईल याचाच विचार आपण प्रामुख्याने केला पाहिजे. मागासलेल्या जमातींना समान संधीच्या नव्हे तर विशेष संधीच्या सिद्धान्तानुसार पुढें येण्यासाठीं अनुकुलता निर्माण केली पाहिजे. एका मराठा तरुणानें एका हरिजन स्त्रीशीं विवाह केल्याबद्दल राज्य सरकारनें या जोडप्याला आहेर केला ही गोष्ट फार चांगली झाली. सरकारी नोकऱ्यांतहि उच्चनीच भेदभाव नष्ट करणारे मिश्रविवाह करणाऱ्यांना अग्रहक्क देणें इ० प्रश्नांबाबत सर्व पक्षांत एकमत झालें तर फार उत्तम होईल.

सतराव्या शतकांत अवतीर्ण झालेल्या छत्रपतींनीं मंत्रपठन, दानधर्म इ० ना आपल्या राजनीतींत स्थान दिलें असल्यास त्याचें आश्चर्य वाटत नाहीं. पण विसाव्या शतकाच्या मध्यानंतर व महात्मा फुल्यांच्या कार्यानंतर श्री. चव्हाणांनीं वेदमंत्राचें पठण इ. गोष्टींना काय म्हणून उत्तेजन द्यावें ? प्रगतिशील पक्षांत या बाबत जर एक वाक्यता निर्माण झाली तर जुन्या मूल्यांची प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या हालचाली सरकारकडून कदाचित् होणार नाहींत !

## • महाराष्ट्रापुढील निकडीचे प्रश्न

माझ्या दृष्टीनें महाराष्ट्रापुढील निकडीचे प्रश्न व भारतांतील इतर विभागांपुढील समस्या यांचें स्वरूप मूलतःच भिन्न नाहीं. बहुतेक समस्या समानच आहेत. परंतु महाराष्ट्रांतील विशिष्ट परिस्थिति व येथील जातिव्यवस्थेची रचना यामुळें त्यांचा तोंडवळा कांहींसा निराळा आहे एवढेंच. या निकडीच्या प्रश्नांचें स्थूलमानानें तीन प्रकार आहेत : ( अ ) सामाजिक-जातीय; ( आ ) औद्योगिक विकास व शेती सुधारणा ( ई ) शैक्षणिक प्रगति.

जातिव्यवस्था हा सर्वच भारतीय समाजाचा आधार आहे. तथापि नर्मदेच्या दक्षिणेला असलेलें तिचें स्वरूप उत्तरेकडील तिच्या स्वरूपापेक्षां थोडें वेगळें आहे. दक्षिणेकडे ब्राह्मणादि पुढारलेल्या जातींचें लोकसंख्येंतील प्रमाण अगदींच कमी असून उत्तरेप्रमाणें येथें परंपरागत ठाकूर–वैश्य जाति नव्हत्या. ठाकूर–वैश्यांना सदृश अशा ज्या जाति ( रेड्डी, कम्मा, मराठा, शेट्टी, चेट्टीयार, वक्कालिगा, नायर, रेड्डियार, मुदलियार, नायडू इ० ) त्यांना ब्राह्मणांनीं कमी लेखलें. गेल्या १५–२० वर्षांत या जातींनी आपल्या संख्याबलाच्या, जागृतीच्या अन् कर्तृत्वाच्या जोरावर राजकीय–शैक्षणिक क्षेत्रांत महत्त्व प्राप्त करून घेतलें आहे. वाढत्या शैक्षणिक प्रगतीबरोबर, राजकीय वर्चस्वाबरोबर व नागरीकरणाचा एक स्वाभाविक परिणाम

म्हणून या जातींतील पुढारलेल्या गटांचा दृष्टिकोनहि ब्राह्मण–कायस्थादि जातींप्रमाणेंच बनूं लागला असून उत्तरेला ब्राह्मण–बनिया-ठाकूर–कायस्थ यांची ज्याप्रमाणें मागासलेल्या वर्ग-जातींविरुद्ध एक आघाडी आहे तद्वत्‌च दक्षिणेकडेहि या नवोदित जातींची व ब्राह्मणांची एक अलिखित भागीदारी निर्माण होऊं पाहात आहे.

महाराष्ट्रांतील मराठा जमात ही समावेशक व केरळच्या इडवा जातीचा अपवाद वगळतां दक्षिणेंतील इतर कोणत्याहि एका अब्राह्मण जातीपेक्षां संख्येनें मोठी आहे. साहजिकच महाराष्ट्राच्या राजकारणांत तिला इंग्रजी राजवट व उत्तर पेशवाई यांच्यापूर्वी जें महत्व होतें तें पुनश्च प्राप्त झालें आहे. कायस्थ–ब्राह्मण विद्या व पूर्वापार संस्कार यामुळें बलिष्ठ आहेतच. तेव्हां त्यांच्या व पुढारलेल्या मराठयांच्या या नव्या युतीनें महाराष्ट्रांतील मागासलेल्या वर्गांच्या व जातींच्या [ आदिवासी व गरीब मुसलमानांसह ] हितसंबंधांकडे दुर्लक्ष केलें जाण्याची भीति आहे. एकवर्ग व एकवर्ण समाजाच्या निर्मितीला ही गोष्ट बाधक ठरेल.

गेल्या दोन-अडीच वर्षांच्या अनुभवानंतर नवमहाराष्ट्राचें सरकार ध्येयपूजक नसून शक्तिपूजक आहे असें वाटूं लागतें. सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिकदृष्ट्या जे गट शक्तिशाली आहेत त्यांचा अनुनय करण्यांत या सरकारला धन्यता वाटते. दलित समाजांतील नवबुद्ध ( पूर्वीचा महार ) विभाग संख्येनें मोठा व संघटित असल्यामुळें महाराष्ट्राचे सत्ताधीस त्यांना गोंजारण्याचा प्रयत्न जरूर करीत आहेत. परंतु या बलशाली संघटित गटाव्यतिरिक्त संख्येनें लहान, सामाजिकदृष्ट्या दडपलेल्या अन् आर्थिक स्थिति वाईट असलेल्या ज्या जाति-जमाती आहेत त्या सर्वस्वी उपेक्षितच राहिल्या आहेत. त्यांची उन्नति हा एक फार मोठा प्रश्न आहे.

## ● आर्थिक विकासाची समस्या

दुसरी महत्त्वपूर्ण समस्या आर्थिक विकासाची आहे. महाराष्ट्र सरकारच्या जमीन धारणा कायद्यानें जमिनीचें वाटप होऊं शकलें नाहीं. आप्तेष्टांत जमिनीचें नकली वाटप करण्याची पळवाट कायद्यानें बंद झाली नाहीं. महसूल व जंगल खात्यांकडे असलेल्या पडिक जमिनींची वाटणी करण्याच्या पताका फडकल्या. पण प्रत्यक्षांत त्याची अंमलबजावणी झाली नाहीं. तेव्हां भूमिहीन शेतकऱ्यांचा प्रश्न फार बिकट झालेला आहे. मोठ्या व छोट्या धंद्यांमार्फत औद्योगीकरण हा एकच मार्ग त्यांचा प्रश्न सोडविण्यासाठीं आतां राहिलेला आहे. ग्रामीण भागांत जातीय वैमनस्य निर्माण होऊं न देतां शेत मजुरांच्या वेतनाचें मान वाढविलें पाहिजे. शेतकऱ्यांच्या स्थितींत त्यासाठीं सुधारणा व्हावयास हवी, शेतमाल व कारखानदारी माल यांच्या भावांत समतोल निर्माण होणें त्यासाठीं आवश्यक आहे. पण भावनीतीचा प्रश्न व संपत्ति उत्पन्नांतील मारक तफावतींचे प्रश्न अखिल भारतीय स्वरूपाचे आहेत.

उद्योगधंदे व व्यापार यांत मराठी लोकांची अजूनही गति नाहीं. औद्यो-

गिक साहसाला त्यांना प्रवृत्त करणें, व्यवस्थापकीय कर्तबगारी त्यांच्यांत निर्माण करणें व त्यासाठीं आवश्यक साधनें त्यांना जुळवून देणें हेंहि एक बिकट कार्य आहे. या बाबतींत सहकारी चळवळींचें महत्त्व अनन्यसाधारण आहे.

महाराष्ट्रापुढील तिसरा निकडीचा प्रश्न शिक्षणाचा आहे. मराठी राजकारण्यांनीं राष्ट्रीय उत्थानाचें एक साधन म्हणून शिक्षणप्रसाराला नेहमीच महत्त्व दिलें आहे. मराठी लोकांना भाषिक राज्य मिळालें. परंतु मराठी भाषेचें दास्य अजून संपलेलें नाहीं. सरकारी कामकाजांत, न्यायालयांत, मुंबई महापालिकेंत व कायदेमंडळांत इंग्रजीचेंच प्राबल्य आहे. महाराष्ट्रांत पांच विद्यापीठें आहेत. परंतु माध्यम इंग्रजीच आहे. मातृभाषेंत तांत्रिक, व्यापारी व इतर शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू करून, उत्कृष्ट पाठ्यपुस्तकें निर्माण करून, जास्तींत जास्त लोकांना शैक्षणिक प्रगतीचें द्वार खुलें करून महाराष्ट्राचा जपान–रशिया कसा बनवायचा यांची चिंता मराठी लोकांनीं नित्य केली पाहिजे.

विरोधी पक्षांच्या आपसांतील एकजुटीचा प्रश्न हा मुख्यत्वेंकरून निवडणुकांतील यशापयशाच्या संदर्भांत पुढें येत असतो. परंतु विरोधी पक्ष या संज्ञेने संबोधले जाणारे पक्ष केवळ " विरोधी " आहेत यापेक्षा त्यांच्यांत अधिक साम्य काय आहे? या पक्षांचें वर्गीकरण करावयाचें म्हटलें तरी ते कोणत्या आधारें? डावा-उजवा हा परंपरागत आधार घेतला तर स्वतंत्र–जनसंघ उजवे व कम्युनिस्ट-समाजवादी डावे ठरतात. प्रजा समाजवाद्यांना डावे मानायचे कां उजवे कां मध्यममार्गी हें एक कोडेंच आहे. उलट कम्युनिस्ट–विरोध हें राजकारणाचें मुख्य सूत्र कल्पून जर ही विभागणी केली तर जनसंघ, स्वतंत्र व प्रजासमाजवादी जवळचे ठरतात ( उत्तर–मुंबई ) बरें, केवळ मनोवृत्तीचा विचार केला तर जनसंघ, कम्युनिस्ट व समाजवादी आपापल्या परीनें उलथापालथ घडवून आणणारे वाटतात. परंतु परिवर्तनाची त्यांची इच्छा एकाच दिशेनें धावत नाहीं. तेव्हां या विभिन्न मनोवृत्तींच्या व सिद्धांतांच्या पक्षांची एकजूट व्हावी कशी!

## • संयुक्त आघाड्यांना विरोध

समाजवादी पक्षाचा संयुक्त आघाड्यांना मूलभूत विरोध आहे. अशा आघाडया दुबळेपणाच्या द्योतक व नकारात्मक असतात असें त्याला वाटतें. या आघाडया ज्या शक्तीविरुद्ध केल्या जातात ती शक्तीच परिणामीं मजबूत होते असा सार्वत्रिक अनुभव आहे. या डाव्या–उजव्या आघाडयामुळें राजकारण सध्याच्या चाकोरींतच अडकून राहते. लोकांमध्यें नव चेतना निर्माण करणें वा नवा मार्ग आक्रमिणें त्यामुळें अशक्य होऊन बसतें.

गेल्या १०–१२ वर्षांचा अनुभव जमेस धरला तर मद्रास, हैद्राबाद, बंगाल, केरळ व महाराष्ट्र या प्रांतातील डाव्या आघाडया जशा अयशस्वी झाल्या

आहेत तद्वतच ओरिसामधील गणतंत्र–प्रजा सामजवादी, गणतंत्र–काँग्रेस आणि आणि केरळमधील मुस्लीम लीग–प्रजा समाजवादी–काँग्रेस ह्या उजव्या आघाड्याहि निष्फळ ठरल्या आहेत, हें मान्य करावें लागतें. संयुक्त महाराष्ट्र समितीसारखी जनमताचा पाठिंबा असलेली आघाडीहि महापालिका-जिल्हा बोर्डांत (१९५७-६०) एकसूत्री शासन निर्माण करूं शकली नाहीं. ओरिसा-केरळमधील संमिश्र सरकारची अवस्था यापेक्षां निराळी नाहीं.

स्थायीं स्वरूपाची संयुक्त आघाडी जर शक्य नाहीं तर कांहीं प्रश्नापुरते तरी पक्षोपक्षांनीं एकत्र कां येऊं नये? यावर माझें मत असें आहे कीं, सामान्य जन-हिताचे प्रश्न निर्माण झाले असतां, आपलें 'पक्षीय लेबल' कपाळावर न चिकटवितां, त्यावर 'नागरिक' म्हणून जर लोक एकत्र आले तर ते अधिक इष्ट ठरेल. अन्यथा 'पक्षीय कलह' परत उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहींत.

## • जागा वाटणीच्या करारांतील अडचणी

जागा वाटणीच्या कराराच्या बाबतींतहि कांहीं दुर्लङ्घ्य अडचणी आहेत. याचा आधार मागील निवडणुकांतील मतदान हाच ठेवला तर नव्या व वर्धिष्णु पक्षाच्या बाबतींत अन्याय ठरणार. खेरीज आपल्याकडच्या प्रत्यक्ष मतदानात जात, व्यक्ति, धर्म, भाषा, पैसा इ० अनेक गोष्टींमुळें फरक पडत असतो. साहजिकच प्रत्येक मतदार संघांतील मतदान हा आधार राजकीय पक्ष कबूल करणार नाहींत.

कम्युनिस्टांपेक्षां काँग्रेस बरी, तिलाच आम्ही पाठिंबा देऊं हीं जनसंघ—प्र. स. पक्षांची भूमिका आहे; तर स्वतंत्र–जनसंघाचा पराभव करण्यासाठी काँग्रेसशीं हात मिळवणी करणें इष्ट असें कम्युनिस्टांना वाटतें. मग येथें जागा वांटणीचा करार संभवतो कसा? बरें, जागा वाटणींत एका लोकसभा क्षेत्रांतील विधान सभेच्या सर्व जागा एकाच पक्षाला मिळाल्या नाहींत तर संयुक्त प्रचार वा आपसांत संघर्ष हे दोनच पर्याय राहतात.

एवंच, निवडणूकांच्या वेळी राजकीय पक्षांनी आपल्या शक्तीनुसार स्व-कार्यक्रम–सिद्धांताच्या आधारेच मतदाराकडे जाणें इष्ट ठरणार आहे.

संयुक्त आघाडी वा जागा वाटणीचे करार जरी मला त्याज्य वाटत असल तरी ज्यांचे मूलभूत सैद्धांतिक व धोरण-विषयक मतभेद नाहींत त्यांनीं उगाच आपापले सवते सुभे न ठेवतां विशाल विरोधी पक्ष उभारावा असें माझें मत आहे. आमच्या पक्षानें संबंधितांना अशा तऱ्हेचें अधिकृत आवाहन केलेलेंच आहे.

* * *

अनुक्रम ३३७० दि:
क्रमांक १०९२ नों दि:

# परत बोलावण्याचा हक्क हवा

## श्री. एस्. के. लिमये यांची मुलाखत

“ तीन निवडणुकांचा अनुभव लक्षात घेतां संसदीय लोकशाही पद्धत भारतात स्थिर होत आहे पण याचा अर्थ त्यात उणीवा नाहीत असे नाहीं. आपल्या निवडणूक पद्धतीतील एक मोठी उणीव म्हणजे अल्पसंख्य मते मिळूनहि कॉंग्रेस पक्षाप्रमाणे एखाद्या पक्षाला बहुसंख्य जागा मिळतात व तो अधिकारावर येतो. विरोधी पक्षांना त्यांच्या मतांच्या प्रमाणांत जागा मिळत नाहीत. संसदीय स्वरूपात जास्तीतजास्त लोकशाही प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीचा अवलंब केल्याने येईल ” असे विचार लालनिशाण गटाचे नेते, राज्यसभेचे सभासद श्री. एस्. के. लिमये यांनी व्यक्त केले.

श्री. लिमये म्हणाले. निवडणूक पद्धतीच्या लोकशाहीत आणखी एक सहज जाणवणारी उणीव म्हणजे उमेदवार एकदा निवडून आल्यावर पांच वर्षें तो कसाहि वागला तरी मतदार त्याचे काही करू शकत नाहीत. आपण आपल्या मतदार-संघाचे कार्यक्रमाच्या पूर्ततेकरिता प्रतिनिधि आहोत. त्याला जबाबदार आहोत. त्याच्या हिताबद्दल नेहमी जागरूक असले पाहिजे. त्याचे प्रश्न मांडले पाहिजेत ही जाणीव लोकप्रतिनिधीत नेहमी राहावयास हवी असेल तर लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याचा हक्क मतदारांना असला पाहिजे निवडणूक पद्धतीतील या उणीवा दूर केल्याने लोकशाही परिपूर्ण होईल असें नाहीं पण पावले पुढे पडतील. ”

## • संसद्बाह्य चळवळीचें दडपण

आपल्या मागण्या मिळविण्यासाठीं जनतेने उठावाच्या मार्गाचा—अवैधनिक—अवलंब करणें संसदीय लोकशाहीत बसते काय ? असा प्रश्न गेल्या दोन निवडणुकांचे दरम्यान दोन घटनामुळें उपस्थित झाला व जनतेच्या उठावाचे दडपणामुळें राज्यकर्त्यांना संसदीय लोकशाहीच्या आचार पद्धतीने घेतलेले निर्णय बदलणें भाग पडले. या दोन घटना म्हणजे केरळ मधील कम्युनिस्ट मंत्रिमंडळाची बडतर्फी व महाद्विभाषिकाचे विभाजन—महाराष्ट्राची स्थापना. याबाबत बोलतांना श्री. लिमये म्हणाले, “ विधिमंडळांत बहुमत मिळवून केरळमध्यें कम्युनिस्ट मंत्रिमंडळ अधिकारावर आले होते. संसदीय मार्गानें हे मंत्रिमंडळ आपण पदभ्रष्ट करू शकत नाहीं असें दिसून आल्याने कॉंग्रेसनें प्रतिगामी शक्तींच्या सहकार्याने त्याविरुद्ध जनतेचा उठाव घडवून आणला व मंत्रिमंडळ बडतर्फ करण्यास अखेर केंद्रीय सरकारनेहि मान्यता दिली. प्रतिगामी शक्तींनी आपल्या धोरणाच्या पोषणार्थ केलेला

हा ठराव निषेधार्ह होता पण त्यांतून निष्पन्न झालेले तत्त्व महत्त्वाचे आहे. हे तत्त्व म्हणजे जनतेच्या उठावाचे अवैधनिक स्वरुपाचे दडपण आणून संसदीय मार्गाने अधिकारावर आलेले कारभारमंडळ पदभ्रष्ट करणें संसदीय आहे, लोकशाही आहे. राज्यकर्त्या काँग्रेस पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाने ठराव करून यावर शिक्कामोर्तब केलें.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वीच्या घटनाहि या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. जनतेच्या उठावाने केरळ मंत्रिमंडळ पदभ्रष्ट करतां येते तर द्विभाषिकाचे मंत्रिमंडळ पदभ्रष्ट कां करतां येणार नाहीं? संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठीं साराबंदीपर्यंत सर्व मार्गांचा अवलंब करून आम्ही सरकारी कारभार चालणे अशक्य करू असा ठराव समितीने केला. केरळसारखीच चळवळ महाराष्ट्रात होण्याचा धोका राज्यकर्त्या पक्षाला दिसू लागला. केरळमधील चळवळ त्यांना हवी होती कारण त्यांच्या हाती सत्ता येणार होती. उलट महाराष्ट्रातील चळवळ नको होती कारण हातची सत्ता जाणार होती. म्हणून चळवळीची वेळच येऊ न देता राज्यकर्त्यांनी मागणी मान्य केली जनतेच्या चळवळीच्या संसदबाह्य दडपणानेच हे घडले.

घटनेत दुरुस्ती करून नुकसानभरपाई किती व कशी द्यावयाची हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाकडून काढून कायदेमंडळाचे हाती दिला. इंपीरिअल बँकेचे राष्ट्रीयकरण, आयुर्विम्याचे राष्ट्रीयकरण, घटकराज्यांची पुनर्घटना, महाराष्ट्र-राज्याची स्थापना या साऱ्या घटना घटनेच्या चौकटीत सरकारला करता आल्या नसत्या पण जनतेच्या दडपणाने घटनेत दुरुस्ती करून सरकारला त्या कराव्या लागल्या हें लक्षांत घेतलें पाहिजे. ”

## • निवडणुकींतील दडपणें

निवडणुकीतील दडपणांबद्दल बोलताना श्री. लिमये म्हणाले. पक्ष व राज्यकर्ता वर्ग मोकाट वागू शकतो अशी परिस्थिति सध्या नाही पण उणीवा आहेत. मतदारांवर आलेली दडपणे सर्वत्र एकाच पद्धतीची नव्हती. विरोधी पक्षाच्या प्रचारास बंदी घालणे, हक्काची पायमल्ली करणे असे वातावरण सर्व साधारणपणे नव्हते. पैसा हा महत्त्वाचा घटक होता. पण काँग्रेसने केवळ पैशाने निवडणूक जिंकली असे म्हणणे म्हणजे कमी मापन करणे होय. स्वतंत्र पक्षाजवळहि मुबलक पैसा होता. पण त्याला तसे यश मिळाले नाहीं. जातीच्या दडपणाचा वापर मुख्यतः सत्ताधारी पक्षातील गटस्पर्धेत झाला. राष्ट्रीय चळवळीला पायबंद घालण्यासाठी मुस्लीम लीगची स्थापना झाली, केरळमध्ये कम्युनिस्ट चळवळीला पायबंद घालण्यासाठी कॅथालिक धर्मपीठ, मुस्लीमलीग, नायरमंडळ अशा संघटनाची मदत अशा स्वरूपात

घेतली. जातीचा वापर करण्यांत आल्याचे सार्वत्रिकपणे म्हणता येणार नाही. ही दडपणे कशी दूर करता येतील याचा विचार करताना हे लक्षांत पाहिजे की ही दंडपणे – म्हणजे वर्गीय जाणतेपणाला विरोध – निरानिराळी स्वरूपे धारण करून पुढे येत असतात. लोकशाही शक्ति वर्गीय दृष्टीने संघटित करणे हाच त्यावर मार्ग आहे.

मतदाराच्या जागरूकतेबद्दल बोलताना श्री. लिमये यांनी सांगितले की जागरूकता सर्वत्र सारखी होती असे म्हणता येणार नाही पण उदासीनता निश्चित नव्हती. सर्वसामान्य हिंदी माणसाचे पूर्वीचे कुंठित जीवन जाऊन त्याला द्रुत गति प्राप्त झाली आहे. कमी त्रासाने आपली आकांक्षा कशी पुरी होईल ? साधने कोणती वापरावी या दृष्टीने तो विचार करतो. निवडणूक हेहि एक आपल्या आकांक्षापूर्तीचे साधन आहे हीच त्याची भावना आहे. नेत्यावरची त्याची श्रद्धा त्याच्या जीवनाला मिळालेल्या गतीशीच निगडित आहे. श्रद्धेला पाया आहे, तो सूज्ञहि पण आहे.

## • सत्तारूढ व विरोधी पक्षांचे संबंध

संसदीय लोकशाही आणि त्यांतील पक्षांचे स्वरूप व संबंध यासंबंधी आपल्या कल्पना स्पष्ट करताना श्री. लिमये म्हणाले, "पिळवणूकरहित समाजवादी समाजरचना स्थापन करणे हें आपले राष्ट्रीय ध्येय झाले असून संसदीय लोकशाही हे साधन आहे, ते काही ध्येय नव्हे. द्विपक्षपद्धतीची कल्पना (irrational nnderstanding) तर्कदुष्ट समजामधून आलेली आहे. अमेरिकेप्रमाणे डेमोक्रॅटिक व रिपब्लिकन असे दोन तुल्यबळ पक्ष निर्माण झाले तरी अशा पक्षांनी समाजधारणेत व रचनेत फरक होत नाही. राजकीय पक्ष म्हणजे जनतेच्या इच्छेचे प्रतिबिंब असते. वर्गीय हालचालींचे ते साधन असते. पक्षामागे सामाजिक प्रेरणा व आधार असतात. या साऱ्या गोष्टी लक्षात घेता अधिकारारूढ पक्ष व विरोधी पक्ष यांचे संबंध सौजन्याचे असावेत अशी नुसती शुभेच्छा व्यक्त करण्यात अर्थ नाही. हे संबंध मूलतः लढ्याचेच राहणार, पण समान धोरण कार्यक्रमावर मतैक्य शक्य आहे. उदा. परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतीत कॉंग्रेस व कम्युनिस्ट यांची सर्वसाधारणपणे एकवाक्यता आहे. उद्योग सार्वजनिक क्षेत्रांत असावे, शेतीसुधारणा यासारख्या कार्यक्रमावर मतैक्य होऊ शकेल. अधिकारारूढ पक्ष व विरोधी पक्ष यांचे संबंध कोणत्याहि रूढीने बांधून घेणे शक्य नाही. याबाबत रूढीच प्रस्थापित करावयाच्या तर जनतेच्या हक्कांना ज्यात मर्यादा नाही अशा रूढी प्रस्थापित केल्या पाहिजेत, वर्ग आहेत तोपर्यंत पक्ष राहणारच, पक्षहीन लोकशाही आणि एकपक्षीय लोकशाही या दोन्ही कल्पना अव्यवहार्य आहेत, त्या कल्पनाच आहेत"

केवळ काँग्रेसविरोधाच्या पायावर विरोधी पक्षांची आघाडी उभारणे आपणास अमान्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## • मतभेद अंमलबजावणीबाबत

सर्व पक्षांना सहकार्याने पार पाडता येईल असा कोणता कार्यक्रम देशाच्या विशेषतः महाराष्ट्राच्या दृष्टीने आपणास सुचविता येईल असे विचारता श्री. लिमये म्हणाले, पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम अशा स्वरूपाचा आहे. काँग्रेसशी याबाबत मतभेद आहेत ते अंमलबजावणीबाबत आहेत. ही अंमल बजावणी लोकशाहीला, जनतेच्या मुक्त प्रगतीला अनुकूल अशा पद्धतीने होत नाही.

महाराष्ट्रापुढील निकडीचे प्रश्नांसंबंधी बोलताना श्री. लिमये यांनी सांगितले की शेती उत्पादन वाढविणे, पाण्याची अशाश्वति दूर करणे हे महाराष्ट्रापुढील मुख्य प्रश्न आहेत. औद्योगिक वाढ समतोल झालेली नाही. जमिनीची योग्य विभागणी करून उपलब्ध श्रमशक्तीचा पुरेपूर वापर करण्यात आला पाहिजे. सरकारची ॲग्रो इंडस्ट्रीजची योजना म्हणजे केवळ वरवरची मलमपट्टी आहे त्याने मूळ प्रश्न सुटणार नाही.

विरोधी पक्षांचे आपसातील संबंध कशा स्वरूपाचे असावेत, समान कार्यक्रमावर संयुक्त आघाडी करणे, विशिष्ट प्रश्नापुरते एकत्र येणे, निवडणुकीपुरता करार करणे यापैकी कोणता मार्ग देशाच्या सध्याच्या स्थितीत योग्य ठरेल या बाबत बोलताना श्री. लिमये म्हणाले, " विशिष्ट पक्षांची नव्हे पण वर्गांची आघाडी करता येईल. कामगार, शेतकरी, मध्यम वर्गातील व्यावसायिक, छोटे कारखानदार यांचे संबंध विरोधाचे नाहीत. विशिष्ट कार्यक्रमाच्या पूर्ततेकरता त्यांची, त्यांच्या राजकीय संघटनांची आघाडी होऊ शकेल. "

दा. क्र. 12318

REFBK-0012334

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 33508 दि: 1-2-91
क्रमांक 1-2-91 नों. दि. 2-7-91

## भारताचें लोकमत

भारतांतील गेल्या तीन सार्वत्रिक निवडणुकांतील राजकीय विचारप्रवाहांचें समतोल विश्लेषण. निवडणूक निकालांसंबंधीं माहितीपूर्ण आंकडेवारी, व निवडणुकींतून उपस्थित झालेल्या भारतीय लोकशाहीपुढील कांहीं समस्यांसंबंधीं डॉ. र. पु. ऊर्फ अप्पासाहेब परांजपे, प्रा. ग. बा. सरदार, मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. एस्. एम्. जोशी, श्री. श्रीनिवास सरदेसाई, श्री. एस्. के. लिमये, आदि राजकीय नेते व विचारवंतांचे विचार या पुस्तकांत दिलेले असून निवडणुकींतून व्यक्त झालेलें ' भारताचें लोकमत ' कोणत्या स्वरूपाचें आहे, याची यथार्थ कल्पना त्यावरून येईल. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीसंबंधीं अशा स्वरूपाचें विवेचन करणारें मराठींतील हें पहिलेंच पुस्तक आहे.

— संपादक


संगम प्रकाशन

१२०५।४।३ शिवाजीनगर, पुणें ४.


**प्रकाशित**

लोकशाही समाजवाद

प्रा. दे. अ. दाभोलकर

**आगामी**

आपल्या शिक्षणाची दिशा

भारताचें परराष्ट्र धोरण